12-08-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

VTG/ 13:00

08-12--2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

VTG/ KTG/ SBT/ 13:00

(**सभापतीस्थानी : माननीय सभापती**)

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला .

नियम 289 च्या सूचने संबंधी

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन सूचना आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "मुंबईवर दिनांक 26 नोव्हेंबर 2008 रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे उद्भवलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती, यामुळे शासनाने श्री. राम प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल सभागृहात सादर करण्याचे माननीय नामदार मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देणे, मात्र सदर अहवाल सभागृहात सादर न करता परस्पर अहवालातील बाबी जनतेसमोर येणे, सबब श्री. राम प्रधान समितीचा अहवाल सभागृहासमोर सादर करुन त्यावर चर्चा करुन निर्णय घेणे " या विषयावर नियम 289 ची पहिली सूचना सकाळी 9.00 वाजता दिली आहे. तेव्हा या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, दिनांक 26.11.2008 रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाल्यामुळे मुंबईतील कायदा व सुव्यवस्थेची जी परिस्थिती निर्माण झाली होती त्या संबधी राज्य शासानाने श्री. प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. मागच्या अधिवेशनाच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात असे सांगितले होते की पुढच्या अधिवेशनात हा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल. परंतु हा अहवाल सभागृहासमोर न ठेवता प्रिन्ट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या माध्यमातून तो अहवाल जनतेसमोर आलेला आहे. त्यामुळे सभागृहाच्या हक्काला बाधा येत आहे. हा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यास शासन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

का घाबरत आहे हे मला समजत नाही. त्या हल्ल्याच्या संदर्भात या समितीने कोणावर किती आक्षेप ठेवले आहेत, त्या हल्ल्यातील खरे गुन्हेगार कोण आहेत, कोणाच्या चुका झालेल्या आहेत याची सपूर्ण माहिती सभागृहाला कळली पाहिजे. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन प्रधान समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवून त्यावर येथे चर्चा करावी अशी मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करीत आहे.

सभापती :नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा झाली पाहिजे या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपले मनोगत मांडलेले आहे . त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, आजच्या कामकाजपत्रिकेत त्या अनुषंगाने कोणताही विषय नसल्यामुळे मी त्याला अनुमती नाकारत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहासमोर प्रधान समितीचा अहवाल ठेवण्यात येणार आहे किंवा नाही याबाबतीत शासनाने माहिती द्यावी अशी माझी शासनाला विनंती आहे. हा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यास शासन का घाबरत आहे ? प्रश्नोत्तराचा तास झाला पाहिजे या मताचा मी सुध्दा आहे परंतु या संदर्भात शासनाने उत्तर दिले पाहिजे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती : मी त्या सूचनेस अनुमती नाकारली असल्यामुळे त्या बाबत मी आज शासनाकडून उत्तराची अपेक्षा करीत नाही.

त्यानंतर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर,सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, विनोद तावडे , डॉ.दीपक सावंत, श्री.सय्यद पाशा पटेल, डॉ. नीलम गो-हे यांनी "दिनांक 11 नोव्हेंबर 2009 रोजी झालेल्या फयान चक्री वादळामुळे कोकणातील मच्छिमार बागायतदार व शेतकऱ्यांचे कोटयावधी रुपयांचे झालेले नुकसान, समुद्रात मच्छिमारीसाठी गेलेल्या मच्छिमारांचा अद्यापही शोध न लागणे, सदर वादळामुळे नारळी, पोफळी व आंब्याच्या झाडांचे झालेले नुकसान त्यामुळे तेथील लोकांच्या रोजगाराचा निर्माण झालेला प्रश्न ,सदर आपत्ती येऊन गेल्यानंतर शासनाकडून करण्यात आलेली तुटपुंजी मदत, कोकणाप्रमाणेच राज्यातील इतर भागात अवेळी पावसामुळे फळबागा व पिकाचे झालेले प्रचंड नुकसान अद्याप शेतीचे पंचनामे न होणे ,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती ....

त्यामुळे शेतकरी वैफल्यग्रस्त होऊन आत्महत्या करीत आहेत " या विषया संबंधी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन चर्चा करावी यासाठी नियम 289 अन्वये दुसरी सूचना दिलेली आहे. या बाबतीत सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : माननीय सभापती महोदय, आम्ही या ठिकाणी नियम 289 अन्वये जी सूचना दिलेली आहे त्याद्वारा जो विषय दिलेला आहे तो विषय खरोखरी अत्यंत महत्त्वाचा असाच आहे. 11 नोव्हेंबर 2009 रोजी या राज्यामध्ये बऱ्याच काळानंतर 'फयान' नावाचे चक्रीवादळ आले होते. या वादळाची सूचना आदल्या दिवशीच मिळाली होती पण ती सूचना जनतेपर्यंत पोहोचली नाही त्यामुळे 11 नोव्हेंबरला जे चक्रीवादळ या राज्याच्या विशेषत: किनारपट्टीवर आले त्यामुळे कोकणची पूर्ण किनारपट्टी उद्ध्वस्त झाली. त्या काळात मच्छिमारीसाठी समुद्रात गेलेल्या मच्छिमारांपैकी अनेकजण बेपत्ता झाले, त्याच्या होड्या तुटून गेल्या, समुद्रात बेपत्ता झाल्या व त्यावरील मच्छिमार परत आलेलेच नाहीत. या चक्रीवादळामुळे कोकणातील आंबा, सुपारी, नारळ, काजू वगैरेंची बागायती करणारे शेतकरी आज फार उद्ध्वस्त झालेले आहेत. त्यांची आंबा-काजू-फणसाची, नारळाची, सुपारीची 25-25 वर्षांची झाडे या वादळामुळे उन्मळून पडलेली आहेत. सभापती महोदय, या फयान चक्रीवादळाचा फटका केवळ राज्याच्या किनारपट्टीलाच बसलेला नाही तर या वादळामुळे अनेक माणसे बेपत्ता झाली आहेत. राज्यातील अनेक भागामध्ये या वादळाचा फटका बसला आहे. त्या काळात झालेल्या अवकाळी पावसामुळे कोकणाप्रमाणेच उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यातील शेतकऱ्यांनाही फटका बसला आहे. त्यांचे हाताशी आलेले पीक वाया गेलेले आहे. त्या भागातील अनेक पिके, बागायती उद्ध्वस्त झाल्या. पश्चिम तसेच उत्तर महाराष्ट्रातील द्राक्ष बागायतदार शेतकरी या अवकाळी पावसामुळे पूर्ण उद्ध्वस्त झाला आहे. त्यांचे सुमारे 200 कोटी रूपयांचे नुकसान झालेले आहे. विदर्भ मराठवाड्यातील कापसाचे पीक देखील अवकाळी पावसामुळे त्यावर पडलेल्या लाल्या नावाच्या रोगामुळे हातातून गेले आहे. सभापती महोदय, कोकणातील शेतकऱ्यांच्या आंबा,नारळ इत्यादीचे पीक या चक्री वादळामुळे गेले तसेच कोकणातील ठाणे जिल्ह्यातील तसेच विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील भात उत्पादक शेतकरी आहे त्याच्या भाताची कापणी झालेली होती पण अवकाळी पाऊस झाल्यामुळे ते सारे कापून ठेवलेले पीक संपूर्णपणे हातातून गेले आहे. त्यांचा कापून ठेवलेला भात अवकाळी पाऊस झाल्याने वाया गेले. त्यासाठी सरकारने मदत जाहीर तर केली पण ती देण्याच्या दृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे व्हायला पाहिजे होते ते न झाल्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही. सभापती महोदय, राज्यात एवढे मोठे संकट आल्यानंतर, महाराष्ट्रात जवळपास हजार कोटी

..... बी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

रूपयांचे नुकसान झाल्यानंतरही अजून पर्यंत या आपत्तीत उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यास हे सरकार असमर्थ ठरले आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा विषय असल्याने आणि विदर्भातील नागपूरमध्ये हे विधीमंडळाचे अधिवेशन होत असताना या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी या आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्याला मदत देण्याच्या दृष्टीने जर आपण तातडीने चर्चा करून त्याला मदत मिळवून दिली नाही तर तो या विदर्भातील, मराठवाड्यातीलच नव्हे तर एकूण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा विश्वासघात होईल. निदान आज तरी या शेतकऱ्यांपेक्षा दुसरा कोणताही विषय महत्त्वाचा असू शकत नाही. त्यामुळे या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सभागृहापुढील आताचे सारे कामकाज बाजूला सारून या विषयावर चर्चा करावी आणि 'फयान'ग्रस्त तसेच अवकाळी पाऊसग्रस्त शेतकऱ्याला तातडीने मदत करण्यासाठी, आतापर्यंत सरकारने त्यांच्यासाठी जी काही तोकडी मदत जाहीर केलेली आहे ती अत्यंत अपुरी आहे, त्यामुळेच त्या बाबत सविस्तर चर्चा करून या चर्चेतून राज्यात झालेल्या एकूण नुकसानीचा अंदाज घेऊन, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांकडून ज्या मागण्या येतील त्या लक्षात घेऊन त्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून या विषयावर सभापती महोदय, आपण चर्चा घडवून आणावी अशी मी आपल्याला विनंती करतो, त्यासाठी आम्ही नियम 289 खाली दिलेली सूचना आपण मान्य करावी.

- -

.... बी 3 ...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 289 अन्वये आम्ही आपल्याकडे जी सूचना दिलेली आहे त्यातून ज्या विषयावर येथे चर्चा घडवून आणावी अशी आम्ही आपल्याला विनंती करतो आहोत तो विषय अत्यंत तातडीचा आणि महत्त्वाचा आहे. सुरूवातीस 'फयान' चक्रीवादळामुळे विशेषत: कोकण किनारपट्टी भागातील शेतकरी तसेच मच्छिमार उद्ध्वस्त झाले आहेत आणि त्याचबरोबर त्या काळात झालेल्या अवकाळी पावसामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मदत जरूर जाहीर केली होती आणि ती करताना सांगितले होते की, पाच दिवसामध्ये कोणत्याही परिस्थितीत झालेल्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करू पण अजूनही ते पंचनामे झालेले नाहीत. ...

(यानंतर श्री.सरफरे .... सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यामुळे मदतीचा विषय उपस्थित होत नाही. म्हणून या विषयावर तातडीने चर्चा होणे आवश्यक आहे असे मला आपल्याला आवर्जून सांगावयाचे आहे. त्या चर्चेची मागणी करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

प्रधान समितीच्या अहवालाबाबत माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मांडलेला विषय सुध्दा महत्वाचा होता. या अधिवेशनामध्ये आम्ही ते मढे उकरुन काढू. त्याहीपेक्षा आज लोक बंदरावर आपल्या हरवलेल्या लोकांची वाट पहात बसले आहेत. आपला हरवलेला माणूस आता येईल, मग येईल अशी वेडी अपेक्षा बाळगून आहेत. मी त्या भागात पहाणी करण्याकरिता गेलो होतो, त्यावेळी समुद्रावर प्रेते तरंगत होती. कोस्ट गार्डच्या नियमांमुळे ती प्रेते उचलावयास कुणी तयार होत नव्हते. एवढी त्याठिकाणी भीषणता होती. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, सत्ताधारी पक्षाने नियम 260 अन्वये या विषयावर आज प्रस्ताव दिलेला आहे. त्यामुळे सभागृहाचे कामकाज ताबडतोब तहकूब करुन या विषयावर चर्चा करावी अशी आमची मागणी आहे. कारण सत्ताधारी पक्षालाही हा प्रस्ताव महत्वाचा वाटत आहे. या प्रस्तावावर चर्चा करण्याबाबत संपूर्ण सभागृहाचे एकमत असल्यामुळे आपण सभागृहाचे संपूर्ण कामकाज आपण तहकूब करुन या प्रस्तावावरील चर्चेला तातडीने सुरुवात करावी. आणि या चर्चेच्या अनुषंगाने सभागृहापुढे शासनाचे उत्तर येऊन आपल्याला शासनाकडून काय मदत मिळणार आहे, याची संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी, बंदरावरील कोळी बांधव सरकारच्या उत्तराची वाट पहात आहेत. म्हणून ताबडतोब या प्रस्तावावरील चर्चेला आपण सुरुवात करावी अशी मी विनंती करतो.

सभापती : सभागृहाचे नेते माननीय श्री. भुजबळ साहेब आपणास याबाबतीत काही सांगावयाचे आहे काय?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर साहेबांनी याठिकाणी विषय उपस्थित केला आहे. त्याला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पाठिंबा दिला. मला आपल्यामार्फत सन्माननीय सभागृहाला सांगावयाचे आहे की, हा विषय महत्वाचा आहे याबद्दल कुणाच्याही मनामध्ये शंका नाही. शासनाच्या मनामध्ये सुध्दा संदेह नाही. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे हा विषय महत्वाचा आहे. म्हणूनच आज अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सत्ताधारी पक्षाच्या माननीय सदस्यांनी या संदर्भामध्ये नियम 260 अन्वये चर्चेचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. छगन भुजबळ....

प्रस्ताव मांडला आहे. सभापती महोदय, आज अधिवेशनाचा पहिला दिवस आहे. आज आपण प्रश्नोत्तराचा तास सुरु करणार आहोत. माझी आपणामार्फत सर्व माननीय सदस्यांना विनंती आहे की, सभागृहाचे सर्व माननीय सदस्य अगोदर पासूनच प्रश्न पाठवीत असतात. शासनामार्फत त्यावर उत्तरे तयार केली जातात. ज्या प्रश्नाची याठिकाणी चर्चा होण्याची अपेक्षा असते, त्या प्रश्नाशी संबंधित अधिकारी संपूर्ण महाराष्ट्रातून एक दिवस याठिकाणी येऊन बसतात. आणि त्या प्रश्नाची संपूर्ण माहिती संबंधित मंत्र्यांना देऊन ती सभागृहासमोर यावी यासाठी ते संपूर्णपणे काम करीत असतात. माझी आपणास विनंती आहे की, सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या तासावर चर्चा सुरु करावी. त्याचबरोबर आणखी एक गोष्ट मी नियमाव्दारे आपल्यासमोर मांडू इच्छितो की, नियम 57 अन्वये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या संदर्भामध्ये आपण सभागृहाच्या नेत्यांना विचारुन त्या चर्चेची वेळ निश्चित करावी. त्याप्रमाणे आपण याठिकाणी चर्चेचा क्रम लावलेला आहे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण प्रश्नोत्तरांचा तास घ्यावा. आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचा क्रम जरी लावला असला तरी....

श्री. दिवाकर रावते : आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव घेण्याबाबत विषय मांडलेला आहे. त्यामुळे आपण जो नियम सांगितलेला आहे तो आम्हाला माहीत आहे. तो याठिकाणी वाचून दाखविण्याची आवश्यकता नाही...

श्री. छगन भुजबळ : आपल्याला तो नियम माहीत असल्यामुळे तो नियम मागे घेतो.

श्री. दिवाकर रावते : या सरकारला शेतकऱ्याच्या आत्महत्तेबाबत गांभीर्य वाटत नाही काय?. फयान वादळामध्ये शेतकऱ्यांचे व मच्छिमारांचे जे नुकसान झाले आहे, त्यांना अजूनपर्यंत शासनाने काहीही मदत केली नाही याबाबत सरकारला खेद वाटत नाही काय?

सभापती : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कृपया शांत व्हावे. मी माननीय श्री. छगन भुजबळ साहेबांना बोलावयास परवानगी दिलेली आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत माननीय सदस्यांना विनंती आहे की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचा क्रम आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दाखविला असला तरी त्या चर्चेला जेवढा वेळ देता येईल तेवढा द्यावा. त्यामुळे माननीय राज्यपालांच्या अभिभषणावरील चर्चेला मान दिल्यासारखे होईल. आणि त्यानंतर फयान वादळाच्या संदर्भामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

चर्चेला सुरुवात करावी. आणि ती चर्चा उशिरापर्यंत चालवावी. आणि म्हणून याठिकाणी प्रश्नोत्तराचा तास जसा महत्वाचा आहे, त्याप्रमाणे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा देखील तेवढीच महत्वाची आहे.

(गोंधळ)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.छगन भुजबळ . . . .

म्हणूनच याठिकाणी सत्ताधारी पक्षाच्यावतीने नियम 260 अन्वये प्रस्ताव देण्यात आलेला आहे. आम्हाला देखील या विषयाचे महत्व कळलेले आहे म्हणूनच सत्ताधारी पक्षाच्यावतीने आजच ही चर्चा घेतलेली आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

आम्हाला या विषयाचे महत्व माहिती आहे, हा विषय महत्वाचा आहे असे वाटत आहे . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, याठिकाणी सर्वश्री.गुरुनाथ कुलकर्णी, उल्हास पवार, अरुण गुजराथी, जयप्रकाश छाजेड, श्रीमती उषा दराडे, श्री.संजय दत्त, डॉ.वसंत पवार, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री मोहन जोशी, हेमंत टकले, राजन तेली, श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री.एन.पी.हिराणी, चरणसिंग सप्रा, सुभाष चव्हाण . . . .

(घोषणा)

या सर्व सन्माननीय सदस्यांनी मिळून राज्यात विशेषत: कोकणामध्ये फयान वादळामुळे जे नुकसान झाले आहे, त्यासंदर्भात आज चर्चा उपस्थित केलेली आहे. कारण त्यांना देखील या चर्चेचे महत्व कळलेले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात. तसेच घोषणा देतात.)

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जे सांगितले, त्या संदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. महाराष्ट्र विधान परिषदेच्या नियमामध्ये नियम 260 व नियम 289 बाबत उल्लेख आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांचे असे म्हणणे आहे की, सत्ताधारी पक्षाच्या वतीने नियम 260 अन्वये या विषयाच्या संदर्भात प्रस्ताव देण्यात आलेला आहे आणि त्याबाबत जेवढी पाहिजे तेवढी चर्चा करु या. जर असे असेल तर मग विधान परिषदेच्या नियमावलीमध्ये नियम 289 ची गरजच नव्हती. पण प्रत्यक्षात नियम 289 चा समावेश कशासाठी करण्यात आला ? त्याच्या मागील प्रयोजन काय आहे ? या नियमामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला सारुन प्राधान्याने कोणते कामकाज घ्यावे. मग सरकारला हा विषय प्राध्यान्याने

. . . .डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

चर्चेसाठी घ्यावा असे वाटत नाही काय ? या वादळामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. आजही 72 मच्छिमार बेपत्ता झालेले आहेत, अनेक मच्छिमार मृत्यूमुखी पडलेले आहेत, अनेक घरे उध्वस्त झालेली आहेत, शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे. नारळ, सुपारी इ.बागांचे प्रंचड नुकसान झालेले आहे आणि हे सगळे प्रश्नोत्तराच्या तासापेक्षा देखील महत्वाचे आहे असे आपल्याला वाटत नाही काय ? हे सरकारने पहिल्यांदा सांगावयास पाहिजे. म्हणून माननीय सदस्यांनी येथे जो मुद्दा मांडलेला आहे, तो यासाठीचे महत्वाचा आहे आणि त्यामुळे या विषयावर नियम 289 अन्वये सदनामध्ये चर्चा व्हावयास पाहिजे असे आमचे म्हणणे आहे. त्यासाठी आपण प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा. हे सरकार आपल्यासाठी काय करणार आहे ? हे जाणून घेण्यासाठी शेतकरी आतूर झालेला आहे. सरकारने त्यांना अजून पुरेशी मदत दिलेली नाही. म्हणून हा प्रस्ताव येथे आणलेला आहे. आम्ही मच्छिमारांच्या घरी जाऊन आलो आहोत, त्यांचे दु:ख पाहिलेले आहे, त्यांना मदत केली आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, नियम 289 अन्वये या विषयावरील चर्चेसाठी अनुमती द्यावी.

(काही सन्माननीय सदस्य बोलतात)

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी एक मिनिट बोलू इच्छितो. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुद्दा मांडला आणि त्यावर सन्माननीय सदस्यांचे भाषण होत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी नियम 260 बाबत उल्लेख केला आहे. पण आपल्या नियमावलिमध्ये नियम 289 चा देखील समावेश केलेला आहे आणि त्या अनुषंगाने एका विशिष्ट परिस्थितीमध्ये या नियमांन्वये चर्चा होणे अपेक्षित असते. याठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळसाहेबांनी सांगितले की, आम्ही आज जाणीवपूर्वक या विषयावरील चर्चा ठेवलेली आहे. परंतु प्रत्यक्षात ही चर्चा जाणीवपूर्वक ठेवलेली नाही तर दर मंगळवारी सत्ताधारी पक्षातर्फे सदनासमोर प्रस्ताव मांडण्यात येतोच. आज योगायोगाने मंगळवार आहे आणि योगायोगाने अधिवेशनाचा पहिला दिवसही आहे, त्यामुळे सत्ताधारी पक्षातर्फे चर्चेसाठी प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. सत्ताधारी पक्षाने जाणीवपूर्वक हा प्रस्ताव चर्चेसाठी ठेवलेला नाही. आज याठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा होऊ नये या मताचे कोणीही नाही. पण फयान वादळामुळे जे नुकसान झालेले आहे, त्या विषयाची प्रॉयॉरिटी जास्त आहे. अजूनही ....

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर. . . .

माणसे बेपत्ता आहेत, माणसे मृत्युमूखी पडलेली आहेत. म्हणून प्रश्नोत्तराचा तास आणि इतर कामकाज स्थगित करुन ताबडतोब या विषयावरील चर्चेला सुरुवात केली पाहिजे अशी आमची मागणी आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आजपासून विधीमंडळाचे अधिवेशन सुरु झालेले आहे. फयान वादळ आणि अवकाळी पडलेला पाऊस यामुळे खरोखरच शेतकऱ्यांची दैन्यावस्था झालेली आहे. मी माननीय जलसंपदा मंत्री श्री.अजितदादा पवार यांना सांगू इच्छितो की, आपण जी मदत घोषित केलेली आहे, ती अत्यंत अल्प आहे. कारण सुपारी व नारळाच्या बागा जमीनदोस्त झालेल्या आहेत. ती झाडें पूर्णपणे तोडून बाजूला करणे आणि तो भाग रिकामा करण्यासाठी येणारा खर्च, हा आपण हेक्टरी जी मदत दिलेली आहे त्यापेक्षा जास्त आहे. या कामाच्या मजुरीसाठी येणारा खर्चच जास्त आहे. ही झाडे तोडून केलेल्या रिकाम्या जागेमध्ये नवीन झाडे लावणे ही तर पुढचीच बाब आहे. इतका हा प्रश्न भयानक स्वरुपाचा आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या चिंतेपोटी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सभागृहासमोर असलेले बाकीचे सगळे कामकाज बाजूला ठेवून या ठिकाणी विरोधी पक्षाकडून मांडण्यात आलेल्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर विधानपरिषदेत चर्चा घेतली अशा प्रकारचा मेसेज वरच्या सभागृहातून जाणे अत्यंत महत्वाचे आहे अशी माझी नम्र विनंती आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, अरविंद सावंत, विनोद तावडे यांनी या प्रश्नाचे महत्व या ठिकाणी सांगितलेले आहे. या सभागगृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी सुध्दा या फयान वादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या संदर्भात चर्चा झाली पाहिजे असे सांगितले व सत्तारुढ पक्षाचे सुध्दा तसेच मत आहे असेही सांगितलेले आहे. फयान वादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर चर्चा झाली पाहिजे असा विरोधी पक्षातील सदस्यांचा सुध्दा आग्रह आहे. सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे या प्रश्नाच्या बाबतीत सखोल चर्चा झाली पाहिजे असे मत आहे.याबाबतीत सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. तसेच सत्तारुढ पक्षाने नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये दिलेला प्रस्ताव आणि शासनामार्फत देण्यात आलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव हे दोन्ही प्रस्ताव एकाच विषयावरील आहेत. आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचा आजचा पहिला दिवस आहे. या ठिकाणी देण्यात आलेल्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आजच्या कामकाज पत्रिकेवरील प्रश्नोत्तराचा तास तहकूब करावा का असा प्रश्न सभागृहात उपस्थित करण्यात आला आहे. याबाबतीत मी असा निर्णय देतो की, फयान वादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर चर्चा झाली पाहिजे असा माझाही आग्रह आहे, आपलाही आग्रह आहे आणि सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचा आणि शासनाचाही आग्रह आहे. परंतु राज्यातील सर्वसामान्य माणसांचे प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने प्रश्नोत्तराचा तास हा अत्यंत महत्वाचा आहे त्या दृष्टिकोनातून सभागृहामध्ये सातत्याने किमान एक तास प्रश्नोत्तराचा तास असतो. हा प्रश्नोत्तराचा तास झाला पाहिजे. मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

सभापती ...

सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की, फयान वादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेप्रमाणे तसेच आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाप्रमाणे आजच या ठिकाणी या विषयावर नक्की चर्चा होईल. फक्त शासकीय औपचारिक कामकाज आहे ते दहा ते पंधरा मिनिटात संपल्यानंतर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड आपल्या भाषणाला सुरुवात करतील आणि ते आपले भाषण पूर्ण करतील. त्यानंतर अपवादात्मक परिस्थिती, विशेष बाब म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचे आजचे कामकाज मी तहकूब करीन आणि त्यानंतर फयान वादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या संदर्भातील जो प्रस्ताव आहे त्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल. अत्यंत महत्वाच्या विषयाच्या अनुषंगाने ही चर्चा आहे. या चर्चेच्या बाबतीत या ठिकाणी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्याचा अर्थ एवढाच आहे की, सभागृहासमोरील आजचे दैनंदिन कामकाज तहकूब करुन या विषयावर चर्चा घडवून आणावी.

श्री. अरविंद सावंत (बसून): हा विषय अत्यंत गंभीर आहे.

सभापती : ते कोणीच नाकारलेले नाही. या संदर्भात आजच्या कामकाज पत्रिकेवर नियम 260 अन्वये प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. म्हणून याबाबतीत माझा निर्णय असा आहे की, आजच्या प्रश्नोत्तराच्या तासाला आपण आता सुरुवात करावी.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सरकार नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाला घाबरते का ?

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून आता ही चर्चा सुरु करावी. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांना मांडू द्यावा पण प्रश्नोत्तराचा तास घेऊ नका.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाच्या संदर्भात आपण निर्णय दिला पण अशा पध्दतीने या चर्चेची तातडी थांबविणे अयोग्य आहे असे मला वाटते. त्यामुळे ही चर्चा तातडीने सुरु करावी. पाहिजे तर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर .....

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न महत्वाचा आहे, ही चर्चा अत्यंत महत्वाची आहे याबाबतीत कोणाचेही दुमत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन ही चर्चा सुरु करावी.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

सभापती : सभागृहाची बैठक मी पंधरा मिनिटाकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.26 ते 1.42 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य हौद्यात जमून घोषणा देत असतात.)

सभापती : फयान वादळावर चर्चा घेण्याचे मी ठरविलेले आहे. कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, फयान वादळावर चर्चा घेण्याचा मी निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी जागेवर जाऊन बसावे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.44 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय सभापती

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

नियम 289 आणि नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, फयान वादळग्रस्तांच्या संदर्भात चर्चा होणार आहे काय ?

सभापती : कामकाजपत्रिकेवरील औपचारिक कामकाज आपण 15 मिनिटामध्ये पूर्ण करु. त्यानंतर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड सुरुवात करतील. त्यांचे भाषण संपल्यानंतर राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा थांबविण्यात येईल. नियम 260 अन्वये फयानग्रस्तांच्या संदर्भात अत्यंत महत्वाची चर्चा सत्तारुढ पक्षाच्यावतीने उपस्थित करण्यात आलेली आहे. याच विषयाच्या संदर्भात विरोधी पक्षाच्यावतीने नियम 289चा प्रस्ताव देण्यात आलेला होता. यानुषंगाने मी असे सांगेन की, नियम 289अन्वयेचा प्रस्ताव आणि नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर एकत्रितपणे चर्चा होईल. एक विशेष बाब म्हणून हा सत्तारुढ आणि विरोधी पक्षाचा प्रस्ताव म्हणून चर्चेला सुरुवात करावयाची आहे. एक अपवाद म्हणून मी हा निर्णय घेतलेला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

प्रा. वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदयन सन 2009चा अध्यादेश क्रमांक 25 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवते.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभगृहासमोर ठेवणे

. श्री. पद्माकर वळवी (आदिवासी विकास, कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लातूर व उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लातूर यांचा सन 2007-2008 चा 17 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने बीड जिल्हा माथडी व असंरक्षित कामगार मंडळ, बीड यांचा सन 1999-2000, 2000-2001,2001-2002, 2002-2003, 2003-2004 व 2004-2005 चा अनुक्रमे तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व आठवा वार्षिक अहवाल सभागृहसमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचा सन 2008-2009 चा 20 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने धुळे माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचा सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005 व 2005-2006चा अनुक्रमे चौदावा, पंधरावा, सोळावा व सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने धुळे व नंदुरबार जिल्हा माथाडी व असंरक्षित कमगार मंडळ, धुळे यांचा सन 2006-2007 चा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्मभाकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोलापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, सोलापूर यांचा सन 2000-2001, 2001-2002, 2002-2003 व 2003-2004 चा अनुक्रमे बारावा, तेरावा, चौदावा व पंधरावा वार्षिक अहवाल सभगृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ (लासलगांव) यांचा सन 2007-2008 चा 19वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, औरंगाबाद मथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, औरंगाबाद यांचा सन 2007-2008 चा 16 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्याकरिता यांचा सन 2005-2006, 2006-2007 व 2007-2008चा अनुक्रमे 25वा, 26वा व 27वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, औरंगाबाद यांचा सन 2007-2008 चा 6 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ.शी.: संविधान (एकशे नववी सुधारणा) विधेयक.

मु.शी.: संविधान (एकशे नववी सुधारणा) विधेयकाला अनुसमर्थन देण्याची विनंती करणारा महासचिव, लोकसभा यांच्याकडून आलेला संदेश पटलावर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 155(1) अनुसार आपल्या अनुमतीने महासचिव, लोकसभा यांच्याकडून प्राप्त झालेला, संविधान (एकशे नववी सुधारणा) विधेयक, 2009 ला अनुसमर्थन देण्याची विनंती करणारा संदेश त्या विधेयकाच्या प्रतीसोबत सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : संविधान (एकशे नववी सुधारणा) विधेयक, 2009 ला अनुसमर्थन देण्याची विनंती करणारा संदेश त्या विधेयकाच्या प्रतीसोबत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे. विधेयकासह संदेशाच्या प्रती सर्व सदस्यांना त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या टपालखणातून वितरित करण्यात येत आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आज नियम 93 च्या सूचना मी विचारात घेणार नाही. आज प्राप्त झालेल्या आणि उद्या प्राप्त होणाऱ्या नियम 93 अन्वयेच्या सूचना एकत्रितपणे घेण्यात येतील.

पृ.शी./मु.शी.: विशेष उल्लेखाच्या सूचना

सभापती : विशेष उल्लेखाच्या सूचना आज प्राप्त झालेल्या असल्यातरी त्या आज विचारात न घेता उद्या घेण्यात येतील.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सभापती तालिका नामनिर्देशित करणे.

सभापती : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8(1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

(1) श्री.मोहन जोशी

(2) डॉ.वसंत पवार

(3) श्री.चंद्रकांत पाटील

(4) श्री.अरविंद सावंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्येविषयक गुन्हेगार

व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना

आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक.

मु. शी. : L.C.BILL No.VII OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PREVENTION OF DANGEROUS ACTIVITIES OF SLUMLORDS, BOOTLEGGERS, DRUG-OFFENDERS AND DANGEROUS PERSONS ACT, 1981)

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक-7 महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, 1981 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

स**भापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक -7 मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक.

मु. शी. : L.C.BILL No.VIII OF 2009.

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA PROJECT AFFECTED PERSONS REHABILITATION ACT,1999)

श्री.प्रकाश सोळंके (पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक-8 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

स**भापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक -7 मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: प्रादेशिक नियोजन व नगर रचना (तिसरी सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. IX OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966)

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सन 2009 चे वि. प वि क्रमांक - 9 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्र.9 मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) विधेयक

L.C. BILL NO. X OF 2009

(A BILL TO PROVIDE FOR THE PREVENTION OF VIOLENCE AGAINST MEDICARE SERVICE PERSONS AND PREVENTION OF DAMAGE OR LOSS OF PROPERTY OF MEDICARE SERVICE INSTITUTIONS IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (परिवहन, बंदरे, विधि व न्याय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 10-महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा-व्यक्तींबाबत घडणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्र.10 मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XI OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES ACT, 1998.)

श्री भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक-11 महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्र.11 मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

यानंतर श्री जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अनाथालय व अन्य धर्मादायी गृहे (देखरेख व नियंत्रण),विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे सरंक्षण आणि पूर्ण सहभाग) आणि इमारत व इतर बांधकाम मजूर (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.C.BILL NO. XII OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE ORPHANAGES AND OTHER CHARITABLE HOMES (SUPERVISION AND CONTROL) ACT, 1960, THE PERSONS WITH DISABILITIES (EQUAL OPPORTUNITIES, PROTECTION OF RIGHTS AND FULL PARTICIPATION) ACT, 1995 AND THE BUILDING AND OTHER CONSTRUCTION WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 1996, IN THEIR APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA)

श्री. भास्करराव जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 12 अनाथालये व अन्य धर्मादायी गृहे (देखेख व नियंत्रण) अधिनियम,1960 विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, 1995 आणि इमारत व इतर बांधकाम मजूर (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, 1996, हे महराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती :अनुमती देण्यात आली आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक 12 मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>हरकतीच्या मुद्यासंबधी</u>

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सदनाचे गांभीर्य या सरकारला नाही, या सदनाची सरकारकडून वारंवार अवहेलना होते यासंदर्भात आम्ही सतत सभागृहात उल्लेख करीत असतो. आता विधेयक पुर:स्थापनाच्या संदर्भात देखील सदकारकडून या सभागृहाचे गांभीर्य राखले गेलेले नाही. ज्यावेळेस सभागृहात बील इंट्रोडयूस होते त्यावेळी त्या बिलाच्या संदर्भात संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. परंतु काही कारणामुळे संबंधित मंत्री बिलाच्या वेळेस उपस्थित राहू शकले नाही तर कॅबीनेट मंत्री ते बील सभागृहात मांडू शकतात अशी प्रथा आहे. परंतु ज्यावेळेस बील इंट्रोडयूस होते त्यावेळी संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित राहतच नाहीत. वि.प.वि. क्रमांक 12 च्या संदर्भात देखील तसाच प्रकार झ ाल्यामुळे सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. भास्करराव जाधव यांना हे बील येथे इंट्रोडयूस करावे लागले आहे. त्यामुळे सरकारकडून या सभागृहाची अशा प्रकारे वारंवार अवहेलना होणे योग्य नाही, सरकारला या सभागृहाचे गांभीर्य नाही हे यावरुन दिसून येते. हे सरकार बील इंट्रोडयूस करते आणि घाई-घाईने गोंधळात बील पास करुन घेते एवढाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, माझे आदरणीय मित्र श्री. दिवाकर रावते यांनी विधेयकाच्या पुर:स्थापनार्थच्या संदर्भात मी विधेयक मांडले म्हणून हरकत घेतलेली आहे. परंतु मी संसदीय कार्य राज्यमंत्री म्हणून सदर विधेयक मांडलेले आहे एवढेच मला त्यांना सांगावयाचे आहे.

सभापती :ज्यावेळेस विधेयक सभागृहात मांडले जाते त्यावेळेस संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी उपस्थित राहिले पाहिजे किंवा कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्यांनी विधेयक मांडले पाहिजे असा त्यांचा हरकतीचा मुद्दा होता. संबंधित मंत्री काही कारणामुळे सभागृहात उपस्थित राहू शकले नाही तर कॅबिनेट दर्जाचे मंत्री बील मांडू शकतात. परंतु ज्यावेळेस बील सभागृहात मांडले जाते त्यावेळेस संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी ते बील मांडले तर संबंधित मंत्री त्या विधेयकाच्या संदर्भात पार्श्वभूमी देऊ शकतात त्यामुळे ज्या वेळेस मांडले जाईल त्यावेळेस संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी उपस्थित राहण्याचा जरुर प्रयत्न करावा व यासंदर्भाची नोंद घ्यावी.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या ठिकाणी शासकीय विधेयके मांडण्यात आलेली आहेत. आपल्या राज्याची भाषा मराठी आहे. मराठी भाषेचा वापर व्यवस्थितपणे कसा करता येईल या दृष्टीने अधिक लक्ष देण्याची गरज आहे. या बाबतीत मी आपल्याला एक उदाहरण देऊ इच्छितो. विधेयक क्रमांक 12 मध्ये "अनाथालये व अन्य धर्मादायी गृहे" असा उल्लेख करण्यात आलेला आहे त्या ऐवजी "अनाथालये व अन्य धर्मदायी गृहे " असा उल्लेख करावयास पाहिजे होता .तेव्हा अशा प्रकारच्या चुका येथून पुढे होता कामा नयेत या दृष्टीने शासनाने काळजी घ्यावी असे आपण शासानाला सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : ठीक आहे. यानंतर राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला सुरुवात करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

सभापती : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव श्री जयप्रकाश छाजेड यांनी मांडला असून ॲड. उषाताई दराडे यांनी अनुमोदन दिले आहे. सदरहू प्रस्ताव प्रस्तुत झालेला आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेकरिता आज मंगळवार, दिनांक 8 डिसेंबर, बुधवार, दिनांक 9 डिसेंबर व गुरुवार, दिनांक 10 डिसेंबर 2009 रोजी मुख्यमंत्र्यांच्या उत्तराचा एक तास धरुन अंदाजे सुमारे 7 तास एकूण चर्चेकरिता उपलब्ध आहेत. मुख्यमंत्र्यांच्या उत्तरादाखल भाषणाचा एक तास सोडून उर्वरित सहा तासांचा वेळ सदस्यांना भाषणाकरिता उपलब्ध राहील. प्रस्तावकांना 15 मिनिटे देण्यात येतील व प्रस्तावाला पाठिंबा देणारे अनुमोदक 10 मिनिटे भाषण करतील. तसेच विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणासाठी 20 ते 30 मिनिटे देण्यात येतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे आपल्या पक्षाच्या प्रतोदामार्फत माझ्याकडे 10 मिनिटात पाठवावीत. नावे प्राप्त झाल्यानंतर वेळेचे बंधन घालावे काय याचा विचार करता येईल.

या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सन्माननीय सदस्यांकडून काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. सुधारणांची एकत्रित यादी माननीय सदस्यांना मिळाली आहे असे मी समजतो. तसेच सन्माननीय सदस्यांना सुधारणा मांडावयाच्या नाहीत असेही मी समजतो. आता सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी आपले भाषण सुरु करावे.

<u>हक्क भंगाच्या सूचनेसबंधी</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्या चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी मला आपल्याला एक विनंती करावयाची आहे. मी आपल्याकडे हक्क भंगाची सूचना दिली होती. त्यातील विषय अत्यंत महत्वाचा आहे. त्या हक्क भंगाच्या सूचनेला आपण मान्यता दिली आहे किंवा नाही हे मला माहीत नाही परंतु राज्यपालाच्या अभिभाषणावरील चर्चेच्या अगोदर हक्क भंगाच्या सूचने संबंधीचा निर्णय सांगण्यात आला तर तो विषय मार्गी लागेल .त्या विषयावर आज चर्चा होणार नाही तेव्हा

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

या हक्क भंगाच्या सूचनेला मान्यता दिली आहे किंवा नाही याबाबतीत आपण निर्णय द्यावा अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

सभापती : माझ्याकडे हक्क भंगाच्या दोन सूचना देण्यात आलेल्या आहेत.त्यातील एक सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी व इतर सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी या ठिकाणी उपस्थित नाहीत.

श्री.पांडुरंग फुंडकर :मी सुध्दा हक्क भंगाची सूचना दिली आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, संजय केळकर, मधू चव्हाण, केशवराव मानकर, पाशा पटेल जगदीश गुप्ता, रामनाथ मोते, गुरुमुख जगवानी, भगवान साळुंखे, चंद्रकांत पाटील, अशोक मानकर यांनी माननीय मुख्यमंत्री, माननीय गृह मंत्री, मुख्य सचिव यांच्या विरोधात .....

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ...

राम प्रधान समितीच्या अहवालासंबंधात दिलेल्या हक्कभंग प्रस्तावाची सूचना माझ्याकडे आलेली आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी देखील याच विषयाबाबत हक्कभंग प्रस्तावाची सूचना दिलेली आहे आणि ती माझ्याकडे आलेली आहे. याबाबत मी आपणाला इतकेच सांगू इच्छितो की, या संबंधात संबंधितांचे मी स्पष्टीकरण मागविणार असून ते तातडीने मिळवून घेऊन या प्रस्तावाच्या सूचनेबाबत हे अधिवेशन संपण्यापूर्वी मी निर्णय देईन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही दिलेल्या हक्कभंग प्रस्तावाच्या संबंधात आपण संबंधितांकडून स्पष्टीकरण विचारणार आहात आणि त्यानंतर निर्णय देणार आहात व तो निर्णय हे अधिवेशन संपण्यापूर्वी देणार आहात असे आपण सांगितले. ते ठीक आहे. परंतु या विषयाचे गांभीर्य खूप मोठे आहे आणि म्हणूनच मी ते गांभीर्य आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. वस्तुत: 26 नोव्हेंबरला जो मुंबईवर अतिरेकी हल्ला झाला त्या संबंधात मागील नागपूर अधिवेशनामध्ये येथे जी चर्चा झाली त्यात माननीय मुख्यमंत्र्यांनी राम प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती आणि त्या समितीने देखील आपला अहवाल सरकारला दिला होता. तो अहवाल मिळविण्यासाठी मागील अधिवेशनामध्ये जे काही रणकंदन झाले ते सारे आपल्याला माहितीच आहे, आपण ते पाहिलेले आहे. दुर्दैवाने त्या अहवालासंबंधात सरकारने जाहीर केले होते की, जनतेच्या तसेच देशाच्या हिताच्या दृष्टीने राम प्रधान समितीचा अहवाल सभागृहात मांडणे गैर होईल म्हणून तो मांडू नये. त्यावर त्यानंतर एक नागरिक ॲड.श्री.शिंदे यांनी पीआयएल दाखल केली. त्यावर उच्च न्यायालयाने निर्णय देताना सरकारला तो अहवाल न्यायालयापुढे सादर करण्यास सांगितले होते. त्या विरोधात सरकार त्या संबंधात सर्वोच्च न्यायालयात गेले. त्या ठिकाणी सरकारने आपली बाजू काय मांडली आणि सर्वोच्च न्यायालयाला आपली बाजू कशी काय पटवून दिली ते आम्हाला माहिती नाही पण सर्वोच्च न्यायालयाने सरकारची बाजू मान्य करून त्याला स्थगिती दिली. त्यावरून आमचे त्या संबंधातील म्हणणे हे अयोग्य होते असे लक्षात आले. परंतु त्यानंतर हा अहवाल लोकांपर्यंत आला, जनतेपर्यंत आला आणि त्या प्रती लोकांपर्यंत वाटल्या गेल्या आहेत. काल माननीय मुख्यमंत्र्यांनी चहापानानंतर जी वार्ताहर परिषद घेतली त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री श्री.भुजबळ साहेब हे त्यांच्या शेजारीच बसले होते. मात्र त्यात हा विषय काढला गेला असता माननीय मुख्यमंत्र्यांनी 'मला त्याची माहिती नाही' असे सांगितले. म्हणूनच

.... एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

आम्ही आज सकाळी माननीय मुख्यमंत्र्यांना सदर अहवालाची जी प्रत आम्हाला उपलब्ध झाली होती ती आमच्या सह्या करून दिली. माननीय मुख्यमंत्र्यांचे या अहवालाबाबत म्हणणे होते की, सरकारकडून सदरहू अहवाल फुटणे शक्यच नाही. कारण त्याच्या केवळ चारच प्रती होत्या. त्यातील एक प्रत मानीय मुख्यमंत्री यांच्याकडे, दुसरी प्रत मुख्य सचिवांकडे, एक प्रत गृह सचिवांकडे आणि एक प्रत आयजी यांच्याकडे होती आणि या कोणाकडूनही ती बाहेर मिळणे शक्य नाही. पण आता तर हा अहवाल बाहेर उपलब्ध झालेला आहे, अनेक प्रती बाहेर मिळालेल्या आहेत. लोकांपर्यंत या अहवालाच्या शेकडो प्रती गेलेल्या आहेत. वेबसाईटवर देखील तो अहवाल आलेला आहे. तर मग हा अहवाल असा फुटला कसा ? ही एक अतिशय गंभीर बाब आहे. सभापती महोदय, आता या अधिवेशनासाठी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, गृह सचिव, मुख्य सचिव वगैरे सारे येथेच आलेले आहेत. तेव्हा हा राम प्रधान समितीचा अहवाल राज्याच्या, देशाच्या संरक्षणाच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाचा आणि गंभीर आहे असे सरकारला वाटत असेल तर हा अहवाल बाहेर आला कसा आणि इतकेच नाही तर त्याच्या प्रती बाहेर सहज उपलब्ध झाल्यामुळे त्यावर 25 तज्ज्ञांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत. त्यावरून पोलिसांमध्ये एक प्रकारे गँगवॉर सुरू झाले वा होईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एकंदर परिस्थिती पाहता सरकारनेच हा अहवाल प्रसिद्ध केलेला आहे असे वाटते. इतकेच नव्हे तर त्या आधारे 26 नोव्हेंबरच्या अतिरेकी हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या वीराच्या पत्नीने एक पुस्तक लिहिले असून त्यातून या अहवालाची चिरफाड केलेली आहे. त्यामुळे माझी या निमित्ताने आपल्याला आग्रहाची विनंती आहे की, या अधिवेशनातच अगदी एक दोन दिवसातच आपण या हक्कभंग सूचनेवर आपला निर्णय द्यावा. देशाच्या हिताच्या दृष्टीने असे काही कोणी करीत असेल तरसरकारची त्या संबंधात काय भूमिका आहे हे आम्हाला येथे कळले पाहिजें. यासाठी आपण याबाबत एक दोन दिवसात निर्णय द्यावा. बाकी या विषयावर आम्ही योग्य वेळी सविस्तर चर्चा उपस्थित करूच.

(यानंतर श्री. सरफरे ... एन 1 ..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हक्कभंगाचा प्रस्ताव दिला आहे त्याप्रमाणे आम्ही सुध्दा हक्कभंगाचा प्रस्ताव दिला आहे. मागील अधिवेशनामध्ये प्रधान समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवावा अशी आग्रहाची मागणी विरोधी पक्षाच्या वतीने करण्यात आली होती. परंतु त्यावेळी ॲक्शन टेकन रिपोर्ट ठेवला गेला, अहवाल ठेवला गेला नव्हता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रधान समितीचा अहवाल पुढील अधिवेशनामध्ये सभागृहापुढे ठेवला जाईल असे सांगितले होते. सभापती महोदय, खरे म्हणजे काही ठराविक लोकांच्या ताब्यात हा अहवाल असतो. तो सभागृहामध्ये ठेवण्याचे आश्वासन दिल्यानंतर तो फुटतो, सभागृहाबाहेर प्रसिध्द होतो, एखाद्या वाहिनीवरुन तो जनतेला दाखविला जातो, त्यावर जनतेमध्ये चर्चा होते. आज तर एका वेबसाईटवर हा अहवाल प्रसिध्द करण्यात आला आहे. असे असतांना हे सरकार अहवाल बाहेर गेलेला नाही असे सांगत आहे. हा अहवाल तीन-चार लोकांच्या कस्टडीमध्ये असतांना तो वेबसाईटवर गेलाच कसा? असे अनेक प्रश्न अनुत्तरीत रहातात. हा अहवाल सभागृहामध्ये मांडण्यापूर्वी जर तो सभागृहाबाहेर प्रसिध्द झाला असेल तर तो या सभागृहाचा हक्कभंग आहे. म्हणून या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, मुख्य सचिव, गृह विभागाचे सचिव यांच्या संदर्भात आम्ही हक्कभंगाची नोटीस दिलेली आहे. म्हणून मला असे वाटते की, हा विषय याच आठवडयात आपण सभागृहापुढे आणल्यास त्यावर चर्चा होईल आणि त्यामधून सत्य बाहेर येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला याठिकाणी दोन महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी परवा पत्रकारांना सांगितले की, बाहेर फुटलेला अहवाल तोच कशावरुन? त्यामुळे याबाबतीत दोन मुद्दे उपस्थित होतात. जर हा तो अहवाल नसेल आणि कुणीतरी सवंग लोकप्रियतेसाठी नसलेला अहवाल प्रसिध्द केला असेल तर तो गंभीर स्वरुपाचा गुन्हा आहे. त्याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट झाली पाहिजे.

दुसरा मुद्दा असा की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या म्हणण्याप्रमाणे फुटलेला अहवाल तो नाही. तरीसुध्दा वाहिनीवरुन किंवा वर्तमानपत्रामधून तो प्रसिध्द होत असेल तर त्यामुळे शासनाची अब्रू जाण्याची वेळ आलेली आहे. आणि तोच अहवाल प्रसिध्द झाला असेल तर कुणी अधिकाऱ्यांनी तो बाहेर फोडला काय? कुणाला त्याबाबत मोह झाला काय? विरोधी पक्षाकडील कोणत्याही माननीय सदस्यांकडे त्या अहवालाची प्रत नव्हती. त्या अहवालाच्या फक्त चारच प्रती होत्या याचा उल्लेख माननीय सदस्य श्री. दिवाकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण...

रावते यांनी केला. तर मग शासनामधील कुणीतरी हे काम केले असेल तर आपल्या शासनाच्या विरोधात कुणी गुन्हा करणे शक्य नाही. ते लॉजिकला धरुन होत नाही. आणि म्हणून हा अहवाल प्रसिध्द कसा झाला? याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दिलेला हा अहवाल आहे. याबाबतीत तुमचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाने मान्य केला आहे. आणि तो अहवाल प्रसिध्द करण्याचा आग्रह बरोबर नाही, तो प्रसिध्द केला नाही तरी चालेल असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे तो अहवाल बाहेर कसा प्रसिध्द झाला? यादृष्टीने या सभागृहामध्ये देण्यात आलेला हक्कभंगाचा प्रस्ताव योग्य आहे असे मला वाटते.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण खूप मोठा गाजावाजा करीत माहितीचा अधिकार या देशामध्ये आणि राज्यामध्ये मान्य केला. आज विधीमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना एका बाजूला "हू किल्ड करकरे" आणि दुसऱ्या बाजूला विनिता कामटे यांचे प्रसिध्द झालेले पुस्तक, आणि खासकरुन त्यामध्ये कामटे यांच्या मृत्यूबाबत उपस्थित केलेले प्रश्न या विषयी चर्चा सुरु आहे. अशावेळी महाराष्ट्रामध्ये नव्हे तर संपूर्ण भारतामध्ये सर्वात अज्ञानी बालके कोण? तर ते विधानसभेचे आणि विधानपरिषदेचे आमदार, अशी परिस्थिती समाजामध्ये दिसत आहे. प्रधान समितीच्या अहवालाच्या माध्यमातून कृती अहवाल तयार करण्यात आला तो तसा कां करण्यात आला? या विषयाला एक वर्ष झाले तरी त्याबाबत समाधानकारक चर्चा झालेली नाही. म्हणूनच या हक्कभंगाच्या निमित्ताने अहवाल फुटण्यामागील सत्य आणि त्यादृष्टीने करावयाच्या कारवाई संदर्भात आपण लक्ष घालून हक्कभंग ताबडतोब दाखल करुन घ्यावा. आणि त्या संदर्भातील सत्य आमच्यासमोर यावे अशी मी मागणी करते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, याठिकाणी उपस्थित करण्यात आलेला हक्कभंगाचा विषय मला जास्त महत्वाचा वाटतो. याबाबतीत माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपली भूमिका मांडली आहे. ज्या दिवशी प्रधान समितीचा अहवाल दूर चित्रवाहिनीवरुन प्रसिध्द करण्यात आला त्या दिवशी महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांची नियुक्ती करण्यात आली. त्या दिवशी हा अहवाल फुटला त्याच्याशी संबंध आहे काय? आज ज्याप्रमाणे आयपीएस अधिकाऱ्यांमध्ये वॉर सुरु आहे त्याप्रमाणे आयएएस अधिकाऱ्यांमध्ये सुध्दा वॉर आहे. त्यामधून हा अहवाल लिक झाला काय? तसेच, विधीमंडळाच्या अधिवेशनाच्या पूर्व संध्येला हा अहवाल लिक झाल्यामुळे यामध्ये राजकीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री.विनोद तावडे....

पक्षाच्या आपापसातील युध्दामुळे हे होत असते. आणि त्यामधून आमचा हक्कभंग होत असेल तर त्याची आम्हाला काळजी वाटते. हा अहवाल ब्युरॉक्रॅटमधील वॉरमुळे की पोलिटिकल वॉरमुळे बाहेर आला ? कशामुळे अहवाल बाहेर आला? असे जर होणार होते तर मग तो अगोदर का बाहेर आला नाही? याचे कारण दिल्लीमधील एका राजदीप नावाच्या माणसाकडे तो अहवाल गेला. त्याची येथील एका नेत्याबरोबर आदल्या दिवशी भेट झाली होती. ती आम्हाला एका कार्यक्रमामध्ये दिसली. त्यानंतर त्याच्या हातामध्ये तो अहवाल पोहोचतो. यावरुन आम्ही अहवाल फुटण्याची लिंक लावतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, राम प्रधान समितीचा रिपोर्ट जो शासनाने जाहीर केलेला नाही, त्याबाबतीत उच्च न्यायालयाने, सर्वोच्य न्यायालयाने स्टे दिलेला आहे. परंतु राम प्रधान समितीचा अहवाल सभागृहासमोर न आणता, सभागृहामध्ये आम्हाला त्यावरील ॲक्शन टेकन रिपोर्ट देण्यात आला. हा ॲक्शन टेकन रिपोर्ट आहे की ॲक्शन टू बी टेकन रिपोर्ट आहे ? असा प्रश्न आहे. जर हा ॲक्शन टू बी टेकन रिपोर्ट असेल तर त्याच्यामध्ये ज्या बऱ्याचशा गोष्टींचा उल्लेख केलेला आहे, त्यातील काही ॲक्शन शासनाने ऑल रेडी घेतलेल्या आहेत. जर या अहवालाला स्थगिती दिली असेल तर त्या अहवालाच्या अनुषंगाने ज्या ॲक्शन्स् घेतलेल्या आहेत, त्या कारवाईस स्थगिती देणार आहात काय ? त्यामुळे ही बाब अतिशय महत्वाची आहे की, सदरहू अहवाल गुप्त ठेवलेला आहे आणि त्यावरील कारवाई सुरु केलेली आहे. पण जोपर्यंत अहवाल काय आहे हे समजत नाही तोपर्यंत ही कारवाई कोणत्या कारणास्तव सुरु झालेली आहे ? ती कारवाई योग्य आहे की अयोग्य आहे हे कळणार नाही आणि त्यामुळे तो अहवाल ताबडतोब प्राप्त होणे अत्यंत गरजेचे आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सकाळी याचसाठी सकाळी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हक्कभंग प्रस्ताव दिलेला आहे. मी माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, दिनांक 26-11-2008 रोजी घटना घडल्यानंतर या राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, गृह मंत्री यांना बदलण्यात आले, एवढी ही गंभीर बाब आहे. या अहवालामध्ये विद्यमान गृहमंत्री यांच्यावर आक्षेप घेण्यात आले आहेत असे आम्ही ऐकत आहोत आणि वाचत आहोत आणि तेच पुन्हा या राज्याचे गृहमंत्री झालेले आहेत. म्हणून राज्यामध्ये होणारे अतिरेकी हल्ले लक्षात घेता राज्याच्या संरक्षणासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे आणि त्यादृष्टीकोनातून गृहमंत्री हे महत्वाचे पद आहे. आम्ही म्हणतो की, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब हे चांगले व स्वच्छ आहेत, परंतु राम प्रधान समितीने अहवालामध्ये त्यांच्यावर जर आक्षेप घेतला असेल तर त्याच्याबाबतीत चर्चा झाली पाहिजे. म्हणून याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी जो हक्कभंग दिलेला आहे, त्याला मी पाठिंबा देतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एक दुरुस्ती करावयाची आहे. सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, राम प्रधान समितीच्या अहवालामध्ये विद्यमान माननीय गृहमंत्र्यांवर आक्षेप घेतला

. . . .ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे असे समजते. मला तर असे समजते की, त्या पूर्वीच्या माननीय उप मुख्यमंत्र्यांवर, गृह मंत्र्यांवर देखील आक्षेप घेतलेला आहे.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते ने जो विशेषाधिकार भंग की सूचना दी है तथा उस पर अन्य माननीय सदस्यों ने जो कुछ कहा है, वह आपके अधिकार क्षेत्र में आता है और आप उस पर निर्णय लीजिए. लेकिन इस सभागृह का सदस्य होने के नाते मुझे भी इस बात की बड़ी चिन्ता है कि राम प्रधान समिति की रिपोर्ट सभागृह में पेश नहीं हुई है, वह बाहर कैसे लीक हो गई ? हमारे विरोधी पक्ष के माननीय सदस्य कह रहे हैं कि राम प्रधान समिति की रिपोर्ट लीक हो गई है और वह वेब साइट पर आ गई है. यह रिपोर्ट 2 दिन के अन्दर वेब साइट पर आई होगी तो मुझे नहीं मालूम, लेकिन उसके पहले यह रिपोर्ट वेब साइट पर उपलब्ध नहीं थी. विधान परिषद के एक सदस्य के नाते मैं माननीय मुख्य मंत्री जी और उप मुख्य मंत्री जी से यह माँग करना चाहता हूँ कि इस मामले की जाँच होनी चाहिए, डिपार्टमेंटल इन्क्वायरी होनी चाहिए कि यह रिपोर्ट कैसे लीक हुई. यह रिपोर्ट केवल विरोधी पक्ष के माननीय सदस्यों के हाथ में गई और हमारे पास नहीं आई, इस बात की भी जाँच होनी चाहिए. मेरी आपसे इतनी ही विनंती है.

सभापती : माझ्याकडे आलेल्या दोन्ही हक्कभंगाच्या प्रस्तावाबाबत मी जरुर माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री, राज्याचे मुख्य सचिव आणि श्री.राम प्रधान यांच्याकडून याबाबतील वस्तुस्थितीचा रिपोर्ट तातडीने मागविण्यात येईल. तो रिपोर्ट आल्यानंतर अधिवेशन संपण्यापूर्वी मी याबाबतीतील माझा निर्णय जरुर जाहीर करीन.

. . . .ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

मु.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री.जयप्रकाश छाजेड (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

महाराष्ट्राचे राज्यपाल मा.एस.सी.जमीर यांनी दिनांक 11 नोव्हेंबर 2009 रोजी महाराष्ट्र विधान मंडळ मुंबई येथील संयुक्त अधिवेशनात केलेल्या अभिभाषणास पाठिंबा देण्यासाठी व त्यांचे अभिनंदन करण्यासाठी हा ठराव मांडलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकारने केलेल्या कामामुळे खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील जनतेने या सरकारला बहुमताने नेतृत्व देऊन पुन्हा हे राज्य विश्वासाने त्यांच्या हाती सोपविलेले आहे. यामधूनच जनतेने सरकारचे अभिनंदन केलेले आहे आणि त्याबद्दल जनतेलाही सरकारने धन्यवाद देणे गरजेचे आहे.

यानंतर कु.थोरात . ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे 14:40

श्री. जयप्रकाश छाजेड.....

गेल्यावर्षी झालेल्या 26.11 च्या दहशतवादी हल्याच्या पार्श्वभूमीवर या राज्यातील सामान्य जनतेमध्ये सुरक्षिततेचे व विश्वासाचे वातावरण निर्माण व्हावे व दहशतवाद्यांना दहशत बसावी म्हणून सरकारने पोलीस दलाला अत्याधुनिक शस्त्रसामुग्रीने सुसज्ज केलेले आहे त्याच बरोबर केंद्राच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे की त्यांनी दहशतवादी हल्ल्याच्या विरोधी लढा देण्यासाठी शक्तीशाली अशी फोर्स वन या नवीन दलाची स्थापना केलेली आहे.

देशामध्ये महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे. त्यांनी दहशतवादी विरुध्द दल तयार केलेले आहे. सागरी किनाऱ्यावर होणारा हल्ल्याचा धोका लक्षात घेऊन सागरी किनारपट्टीवर लक्ष ठेवण्यासाठी 29 स्पीड बोटी देखील पुरविण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे राज्यामधील नक्षलवादी क्षेत्रात काम करणाऱ्या पोलीस दलास स्वतंत्र पॅकेज देण्यात आलेले आहे. या विभागातील आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी विभागाला जवळपास 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

आज आपण सर्वजण विदर्भात आलेलो आहोत. विदर्भातील नागपूर अधिवेशनामध्ये पहिल्या दिवशी बोलतांना मला अभिमानाने सांगितले पाहिजे की, विदर्भातील गोसीखुर्द या सिंचन प्रकल्पाचा राज्य सरकारने पाटठपुरावा करुन केंद्र सरकारने याला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे या प्रकल्पास जवळपास 90 टक्के रक्कम केंद्रीय सहाय्य म्हणून मिळणार आहे. राज्य सरकारने विदर्भ आणि मराठवाडयातील सर्व भागातील सिंचनामधील अनुशेष भरुन काढण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्यामुळे सिंचन क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी विदर्भासाठी 788 कोटी व मराठवाडयासाठी 149.20 कोटी रुपयाची तरतूद केली आहे. तंत्र शिक्षण क्षेत्रातील संपूर्ण अनुशेष दूर करण्यासाठी 40 कोटी व आरोग्य क्षेत्रासाठी जवळपास 518 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याबद्दल हे सरकार अभिनंदनास पात्र आहे.

औद्योगिक विकासासाठी महाराष्ट्र हे देशामध्ये अग्रेसर राज्य गणले गेलेले आहे व शासनाने प्रयत्नपूर्वक उद्देश डोळयापढे ठेवून पुढील 5 वर्षामध्ये दोन कोटी 50 लाख रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्यामुळे राज्यातील सुमारे 5 लाख भूमिपुत्रांना रोजगार पुरविला जाईल त्यामुळे या राज्यातील बेकारी कमी होण्यास मदत होणार आहे म्हणून हे सरकार अभिनंदनास पात्र आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड...

महाराष्ट्राची राजधानी असलेल्या, देशाच्या आर्थिक विकासाची राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनविण्याचा संकल्प करुन मुंबई महानगर प्रदेशमध्ये मेट्रो रेल्वे, मनोरे, मुंबई ट्रान्स हारबर लिंक इ. प्रकल्प सुरु केलेले आहेत. त्याच बरोबर जून महिन्यामध्ये देशाला अभिमान वाटावा असा राजीव गांधी वांद्रे-वरळी सागरी सेतुचे उद्घाटन करुन सरकारने महाराष्ट्रातील तसेच मुंबईच्या जनतेला एक भेट दिली आहे.

नागपूर येथील मिहान प्रकल्प जलदरीतीने पूर्ण करण्याकरिता सरकार प्रयत्नशील आहे. नागपूर ही राज्याची उपराजधानी असल्यामुळे नागपूरचा फार मोठया प्रमाणात विकास होणार आहे.

महाराष्ट्र झोपडीमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने गरीब माणसाकरिता 2 लाख 58 हजार कच्च्या घरांच्या बांधकामाला मंजुरी दिलेली आहे. धारावीच्या पूर्ण विकास करण्यासाठी सरकार बांधील आहे.व राज्याला झोपडी मुक्त करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने घोषित केलेल्या राजीव आवास योजनेमध्ये राज्य सरकारने सहभागी होण्याचे ठरविले आहे. त्यामुळे कालबध्द कार्यक्रम ठरवून हे राज्य झोपडीमुक्त करण्यात येईल व झोपडपट्टीवासीय गरीब माणसाला स्वतःच्या मालकीच्या घरात राहण्याचे त्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असल्यामुळे या सरकारचे अभिनंदन केले पाहिजे.

राज्य सरकारने या राज्याला सन 2012 पर्यंत भारनियमनमुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे व त्याकरिता जवळपास 27 हजार पेक्षा जास्त कोटी रुपयाच्या खर्चाच्या योजनेसाठी तरतूद केलेली आहे. संकल्प करुन व कालबध्द कार्यक्रम आखून भविष्यामध्ये सन 2012 मध्ये या राज्याला भारनियमनमुक्त करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे याबद्दल देखील सरकारचे अभिनंदन करावे लागेल. अनुसूचित जाती जमाती व नवबौध्द यांच्या करिता गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी 928 कोटी रुपयांची तरतूद केली व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी जवळपास 1200 कोटी रुपयाची फी ची प्रतीपूर्ती करणाऱ्या, व शेती कसणाऱ्या आदिवासींना जमीन मिळवून देण्यासाठी वनहक्क अधिनियम अमलबजावणी, अल्प संख्यांकांना प्रशिक्षण देऊन अंतर्गत पूर्तता करण्यासाठी विशेष मोहीम यामुळे या राज्यातील मागासवर्गीय, दलित वर्ग यांचा आर्थिक स्थर सुधारण्यासाठी मदत होणार आहे. ग्लोबल वार्मिंगचा धोका

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड....

लक्षात घेऊन व हवामानातील बदल व त्याचे राज्याच्या पर्यावरणावर होणारे प्रतिकुल परिणाम विचारात घेऊन त्याचा अभ्यास करण्यासाठी नोबेल पुरस्कार प्राप्त विख्यात शास्त्रज्ञ डॉ. आर.के.पचोरी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून राज्याकरिता ठोस कृती आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल सन्मानाने काही सांगण्याची शासनाची तयारी नाही हे आम्ही आता या ठिकाणी बघत आहोत. काही बाबी उधृत करताना आपण वाचून दाखवतो हे ठीक आहे परंतु सन्माननीय सदस्य संपूर्ण भाषण वाचून दाखवित आहेत. याचा अर्थ माझे सरकार, माझे सरकार, माझे सरकार याबाबत कौतुक करण्याच्या बाबतीत सुध्दा त्यांची अशी परिस्थिती झालेली आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल सन्मानाचे भाषण कसे असावयास पाहिजे ? ते भाषण अस्खलित असावयास पाहिजे. माझे सरकार कसे आहे हे त्यांनी सांगावयास पाहिजे. भाषण कोणी तरी लिहून दिले आहे किंवा सन्माननीय सदस्यांनीच लिहून काढले आहे आणि ते कसे तरी वाचले जात आहे. सभागृहामध्ये अशी पध्दत नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी आपली क्षमा मागतो. सन्माननीय सदस्य नवीन आहेत त्यामुळे आपण समजून घ्यावे.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मला असे वाटते की, केवळ वक्तृत्वावर राज्य आणता येत नाही हे सन्माननीय सदस्यांना कळलेले आहे. 'माझे सरकार' या विषयावर मी उत्तम पध्दतीने बोलू शकतो. कारण जनतेने आमच्याच शब्दांवर विश्वास ठेवून या राज्यामध्ये पुन्हा आमचे सरकार आणले आहे याची आपण नोंद ठेवावी. माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केलेले आहे त्यामध्ये राज्य सरकारने सामान्य माणसाकरिता ज्या योजना आखलेल्या आहेत त्याचे प्रतिबिंब उमटलेले आहे. जनतेमध्ये विश्वास निर्माण केलेला आहे. हे मुद्दे मी एवढ्याकरिताच मांडले की, या सभागृहाच्या माध्यमातून जे प्रसिध्दीला जाते त्यामध्ये बोलताना काही चुकीचे जाऊ नये म्हणून मी हातामध्ये भाषण घेऊन वाचलेले आहे हे सन्माननीय सदस्यांनी लक्षात ठेवावे. 26/11 ची घटना असेल किंवा 26/11 पासून फयानपर्यंत राज्य सरकारने ज्या जबाबदारीने काम केले आणि या राज्यातील जनतेला आश्वासित करण्याचे काम केले, फयानसारख्या आलेल्या भयानक वादळानंतर देखील ज्या पध्दतीने राज्य शासन या राज्यामध्ये उभे राहिले आणि सामान्य माणसाला जो विश्वास दिला त्याची आपण नोंद ठेवावी. आम्हालाही उत्तम बोलता येते म्हणूनच या सभागृहामध्ये आम्हाला पाठविलेले आहे याची सन्माननीय सदस्यांनी नोंद ठेवावी. आम्ही उत्तम पध्दतीने बोलू शकतो आणि आपल्याला भारी पडू शकतो याची आपण नोंद ठेवावी.

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड .....

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडताना सांगेन की, महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषेचा सर्वांना अभिमान आहे, या राज्यामधील सामान्य माणसाला अभिमान आहे पण भाषेच्या प्रश्नावर राजकारण करण्याऐवजी मराठी भाषा कशी समृध्द आणि परिणामकारक करता येईल याबद्दल देखील राज्य शासनाने जी भूमिका घेतलेली आहे त्याबद्दल राज्य शासन आणि माननीय राज्यपाल अभिनंदनास पात्र आहेत. सत्ताधारी पक्षाच्या संयुक्त जाहीरनाम्याव्दारे जी आश्वासने जनतेला दिलेली आहेत त्या आश्वासनांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने हे सरकार वचनबध्द आहे हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सिध्द झालेले असल्यामुळे मी माननीय राज्यपाल महोदयांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना एवढ्याकरिताच जागे केले की, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे या ठिकाणी उपस्थित आहेत. ते आपल्या पक्षाचे अध्यक्ष आहेत. पाच जागा अजून भरावयाच्या बाकी आहेत. ते परफॉर्मन्स बघत आहेत. म्हणून मी आपल्याला सांगितले.

सभापती : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला होता आणि त्या प्रस्तावावरील सन्माननीय सदस्यांचे भाषण संपल्यानंतर या अभिभाषणावरील चर्चा आज या ठिकाणी आपण थांबवित आहोत. उद्या आणि परवा चर्चा आणि उत्तर होणार आहे. त्यामुळे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आपण नंतर घेऊ. आज फक्त ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रस्ताव मांडला होता त्यांच्या भाषणालाच परवानगी दिली.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 39 व्या अभ्यास वर्गासंबंधी घोषणा

सभापती : आपणा सर्वांना विदित आहेच की, राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे दरवर्षी नागपूर येथील अधिवेशन कालावधीत राज्यातील विद्यापीठांतील "राज्यशास्त्र व लोकप्रशासन" या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संसदीय अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार या वर्षी सुध्दा दिनांक 9 ते 16 डिसेंबर, 2009 या कालावधीत 39 व्या संसदीय अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर अभ्यास वर्गाचे उद्घाटन माननीय मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते बुधवार, दिनांक 9 डिसेंबर, 2009 रोजी सकाळी 9.00 वाजता, विधान परिषद सभागृह, विधान भवन, नागपूर येथे होणार आहे. यासंबंधीची निमंत्रण पत्रिका व अभ्यासवर्गाची कार्यक्रमपत्रिका सर्व सदस्यांना टपाल खणाव्दारे वितरित करण्यात आली आहे. तरी सर्व माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उद्घाटन सोहळ्यास तसेच संसदीय अभ्यास वर्गास उपस्थित राहून व्याख्यानांचा लाभ घ्यावा.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: फयान वादळामुळे कोकणात झालेले प्रचंड नुकसान

मु.शी.: फयान वादळामुळे कोकणात झालेले प्रचंड नुकसान या विषयावर सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, उल्हास पवार, अरुण गुजराथी, जयप्रकाश छाजेड, श्रीमती उषा दराडे श्री. संजय दत्त, डॉ. वसंत पवार, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री मोहन जोशी, हेमंत टकले, राजन तेली, श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री एन.पी. हिराणी, चरणसिंग सप्रा, सुभाष चव्हाण, पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.सय्यद पाशा पटेल, डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात विशेषत: कोकणात दिनांक 11 ते 13 नोव्हेंबर, 2009 मध्ये फयान वादळामुळे सुमारे 72 हजार हेक्टर वरील पिकांचे झालेले नुकसान, 5 ट्रॉलर्स, 35 हून अधिक बोटी व 65 होड्या समुद्रात भटकत असून त्यांचा शोध न लागणे, त्यावरील 78 खलाशी बेपत्ता असणे, विटभट्टयांचे झालेले प्रचंड नुकसान, फयान वादळात सुमारे हजारो कोटी रुपयांचे न भरुन येणारे नुकसान, कोकणात 4 व्यक्तींचा तर पुण्यात 1 जणाचा मृत्यू होणे, विशेषत: रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या कोकणातील जिल्ह्यांच्या किनारपट्टीवर तुफानी चक्रीवादळात घरे, शेती, फळबागायत, नारळ, आंबा, काजू, सुपारी तसेच वनसंपत्ती यांचे झालेले अतोनात नुकसान, विदर्भ तसेच मराठवाडा खानदेश, पश्चिम महाराष्ट्र या तीन विभागातील धान, कापूस, ऊस, केळी, तसेच इतर रब्बी पिंकाचे व घरांचे मोठ्या प्रमाणात झालेली हानी, पश्चिम महाराष्ट्रातील विशेषत: पुणे, नाशिक, सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर इत्यादी जिल्ह्यात द्राक्ष, डाळिंब या फळांची तसेच कांदा, टोमॅटो, बटाटा, फळभाज्या, पालेभाज्या आणि गहू, हरभरा, कांदा, ज्वारी इ. रब्बी पिकांचेही अतोनात नुकसान होणे, सदर फयान वादळात संपूर्ण राज्यात विशेषत: कोकण विभागात वीज,

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी.....

पाणी, टेलिफोन इत्यादी सुविधा कोलमडणे, विजेच्या अभावाने शेतीचे पंप चालू नसल्याने बागायत व पिण्याच्या पाण्यासाठी शेती बागायतदारांना वणवण करावी लागणे, जीवनावश्यक वस्तू आणि धान्य यांच्या पुरवठ्यावर विपरित परिणाम होणे, अद्यापही आपदग्रस्तांचे किती नुकसान झाले याचे सर्व्हेक्षण न होणे, शासनाकडून आपदग्रस्तांना पुरेशी आर्थिक मदत अद्यापही न मिळणे, त्यामुळे स्थानिक शेतकरी तसेच रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष व असुरक्षिततेची भावना वाढीस लागणे, समुद्रात मृत पावलेल्या मच्छिमार कुटुंबियांना तसेच हवालदिल झालेल्या जनतेला तातडीने आर्थिक मदत करुन त्यांना दिलासा देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये सभागृहासमोर प्रस्ताव मांडला आहे. या विषयावर आम्ही देखील नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. हे दोन्ही प्रस्ताव आपण एकत्रित केलेले आहेत. त्यामुळे नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील नावे सुध्दा या प्रस्तावात समाविष्ट करावीत. आपण नियम 289 अन्वये आम्ही दिलेला प्रस्ताव वेगळया स्वरुपात स्वीकारला त्याबद्दल आम्ही आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती : दोन्ही प्रस्तावावरील सन्माननीय सदस्यांची नावे नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावात समाविष्ट केलेली आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी सूचना केली आहे त्याबाबत सत्ताधारी पक्षाकडून काहीच हरकत नाही. विरोधी पक्षाच्यावतीने या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्ताव देण्यात आला होता. परंतु याच विषयावर नियम 260 अन्वये प्रस्ताव आम्ही अगोदर दिलेला आहे. त्यामुळे या विषयावर एकत्रितपणे चर्चा घेण्याचे आम्हाला मान्य आहे.

सभापती महोदय, गेल्या सहा महिन्यांमध्ये निरनिराळया नावाची सहा चक्री वादळे अरबी समुद्र व बंगालचा उपसागर याठिकाणी कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे झाली.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी....)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

या कमी दाबाच्या पट्टयामुळे गेल्या 6 महिन्यामध्ये संपूर्ण देशाला चक्रीवादळाचा पाच-सहा वेळा फटका बसल्याचे आपण पाहिलेले आहे. हे वारे समुद्रामध्ये 35 ते 70 कि.मी. वेगाने वाहतात आणि त्यामुळे समुद्र भयंकर रौद्ररुप धारण करतो. परिणामी समुद्र किनारी राहाणा-या मच्छिमार लोकांना त्या वादळाचा मोठा फटका बसतो. त्यांच्या जीवित व मालमत्तेचे कसे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते हे आपण फयान वादळाच्या निमित्ताने अनुभवलेले आहे. या फयान वादळामुळे सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयात फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सुदैवाने हे फयान वादळ गुजराथच्या बाजूला वळल्यामुळे ठाण्याला त्याचा जो मोठा तडाखा बसणार होता तो बसला नाही. त्यामुळे मोठी जीवित आणि वित्त हानी टळली. या फयान वादळामुळे सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड या भागामध्ये प्रचंड प्रमाणावर हानी झालेली आहे. समुद्र किनारी राहाणा-या मच्छिमार बांधवांवर तर अस्मानी संकट कोसळले आहे. कित्येक कुटुंबे अनाथ झालेली आहे. कोकण हा मागासलेला भाग, अनुशेषग्रस्त भाग आहे. या अनुशेषग्रस्त भागात मच्छिमार बांधव राहातात. या अनुशेषग्रस्त भागाला मदत देण्याच्या बाबतीत शासनाचे दुर्लक्ष होते. अन्य भागाला मदत दिल्यानंतर जी काही थोडीशी शिल्लक राहाते ती कोकणाच्या वाट्याला देण्याचा प्रयत्न केला जातो आणि ती मदत देखील आमचे मंत्री असोत वा अधिकारी असोत, वेळेवर देत नाहीत. नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्यांच्या शेतीचे आणि मालमत्तेचे नुकसान झालेले असते त्यांना वेळेवर नुकसान भरपाई दिली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. अवेळी पावसामुळे कोकणातील आंबापिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. परंतु अजूनपर्यन्त नुकसान भरपाईचे वाटप पूर्णपणे झालेले नाही. सभापती महोदय, गेल्या सात-आठ वर्षामध्ये या कोकणपट्टीतील नैसर्गिक समतोल बिघडलेला असल्याचे दिसून येते. अवेळी पावसामुळे शेतीचे, फळपिकाचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झलेले आहे. अवेळी पावसामुळे आंब्याचा मोहोर गळून पडतो आणि त्याचा परिणाम आंबा पिकावर होतो. अशा या नैसर्गिक प्रकोपाचा कोकणातील शेतक-यांना, मच्छिमारांना सामना करावा लागत आहे. या अनुशेषग्रस्त भागातील लोक अत्यंत गरीब असून दारिद्र्याने पिचलेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये निसर्गाची साथ मिळावी अशी त्यांची अपेक्षा असते. परंतु ती अपेक्षा देखील फोल ठरते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...)

सभापती महोदय, या फयान वादळाचा फटका कोकण किनारपट्टीला बसला त्यावेळी किनारपट्टीवर राहाणा-या मच्छिमार लोकांची घरेदारे उद्ध्वस्त झाली, त्यांच्या होड्यांची मोडतोड झाली, समुद्रमध्ये मच्छिमारांसहीत होड्या आणि ट्रालर्स बेपत्ता झाले, समुद्रामध्ये मच्छिमारीसाठी गेलेले मच्छिमार घरी परत येऊ शकले नाहीत. ज्या मच्छिमारांची प्रेते समुद्रात तरंगत होती ती प्रेते घेण्यासाठी सुध्दा परवानगी लागत होती.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुळकर्णी.....

कस्टम विभागाचे अधिकारी म्हणतात की, आम्ही प्रेते काढणार नाही, आम्हाला तो अधिकार नाही. पोलीस म्हणतात, आमच्याकडे प्रेते काढायचे काम नाही. या संदर्भात त्याठिकाणी चर्चा सुध्दा झालेली आहे. दुर्दैवाने समुद्रकाठी वाहून आलेली प्रेते काढण्याचे काम त्वरेने किंवा ज्या तत्परतेने व्हायला पाहिजे होते त्या पध्दतीने झालेले नाही. कोकण किनारपट्टीला हा लाभलेला शाप आहे. आमच्याकडे निसर्गाने सर्व काही लुटून दिलेले असताना सुध्दा नैसर्गिक संकटांमुळे आम्ही त्रस्त झालेलो आहोत. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, या फयान वादळामुळे कोकणपट्टीचे जे नुकसान झालेले आहे त्या संदर्भात तातडीने आर्थिक मदत दिली पाहिजे. फयान वादळामुळे जवळजवळ 72 हजार हेक्टर जमिनीचे नुकसान झालेले आहे. या वादळामुळे 300 पेक्षा अधिक लोकांचे प्राण गेले आहेत. फयान वादळामुळे 100 कोटी रुपयांपेक्षा अधिक मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, ताबडतोब पंचनामे करण्यात येतील. दुर्दैवाने अद्याप पंचनाम्याचे फॉर्म देखील दिले गेले नाहीत. ज्यांचे 4 ते 5 लाख रुपयांचे नुकसान झाले अशा वादळग्रस्तांना 10 हजार रुपये इतकी अल्प मदत दिली गेली. शासनाच्या वतीने त्यांची कुचेष्टा केली गेली आहे अशी त्या नागरिकांच्या मनामध्ये भावना निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, माझ्या पक्षाच्या वतीने आम्ही सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयातील ज्या मच्छिमारांचे नुकसान झाले त्यांना 25 लाख रुपयांची मासेमारीसाठी लागणारी जाळी आणून देण्याचे काम केले. आमच्या वतीने जे शक्य होते ती अल्पशी मदत देण्याचे कर्तव्य आम्ही पार पाडले. परंतु सरकारकडून आपदग्रस्तांना जी मदत अपेक्षित होती ती अद्यापही लोकांना मिळालेली नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे अद्यापही अनेक मच्छिमार समुद्रात बेपत्ता झालेले आहेत. ते मच्छिमार मासेमारी करण्यासाठी खोल समुद्रात गेले होते, त्यांच्या होड्यांना जलसमाधी मिळाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आजही त्यांचे कुटुंबीय समुद्रकाठी उभे राहून त्यांच्या परतीची आस्थेने वाट पहात आहेत. आपल्या कुटुंबातील मंडळी आज ना उद्या परत येतील अशी अपेक्षा ते बाळगून आहेत. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन फयानग्रस्त बांधवांना जास्तीत जास्त मदत मिळावी अशी मी शासनाला विनंती करतो. महाराष्ट्रामध्ये अनेक जिल्हयात या वादळामुळे नुकसान झाले आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी सांगितले की, फक्त नाशिक जिल्हयामध्येच 300 कोटी रुपयांचे नुकसान

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुळकर्णी....

झाले आहे. डाळिंब, द्राक्ष, कापूस या पिकांचे नुकसान झाले आहे. जळगाव, कोल्हापूर, सांगली जिल्हयांमध्ये देखील मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या वादळामुळे राज्यावर मोठे संकट आलेले आहे. त्यादृष्टीने शासनाची महसूल यंत्रणा या भयानक संकटाला तोंड देण्यासाठी सक्षम नाही ही वस्तुस्थिती आहे. महसूल विभागाचे लोक अद्यापही या वादळग्रस्त भागात पोहोचू शकले नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांनी 5 दिवसात पंचनामे करु असे जाहीर करुनही अद्याप पंचनामे झालेले नाहीत. लोकांना किती मदत द्यायचा निर्णय शासनाने घेतला आहे हे सभागृहात जाहीर केले पाहिजे. वादळग्रस्त लोकांना मदत करण्याची भूमिका घेतली पाहिजे. जी अद्यापही शासनाच्या वतीने घेण्यात आलेली नाही.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)

श्री गुरुनाथ कुलकर्णी .....

म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, फयान वादळामुळे कोकणात अत्यंत भयानक अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्याचबरोबर राज्याच्या निरनिराळ्या भागात शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले आहे. या नुकसानग्रस्तांच्या बाबतीत शासनाने अत्यंत खंबीर व ठोस असा निर्णय घ्यावा व फयानग्रस्त शेतकऱ्यांना सहकार्य व मदत करण्याची भूमिका घ्यावी. शासन या लोकांना धीर आणि पाठिंबा व्यक्त करु शकेल, एवढीच भूमिका या ठरावाच्या माध्यमातून व्यक्त करतो आणि मला हा ठराव मांडण्यास परवानगी दिली त्याबद्दल पुन्हा आपले आभार मानतो आणि माझे भाषण पुरे करतो.

जय हिंद जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या प्रस्तावाच्या माध्यमातून आपली भूमिका येथे मांडली आहे. खरे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मच्छिमार ज्याप्रमाणे समुद्रात अत्यंत खोलवर मच्छिमारीसाठी गेले त्याप्रमाणेच खोलवर जाऊन सन्माननीय सदस्य आपली भूमिका मांडतील असे मला वाटले होते. परंतु सन्माननीय सदस्यांच्या भाषणातून मला तसे काहीच जाणवले नाही. फयान वादळ येऊन गेले त्याच वेळेस पाहणी करताना विरोधी पक्षाकडून कोकणात सांगण्यात आले होते की, अशा प्रकारचा प्रस्ताव सभागृहात पहिल्याच दिवशी चर्चेसाठी आणला जाईल. विरोधी पक्षाकडून येणाऱ्या प्रस्तावाच्या मागणीवर मात करण्यासाठी हा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून आणला गेला असे सुरुवातीलाच सन्माननीय सदस्यांच्या भाषणातून कळले. वास्तविक त्यांचा हा स्वभाव नाही पण केवळ आपद्ग्रस्तांच्या बाबतीत राजनिती निर्माण करण्याच्या बाबतीत ही शक्कल लढविण्यात आली आहे. वास्तविक आपण सर्वांनी मिळून फयानग्रस्तांना मदत केली पाहिजे. मी या ठिकाणी बोलत असताना जरी शासनाच्या उणीवा सांगणार असे वाटत असले तरी आम्हाला त्या भागात जे जाणवले तेच सांगण्याचा प्रयत्न करणार आहे आणि ही जबाबदारी शासनाचीच आहे म्हणून शासनालाच जाब विचारणार आहे. यात शासनाचे चुकले असेल तर चुकले म्हणून शासनाला बोलणारच आहे. या टीकेचा जो रोख असेल तो म्हणून आपद्ग्रस्तांच्या घरात जो अंधार आज आहे तो दूर करण्याकरिता शासनाच्या माध्यमातून काय मदत करणार हे देखील त्यांना कळले पाहिजे म्हणून ही आजची चर्चा आहे. हे सर्व झाल्यानंतर या आपत्तीच्या प्रसंगी मदत करण्याच्या अनुषंगाने शासनाकडून म्हणावे तसे प्रयत्न दुर्दैवाने झालेले नाहीत ही व्यथा आहे म्हणूनच सत्ताधारी पक्षाकडूनच हा प्रस्ताव आणला आहे. ज्यावेळी ट्रेझरी बेंचकडून असा प्रस्ताव येतो त्यावेळी शासनाचेच काही तरी चुकले आहे हे सांगण्यासाठीच असा प्रस्ताव आणला जातो.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

यानंतर श्री जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

त्यामुळे प्रस्ताव तयार कर्त्यांनी फयानच्या संदर्भात मदत दिली नाही, मदत देण्यामध्ये आपले सरकार चुकले आहे हे बोलण्याचे जे धाडस दाखवले त्याबद्दल धन्यवाद. अवकाळी पावसामुळे आणि फयान वादळामुळे शेतक-यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. नुकसानीच्या संदर्भात अनेक वर्तमानपत्रातून आकडे सुध्दा आलेले आहेत. जनतेला नुकसान भरपाई देण्यासाठी या ठिकाणी चर्चा सुरु आहे. वादळामुळे घरातील कर्ता माणूस निघून गेल्यामुळे जी घरे उध्वस्त झालेली आहेत त्यांची उध्वस्तता आपण कधीही भरुन काढू शकत नाही. चूक एकदा झाली तर आपण त्याला चूक समजू शकतो परंतु या सरकारकडून वारंवार चूक होत त्यामुळे कोकण वासीयांना आता खात्री वाटायला लागले आहे की, आमच्या भागातील कितीही आमदार असले, कितीही मंत्री असले तरी आम्हाला मदत काही मिळणार नाही. त्यामुळे कोकणवासींयामध्ये आकांत आहे. या ठिकाणी मी उगाच काही बोलत नाही. मला आठवते की, कोकणामध्ये गेल्या जुलै महिन्यापासून ते नोव्हेंबर महिन्यापर्यंत म्हणजे पाच महिन्यात मोठया प्रमाणात तीन आपत्त्या आलेल्या आहेत. कोकणामध्ये पहिली आपत्ती 24 जुलै रोजी आली होती. त्यावेळेस सरकारने मुंबई आणि मुंबईच्या आसपासच्या भागांसाठी साडेपाच मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत, अर्धी मुंबई बुडू शकेल, समुद्र किना-यावर कोणीही जाऊ नये यासंर्भात सरकारने रेड अलर्ट दिला होता. त्यावेळेस समुद्रात उधान येणार होते. यावेळी मुंबई महानगरपालिकेने सुध्दा कंबर कसली होती, त्या वेळेस दुपारुन कार्यालये सुध्दा सोडण्यात आली होती. ही सर्व परिस्थिती आपल्याला माहिती आहे कारण त्यावेळेस विधानसभेचे विशेष अधिवेशन सुरु होते. 26 जुलैच्या फयान वादळामुळे समुद्रात साडेपाच मीटर उंचीच्या लाटा आल्यामुळे कोकणपट्टीवरील भूप्रदेश गिळंकृत झाला होता, सगळे बांध फुटले गेले होते. रायगड आणि ठाणे जिल्हयात खारबंदीचे सर्व काठ फुटल्यामुळे त्या ठिकाणच्या संपूर्ण शेतीचे नुकसान झाले होते. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सभागृहात प्रश्नही उपस्थित केला होता. जुलैच्या संकटानंतर ऑक्टोबर महिन्यात सिंधुदुर्ग जिल्हयाला पुन्हा एकदा झोपडले. सिंधुदुर्ग जिल्हयाला नेहमीच हत्तीच्या त्रासापासून प्रचंड प्रमाणात नुकसान सहन करावे लागत असते. जुलैमध्ये महिन्यामध्ये फयान वादळामुळे आलेले संकट व त्यानंतर ऑक्टोबर महिन्यातील ढग फुटीमुळे कोकणवासीयांच्या शेतीचे आणि बागायतीचे तसेच मच्छिमारांचे फार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. कोकणाला गेल्या पाच महिन्यात तीन आपत्तींना तोंड द्यावे लागले त्या उद्ध्वस्ततेची, नुकसानीची आपण या ठिकाणी चर्चा करीत आहोत. केवळ दोन तीन जिल्हयात नुकसान झाले अशातला हा भाग नाही. अवकाळी पावसाचा आणि फयानचा वेगळा विषय आहे. या दोन्ही विषयावर आज सभागृहात चर्चा होत आहे. फयान वादळामुळे झालेले नुकसान, ढग फुटीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई शासनाने दिली आहे काय याचे उत्तर शासनाने प्रथम देणे आवश्यक आहे. त्यावेळेस नगरविकास खाते हे माननीय डॉ.पतंगराव कदम यांचेकडे होते तर आता हे खाते माननीय नारायण राणे यांच्याकडे आलेले आहे. नवीन मंत्री आले की, त्यांच्याकडून सुध्दा ते खाते दुस-याला दिले जाईल. कोकणातील लोकांनी गेल्या पाच महिन्यात तीन आपत्तींना तोंड दिले आहे. या आपत्तीमुळे जे नुकसान झालेले आहे त्याची नुकसान भरपाई शासनाने दिली नाही ही वस्तुस्थिती आहे. कोकणात जी आपत्तीची परिस्थिती ओढवली होती त्यासंदर्भात शासनाने कॅबिनेट मिटिंग घेतली होती त्या मिटिंगमध्ये निर्णयही घेतले होते व ते निर्णय शासनाने अभिमानाने जाहीर केले होते की, शासनाने आपदग्रस्तांना मदतीचा हात दिलेला आहे, आम्ही हा निर्णय घेतलेला आहे, तो निर्णय घेतलेला आहे म्हणून.....उद्ध्वस्त

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

या चर्चेच्या निमित्ताने आम्ही जी काही मागणी करणार आहोत ती मागणी मान्य होईल किंवा नाही हे सांगता येणार नाही परंतु नेमकी परिस्थिती काय आहे हे सांगणे आवश्यक आहे. नवीन बाटलीत जुनी दारु भरल्यासारखे हे सरकार आमच्या समोर उभे आहे. त्यामध्ये नवीन कोणीही मंत्री नाहीत. पूर्वी जे मंत्री होते तेच आताच्या सरकारमध्ये सुध्दा मंत्री आहेत .अर्थात काही तरुण् मंत्रीसुध्दा त्यात आहेत. 2005 साली कोकणात मुसळधार पाऊस पडला होता. सन्माननीय महसूल मंत्री श्री नारायण राणे या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, मुसळधार पाऊस पडल्यामुळे महाड पासून रत्नागिरी पर्यत अनेक गावाचा संपर्क तुटला होता. त्यावेळी महसूल मंत्री म्हणून आपला मुंबईमध्ये शपथविधी सुरु होता. त्यामुळे त्या दिवसाची मी आपणास आठवण करुन देतो. या राज्याचा महसूल मंत्री म्हणून शपथ घेत असतांना त्यांच्याच कोकणामध्ये मुसळधार पावसामुळे मोठी आपत्ती आली होती आणि गावामध्ये जाणारे सर्व रस्ते बंद झाले होते. 2005 साली कोकणात काही ठिकाणी दरड कोसळली होती. त्यानंतर आता 2009 सालीसुध्दा पावसामुळे शेतक-यांचे नुकसान झाले होते. त्यावेळी आम्ही कोकणात गेलो असतांना तेथील लोक आम्हाला असे सांगत होते की, 2005 साली जे नुकसान झाले होते त्याची सुध्दा नुकसानभरपाई अजून आमहाला मिळालेली नाही तेव्हा आता जे नकसान झालेले आहे त्याची नुकसान भरपाई केव्हा मिळेल हे काही सांगता येत नाही. मी महाड मध्ये गेलो असतांना तेथे 2005 साली दरड कोसळून ज्यांच्या घरांचे नुकसान झाले होते त्यांना अजूनही नुकसान भरपाई मिळालेली नाही, त्यांना अजूनही घरे मिळालेली नाहीत, त्यांचे पुनर्वसन केले गेले नाही, त्यांना वीज दिली गेली नाही. महाडमधील तासगाव येथे राहणा-या लोकाचे अजूनही पुनर्वसन झालेले नाही. तसेच त्यांचे पुनर्वसन केव्हा केले जाईल हेसुध्दा सांगता येत नाही. 2005 साली ज्यांचे नुकसान झाले होते त्यांना अजूनही नुकसान भरपाई मिळालेली नाही अशी परिस्थिती असेलतर फयान चक्री वादळामुळे ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना कधी नुकसान भरपाई मिळणार

आहे?या चक्रीवादळामुळे किती नुकसान झालेले आहे याबाबतीत मी नंतर खुलासा करणार आहेच परंतु फयान चक्री वादळामुळे ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसानभरपाई मिळणार आहे

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

किंवा नाही याबद्दल शंका व्यक्त करुन मी पुढच्या चर्चेला सुरुवात करणार आहे. कारण ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना शासनाकडून मदत मिळण्यासंबंधी शंका निर्माण व्हावी अशी या शासनाची स्थिती आहे. कॅबिनेट मधील बैठकीत फक्त निर्णय घेण्यात आल्यामुळे सर्व कामे होतातच असे नाही. निर्णय घेतल्या प्रमाणे संबंधितांना मदत मिळते किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे व त्यासाठी सतत पाठपुरावा केला गेला पाहिजे. मदत देत असतांना अनेक खात्याचा संबंध येत असतो त्यांच्यामध्ये योग्य प्रकारे समन्वय साधला गेला पाहिजे. फयान चक्री वादळामुळे अनेक जणांचे नुकसान झालेले आहे.त्याचबरोबर अवकाळी पाऊस पडल्यामुळेसुध्दा अनेक शेतक-यांचे नुकसान झाले आहे. केवळ कोकणातच हे संकट आले आहे असे नाही तर संपूर्ण राज्यात अवकाळी पावसाचे संकट आल्यामुळे संपूर्ण राज्यातील शेतकरी या संकटात सापडला आहे. रायगड जिल्हयात आंबा, फणस ,नारळ, काजू,सुपारी इत्यादीचे नुकसान झाले आहे याची पहाणी मंत्र्यांनी केली होती आणि मी सुध्दा केली होती. माननीय फलोत्पादन मंत्री डॉ.विजयकुमार गावित तेथे गेले होते. त्याना एवढेच माहीत होते की, या भागापासून गोवा जवळ आहे .त्यामुळे तेवढया परिसरातच त्यांनी भेटी दिल्या आणि ते परत आले. मात्र रत्नागिरी जिल्हयामध्ये ते आलेच नाहीत. सिंधुदुर्ग जिल्हयात अधिका-यांनी त्यांना कोठे कोठे फिरवले हे त्यांनाच माहीत . असो. खानदेशामध्ये केळीच्या बागा उद्ध्वस्त झाल्याचे टी.व्ही.वर दाखविण्यात येत होते ते दृश्य बघवत नव्हते. खानदेशातील केळी परदेशात पाठविली जातात त्या भागातील बागायतदाराच्या बागा उद्ध्वस्त झाल्या होत्या , पश्चिम महाराष्ट्रातील द्राक्षाच्या बाग सुध्दा मोठया प्रमाणावर उद्ध्वस्त झाल्या होत्या त्यामुळे त्या भागातील शेतकरी कपाळाला हात लावून बसले होते विदर्भ, मराठवाडयात कापूस, तूर, ऊस , सोयाबीन ,सूर्यफूल इत्यादीचे नुकसान झाले सोलापूर - सांगली मध्ये डाळिंबाचे नुकसान झाले होते. त्या भागातील डाळिंब मोठया प्रमाणावर परदेशी पाठविले जातात. अवेळी पडलेल्या पावसामुळे चांगल्या प्रकारच्या डाळिंबाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाल्यामुळे जनावरांचे खाद्य म्हणून दोन रुपये किलो या दराने ते विकावे लागत आहे. अवकाळी पडलेल्या पावसामुळे नाशिक जिल्हयातील कांदा रस्त्यावर आणि शेतावर सडला होता. ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्यांना मदत देण्याच्या संदर्भात माननीय

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

मुख्यमंत्र्यानी तत्परता दाखवली आणि पाच दिवसात पंचनामे करण्याबाबत जाहीरपणे सांगितले. प्रशासनावर सरकारची आणि माननीय मुख्यमंत्र्यांची त्यांची चांगली पकड असावयास पाहिजे. परंतु ती नसल्यामुळे अधिकारी जबाबदारीने वागत नाहीत . या संकटाला तोंड देण्यासाठी पाच दिवसात पंचनामे पूर्ण् करण्यात येतील असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते व त्यांच्या घोषणेमुळे लोकांना आधार वाटला. सन्माननीय मंत्री श्री भास्कर जाधव या ठिकाणी उपस्थित आहेत माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यपप्रमाणे् पाच दिवसामध्ये शे्तक-यांचे पंचनामे झाले आहेत असे जर त्यांनी सांगितले तर मला अभिमान वाटेल.परंतु सर्व पंचनामे झालेले नाहीत अजूनही काही शेतक-यांच्या शेतातील नुकसानीसंबंधीचे पंचनामे व्हावयाचे आहेत. मी आपले नाव घे्तल्यामुळे कृपया आपण अस्वस्थ होऊ नये.

श्री भास्कर जाधव (बसून) : 36 हजार पंचनामे पूर्ण केलेले आहेत.

श्री.दिवाकर रावते : आपल्या कडील माहिती आपण माननीय मंत्र्याकडे द्यावी.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ...

आजही पंचनामे पूर्ण झालेले आहेत की नाही हा विषय मुख्य आहे. मी आपल्याला याचा दोष देत नाही. पण माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यानंतर अधिकाऱ्यांनी तत्परतेने कामाला लागले पाहिजे पण तसे झालेले नाही आणि त्यामुळेच आजही हे काम पूर्ण झालेले नाही. सभापती महोदय, या भागामध्ये वादळाची तीव्रता किती होती ? सगळीकडे सगळे मोजून काही सांगता येणार नाही. पण शितावरून भाताची परीक्षा म्हणतात तसे मी आपल्याला माहिती देऊ शकेन. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात 1144 लघुदाब विद्युतवाहिनी आणि 2142 उच्चदाब वाहिनीचे पोल या वादळामुळे पूर्णपणे उखडले गेले, कोलमडून पडले. लोखंडी पोल उद्ध्वस्त होऊ शकतात एवढी त्या वादळाची तीव्रता होती. मग त्या काळात समुद्रात गेलेल्या बोटींची काय परिस्थिती झाली असेल ? याबाबतची वृत्तपत्रात खूप माहिती आली होती आणि त्याची कात्रणे देखील माझ्याकडे आहेत. त्यातून किती बोटी समुद्रात त्या काळात गेल्या होत्या आणि त्यावर किती खलाशी होते व त्यांची काय परिस्थिती झाली हे आपल्याला समजून येते. सभापती महोदय, मी जेव्हा वादळानंतर तेथे झालेल्या वाताहातीची माहिती घेण्यास आणि तेथील वादळग्रस्तांना धीर देण्यास कोकण भागामध्ये गेलो होतो तेव्हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला, मालवणमधील तारकर्ली-देवबाग भागामध्ये तसेच विजयदुर्ग भागात, रत्नागिरीमधील नाटेमध्ये गेलो होतो, मिरकरवाडा बंदर भागामध्ये गेलो होतो. रायगड जिल्ह्यातील माणगाव वगैरे भागामध्ये देखील गेलो होतो. तेथील झालेले नुकसान व एकूण भयावह परिस्थिती मी पाहिली आहे. सभापती महोदय, वस्तुत: या वादळाबाबत धोक्याची सूचना तेथील अधिकाऱ्यांना दोन दिवस अगोदरच संबंधित विभागाने दिली होती पण त्या स्थानिक अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्याने वा त्यांना त्याचे गांभीर्य नीट कळले नसल्याने त्यांनी ती सूचना स्थानिक पातळीवर, मच्छिमारांना वगैरेना वेळेवर दिली नाही. हे वादळ येणार असल्याची धोक्याची सूचना संबंधित विभागाने सरकारला दिल्यानंतर मागील अधिवेशनात सरकारने देखील येथे सभागृहाच्या माध्यमातून त्याची कल्पना, माहिती साऱ्यांना दिली होती. त्यावेळी सभागृहाच्या नेत्यांनी निवेदन करून असे असे वादळ येणार असून त्याचा मोठा तडाखा बसेल असे सभागृहाला सांगितले होते. सभापती महोदय, मी जेव्हा कोकणातील किनारपट्टीच्या भागामध्ये जेथे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते तेथे प्रत्यक्ष गेलो तेव्हा मला असे दिसून आले की, संबंधित खात्याकडून या वादळाबाबतची आणि त्याच्या तीव्रतेसंबंधात आलेली सूचना तेथील स्थानिक बंदर खात्याच्या

..... एक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

लोकांनी, अधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेतली नव्हती. वादळाची सूचना म्हणून, जो लाल धोक्याचा बावटा लावावयाचा असतो, जेणे करून मच्छिमार समुद्रात बोटी घेऊन जाणार नाहीत, तो धोक्याचा बावटा कोणी लावायचा यावरूनच तेथील अधिकाऱ्यांमध्ये एकवाक्यता नव्हती. स्थानिक बंदर अधिकाऱ्यांकडून धोक्याचा बावटा वेळीच लावला गेला असता तर मच्छिमारांना समजले असते की, वादळाची शक्यता आहे त्यामुळे समुद्रात जायचे नाही. पण वेळीच तो बावटा लावला गेला नाही, तो उशीराने लावला गेला आणि त्यामुळे तोपर्यंत अनेक मच्छिमार आपापल्या बोटी घेऊन समुद्रात मच्छिमारीसाठी गेले होते आणि ते वादळात सापडले व त्यापैकी बहुसंख्यांचे प्राण धोक्यात आले. कित्येक तर अजूनही आपल्या घरी परतलेले नाहीत, ते बेपत्ता आहेत. काहींच्या बोटी भरकटल्या गेल्या, काही बोटी फुटल्या. त्या काळात तेथे काही विचित्र परिस्थिती होती. कोस्ट गार्ड वगैरे विभागाचे लोक समुद्रात वादळात सापडलेल्यांना मदत करण्यासाठी म्हणून जायला पाहिजे होते ते गेले नाहीत आणि जे गेले त्यांनी वादळात सापडलेल्या लोकांना काहीही मदत केली नाही. जे समुद्रात होड्या उलटून पडलेले होते आणि मदतीची याचना करीत होते त्यांना त्यांनी कोणत्याही प्रकारची मदत केली नाही तर उलट त्यांना सांगितले की, आम्हाला केवळ मेलेले लोक काढण्याच्याच सूचना आहेत. सभापती महोदय, खरे तर धोक्याची सूचना आल्यावर ती देण्यासाठी पाच मिनिटाच्या अंतरावर संबंधित कार्यालय आहे पण तेथे जाण्यासाठी व ती सूचना तेथे देण्यासाठी दुसऱ्या दिवसाची सायंकाळ यावी लागली. हे सरकारचे प्रशासन असेल, अशा पद्धतीने प्रशासन चालत असेल तर राज्य चालूच शकणार नाही पण तेथे सर्वत्र अशीच परिस्थिती होती. माझ यापासून 5मिनिटांच्या अंतरावर बंदर कार्यालय असताना तेथे जाऊन धोक्याची सूचना देण्यास दुसऱ्या दिवसाची संध्याकाळ झाली. हे सारे रत्नागिरी कलेक्टरच्या समोर संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितलेले आहे. थोडक्यात सांगावयाचे तर एकूण परिस्थितीचे गांभीर्यच समजले नाही असे अधिकारी तेथे काम करीत होते आणि आपद्ग्रस्तांना मदत करण्याच्या दृष्टीने कोणतीही यंत्रणा तेथे काम करीत नव्हती. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... वाय 1 ...

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, अजून पालकमंत्री नेमण्यात आले नाहीत हे दुर्दैव आहे. तुमच्यामध्ये मंत्रिपदावरुन भांडणे सुरु होती, आता पालकमंत्री नेमण्यावरुन भांडणे सुरु आहेत. याबाबत कुणाला जाब विचारावयाचा? पालकमंत्री नेमण्यात न आल्यामुळे त्या जिल्हयाला नेता नाही. पालकमंत्री पद हे त्या जिल्हयाचे नेतृत्व असते. ते जिल्हयाच्या ठिकाणी जाऊन बसतात आणि आदेश देतात. काही अडचण येत असेल तर ती सोडवितात, वरच्या पातळीवरुन मदत मागवितात. त्यामुळे जिल्हयाला पालकमंत्री नसल्यामुळे तात्काळ निर्णय होत नव्हते, त्या जिल्हयाला मदत मिळत नव्हती. याठिकाणी प्रदेशाध्यक्ष माननीय श्री. माणिकराव ठाकरे बसले आहेत.महाराष्ट्रावर एवढे संकट आलेले असतांना राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी तातडीने आपले सर्व कार्यक्रम रद्द करुन त्याठिकाणी भेट देणे आवश्यक होते. परंतु त्यावेळी त्यांचा नांदेड जिल्हयामध्ये गौरव समारंभ सुरु होता. तो समारंभ आपण रद्द केला असता तर या शासनाला जाणीव आहे असे वाटले असते. त्यावेळी आपण नांदेडमध्ये होता आणि ईकडे लोक तडफडून मरत होते. माननीय महसूल मंत्री हेलिकॉप्टरने तीन जिल्हयामध्ये गेले. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आपल्या यवतमाळ जिल्हयामध्ये जाहीर झालेला कार्यक्रम रद्द होण्याचे कारण फयान वादळ नव्हते. आपण ज्या पध्दतीने हा विषय उभा केला त्यावर मराठवाडयामध्ये टीका झाली, वर्तमानपत्रामध्ये टीका झाली त्यामुळे तो रद्द झाला. फयान वादळाच्या संदर्भातील वर्तमानपत्रातील कात्रणे माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांच्या हातामध्ये होती. त्या कात्रणामध्ये प्रहार वर्तमानपत्रातील कात्रणे होती काय? ते "नाही" म्हणाले. परंतु मी त्यांना ती दिली असती. वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या बातम्यांची नोंद घेऊन तो विषय याठिकाणी मांडण्याचे आपले काम आहे. प्रहार वर्तमानपत्राची प्रत त्यांच्याकडे नव्हती म्हणून मी त्यांना सांगत आहे.

सभापती महोदय, एक लहानशी गोष्ट होती. मच्छिमारांची छोटीशी मागणी होती की, बोटीवर बसवावयाच्या डीएटी यंत्राची किंमत त्यावेळी 12 हजार रुपये होती. त्याबाबत ते म्हणाले की, आम्हाला यंत्राच्या किंमतीमध्ये शासनाने सबसिडी द्यावी. यंत्राची अर्धी किंमत आम्ही देतो,अर्धी किंमत तुम्ही द्यावी. ते यंत्र असते तर मोठया प्रमाणावर वादळामध्ये सापडलेल्या लोकांना वादळाची कल्पना आली असती, आणि मोठया प्रमाणावर जीवितहानी झाली नसती. तेव्हा याबाबत आपण सभागृहामध्ये काय सांगणार आहात? पूरक मागण्यांवरील चर्चेच्या वेळी मी हा विषय उपस्थित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते....

करणार आहे. याठिकाणी माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी उपस्थित केलेले विषय मी पुन्हा उपस्थित करणार नाही. मला एवढीच माहिती पाहिजे की, नुकसान भरपाईच्या संदर्भात जे निकष आहेत त्या संदर्भात आपण कोणता निर्णय घेणार आहात? घराच्या नुकसानी संदर्भात आपण दोन दिवसात निर्णय घेऊन 35 हजार रुपये रक्कम केली. या फयानग्रस्तांविषयी आपणास सहानुभूती वाटत असेल तर दोन दिवसापूर्वी खेड तालुक्यातील कुलवड गावच्या दत्ताराम खोपकर यांना तहसिलदार श्री.गायकवाड यांनी दिलेला 2400 रुपयांचा चेक परत केला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

निकष तपासून घ्यावेत. ते म्हणाले की, माझे दोन ते अडीच लाख रुपयांचे नुकसान झालेले असताना तुमचे 2400 रुपये कोणाला पाहिजेत ? जी कुटुंबे उद्ध्वस्त झालेली आहेत, त्यांना मदतीची जी अपेक्षा आहे, त्याप्रमाणे पूर्णपणे भरपाई होऊ शकणार नाही हे आम्हाला देखील समजते. तुम्ही भरघोस मदत द्यावी असेही नाही. पण सर्व्हायव्हल अशी म्हणजे आज तेथील लोकांचे कंबरडे मोडलेले आहे अशा वेळी त्यांना अशा परिस्थितीमध्ये उभे रहाता येईल एवढी तरी मदत दिली पाहिजे. अशा वेळी त्या लोकांचे दोन-अडीच लाखाचे नुकसान झाल्यामुळे घर उद्ध्वस्त झाल्यानंतर आपल्या निकषाप्रमाणे जर त्यांना 2400 रुपयांची मदत मिळणार असेल तर ते किती योग्य आहे? मग त्या लोकांनी तहसिलदाराच्या तोंडावर ते पैसे मारले आणि असे सांगितले की, आम्हाला अशी मदत नको. हे सर्व सांगण्याचे कारण असे की, जर मदतीच्या बाबतीत हेच निकष असतील तर आपण यामधून आपद्ग्रस्तांना कोणती मदत करीत आहात असा प्रश्न येथे निर्माण होतो. माननीय मंत्री महोदयांनी या चर्चेला उत्तर देताना सांगावे, कारण ही बाब गंभीर आहे. जेव्हा महापूर येतो आणि आपल्याला जमिनीवर पाय ठेवता येत नाही, तेव्हा हेलिकॉप्टरने पहाणी केली जाते. आमचे अधिकारी हेलिकॉप्टरने भात शेतीचे जे नुकसान झालेले आहे, त्याची पहाणी करीत आहेत. पण मी माननीय कृषी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. कारण ज्याप्रमाणे आम्ही भात शेतीची पहाणी करण्यासाठी चिखल तुडवला, त्याप्रमाणे त्यांनी देखील तुडवला. ते प्रत्यक्षात स्वत: पहाणी करण्यासाठी गेले आणि त्यांनी भाताचे फुटलेले कोंब पाहिले. माननीय कृषी मंत्री अशा प्रकारे पहाणी करण्यासाठी गेले, त्याबद्दल मी त्यांचे कौतुक करीत आहे. पण त्याबाबतीत काही जाणीव झाली आहे काय ? हा प्रश्न आहे. तेथील सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर तुमच्या हृदयामध्ये कुठे कालवाकालव झाली काय ? यामुळे जो शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे, त्याला आपण काय देणार आहोत याबाबतीत विचार केला काय ? हा मुळामध्ये प्रश्न आहे. मला बरे वाटले की, या परिस्थितीची पहाणी करण्यासाठी अधिकारी हवेमध्ये उडत असताना, माननीय मंत्री महोदय शेतामध्ये फिरत आहेत. त्यामुळे आता सरकारला कुठेतरी जाणीव होईल आणि शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळतील असे वाटले. कोकणामध्ये एकराप्रमाणे शेती नाहीच. तर तेथे पाच गुंठे, 7 गुंठे, 10 गुंठे अशी 2-5 गुंठयाची शेती असते म्हणजे तेथे गुंठेवारीची शेती असते. शासनाचे नुकसान भरपाईच्या बाबतीतील निकष असे आहेत की, 62 मि.मि.पेक्षा कमी पाऊस पडला तर भरपाई नाही.

. . . .झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आता अशी स्थिती झाली की, वरच्या भागातील गावामध्ये पाऊस धो धो पडला आणि खालच्या भागा तील गावांमध्ये पाऊस पडला नाही. परंतु वरच्या भागातून धो धो पाणी खाली आले आणि खालच्या भागातील शेती उद्ध्वस्त झाली. अशा वेळी त्यांना विचारले जाईल की, तुमच्याकडे पाऊस पडला का? तर नाही. 65 मि.मि.पेक्षा कमी पडला आहे तर मग भरपाई नाही अशी स्थिती आहे. हे निकष कशाच्या आधारावर केले आहेत हे मला माहिती नाही. पाऊस पडल्यानंतर हाता-तोंडाशी आलेले धान आहे त्याचे नुकसान होते. ज्वारी काळी पडल्यामुळे ती शासनाने विकत घ्यावी यासाठी सदनामध्ये अनेक वेळेला मागणी करतो. कारण अवकाळी पाऊस पडतो, त्यामुळे ज्वारी काळी पडते. मग ती विकली जात नाही म्हणून शासन विकत घेते. तशाच प्रकारे जो भात उभा राहिलेला होता, त्याच्यावर पाऊस पडला. तसेच जो भात आडवा झाला होता, त्याच्यावर पाऊस पडला.मग हा पाऊस 65 मि.मि.पेक्षा कमी असो किंवा जास्त असो. परंतु एकदा पाणी पडल्यानंतर धान्य खराब होते. मग आता नुकसान भरपाई कशा प्रकारे देणार ? शासन बागायतीसाठी देखील हेक्टरी नुकसान भरपाई देते आणि ती हेक्टरी 6 हजार रुपयावरुन 15 हजार रुपयांपर्यंत वाढविली. पण याचा परिणाम काय झाला ? तर सरकारी निकषाप्रमाणे आंब्याच्या झाडांना म्हणजे एका हेक्टरमध्ये 100 आंबे असतील तर एका झाडाला 150 रुपये होतात. नारळाच्या झाडाबाबत सांगावयाचे तर एका हेक्टरमध्ये 150 असतील तर आपल्या निकषाप्रमाणे 100 रुपये होतात. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, आम्हाला ती झाडे तोडण्यासाठी सुध्दा मजुरी परवडत नाही. याबाबतीत ते आपल्या भाषणाच्या वेळी सविस्तर सांगतील. एका हेक्टरमध्ये काजूची झाडे 200 असतील तर शासनाच्या निकषाप्रमाणे त्या शेतकऱ्यांना 60-70 रुपये सुध्दा मिळत नाहीत. बागा उभ्या करणे, तेथे फळ-फळावळ येणे आणि ते पुढच्या पिढीसाठी उपलब्ध होणे यासाठी किती मेहनत आहे. अशा वेळी जर नुकसान झाले तर तुम्ही त्याची नुकसान भरपाई 100-150 रुपयांपर्यंत मोजत असाल तर आपण कोकणातील बागायतदार शेतकऱ्याला न्याय देत आहात काय? हा प्रश्न आहे. मी तर माननीय श्री.शरद पवार यांचे एवढयासाठी कौतुक करतो की, शेतकरी मेले, उद्ध्वस्त झाले, विदर्भामधीलशेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सहा जिल्हयामध्ये ज्या आत्महत्या झाल्या. मग त्यांच्या मदतीसाठी पॅकेज जाहीर करण्यात आले, कर्ज माफीची योजना जाहीर झाली.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

पाच एकराची कर्जमाफी सहा जिल्हयासाठी आली नाही तर ती संपूर्ण महाराष्ट्रासाठी आली. केंद्र शासनाच्या मदतीमध्ये पाच एकरवाले बागायतदारसुध्दा आले. त्याचा परिणाम असा झाला की, आत्महत्या केलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या बलिदानातून महाराष्ट्रातील शेतकऱ्याला आलेल्या कर्जमाफीच्या पॅकेजपैकी 72 टक्के पॅकेज हे पश्चिम महाराष्ट्रात गेले. पाच एकरातील ऊसाचे नुकसान झाले. पाच एकरातील द्राक्षाचे नुकसान झाले. पाच एकरातील अमुक पिकाचे नुकसान झाले. पाच एकरातील तमुक पिकाचे नुकसान झाले. अशा पध्दतीने कर्जमाफी घेण्यात आली. विदर्भातील पाच एकराच्या शेतकऱ्याचे पंधरा-सोळा ते वीस-बावीस हजार रुपये कर्ज असते. त्यामुळे 72 टक्के कर्ज पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना माफ झाले. शरद पवार हॅण्डसम नेते आहेत. मी त्यांच्या चातुर्याला मानतो. पण कोकणातील आमदारांनी आणि मंत्र्यांनी एवढी हुशारी दाखविली की, आमच्या हया उघडया-नागडया, लंगोटीवाल्या शेतकऱ्याला किमान चारशे ते दोन हजार रुपये मदत देण्याची पाळी येणार नाही अशी अवस्था आहे. शरद पावार साहेबांच्या चातुर्याप्रमाणे आपण आपल्या भागातील शेतकऱ्यांना मदत मिळवून देतो की नाही ही तुमची मंत्रीपदावरील कर्तृत्वाची कसोटी आहे. मला एक आठवण झाली याबाबत कुठे तरी नोंद केलेली असणार. कालच्या फयानमध्ये बोटी गेल्या, जहाजे गेली. झाडे उखडली पण मुंबईच्या आजुबाजूच्या अलिबागपासून मंबईच्या संपूर्ण भागामध्ये सुक्या मच्छीचा व्यवसाय करणारे मच्छिमार आहेत. पाच ते सहा कोटी रुपयांची सुकी मच्छी कालच्या फयानच्या वादळामध्ये उद्ध्वस्त झाली. मला याबाबतची जास्त कल्पना नाही. पण या सुक्या मच्छीवाल्यांसाठी देण्यात आलेल्या नुकसानभरपाई बद्दल मी कुठे वाचले नाही. सन 1989 साली माननीय शरद पवार साहेब ज्यावेळी मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी सुक्या मच्छीच्या नुकसानभरपाईसाठी निकष बदलून कोळी बांधवाना अनुदान दिले होते. मात्र आता या संदर्भात निर्णय घेण्यात आलेला नाही. श्री. शरद पवार साहेबाच्या निर्णयाचा आधार घेऊन सुक्या मच्छीवाल्या उद्ध्वस्त झालेल्या संपूर्ण कोळी बांधवांना मदत देण्यात यावी, त्यासंदर्भात आज जाहीर करण्यात यावे. आताच्या निकषामध्ये सुक्या मच्छीच्या नुकसानभरपाईसाठी कोणत्या प्रकारचे निकष आहेत असे माझ्या वाचनात आलेले नाही, असतील तर माननीय मंत्रमहोदयांनी ते सांगितले तर मला बरे वाटेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते....

बागायतदार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात आलेली आहे. 400 ते 500 मोठे बागायतदार शेतकरी आहेत. कृपाशंकर सिंह यांची प्रचंड मोठी बाग सिंधुदुर्ग, राजापूरमध्ये आहे. असे मोठ-मोठे बागायतदार आहेत त्या सगळयांची मी नावे घेत नाही, असे अनेक बागायतदार आहेत. हे तीनशे-चारशे मोठे बागायतदार सोडले तर छोटया-छोटया बागायतदारांना नुकसान भरपाई किती मिळणार? 40 रुपये ते 50 रुपये नुकसानभरपाई मिळते. इतकी या शेतकऱ्यांची थट्टा चालली आहे. "एक रुपयाची कोंबडी आणि सव्वा रुपयाचा मसाला" अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोकणात प्रती हेक्टरी दोनशे रुपये मदत देण्यात येत आहे. त्यामुळे कोकणातील शेतकऱ्यांना प्रती गुंठा 20 रुपये मिळत आहेत. तेवढया रुपयात कोंबडी देखील येत नाही. हे निकष आता बदललेले असतील तर आम्हाला आनंद होईल. चार-पाच गुंठे शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना 100 ते 150 रुपये मदत मिळेल त्याच्यापेक्षा जास्त मदत त्याला मिळणार नाही. पण ती मदत कधी देणार? या मदतीचे निकष या ठिकाणी सांगितले तर बरे होईल. राष्ट्रीयकृत बँकेत खाते असेल तरच मदत देण्यात येते. राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यासाठी 500 रुपये लागतात.त्यासाठी फोटो काढावा लागतो. फार्म भरावा लागतो. झेरॉक्स काढाव्या लागतात. दाखला घ्यावा लागतो. अशा प्रकारे खाते उघडण्यासाठी पाचशे ते सहाशे रुपये खर्च येतो आणि त्यानंतर त्या शेतकऱ्याला 200 रुपये मदत मिळते. चेक दिल्यानंतर त्या शेतकऱ्याचे जेथे खाते असेल तेथे तो चेक वटला पाहिजे. शासन एकतर तुटपुंजी मदत देत आहे पण ती मदत सुध्दा शेतकऱ्यांना सुखाने स्वीकारता येत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. माननीय महसूल मंत्र्यांनी त्यांचा आपल्या सरकारवर विश्वास नसल्यामुळे एक घोषणा केलेली आहे. सिंधुदुर्गमध्ये मी गेलो असता वर्तमानपत्रातील छापून आलेली बातमी मी वाचली. त्या बातमीमध्ये हेडलाईन अशी होती की, "काही चिंता करावयाची नाही. सरकार कमी पडले तर मी आहे." या राज्याच्या महसूल मंत्र्यांकडून लोक निकष बदलण्याची अपेक्षा करीत आहेत. त्यांनी लोकांना दिलासा दिला. कारण त्यांना माहीत आहे, आपण कॅबिनेटमध्ये काहीही बोललो तरी फायनान्स, अमुक, तमुक अशा सगळया खात्यातून फाईल जाता जाता वेळ लागतो. बॉम्बस्फोटाच्या संदर्भात आम्हाला समजले की, 13 ठिकाणाहून खरेदीच्या फाईल्स जातात म्हणून गोळयांची खरेदी होत नाही.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. दिवाकर रावते ...

त्यांना खात्री आहे की, मी कितीही काही केले तरी एवढी खाती आणि एवढ्या अडचणी आहेत. एवढे सगळे जे अधिकारी विमानातून फिरतात ते शेतकऱ्यांना विचारतात की, कापलेला भात घरी का नेला नाही ? कापलेला भात घरी नेत नाहीत, भात खळ्यामध्ये नेतात आणि मळतात हे आमच्या अधिकाऱ्यांना माहीतच नाही. त्यांनी दम दिला की, कापलेला भात घरी का नेला नाही ? असे सगळे शासन आणि त्यांचे काम आहे. म्हणून त्यांना असे सांगावे लागले की, चिंता करु नका, त्यांनी दिले नाही तर मी आहे. हे विचित्र वाटते पण लोकांना कोठे तरी आधाराचा शब्द मिळाला. मीच देणार असेल तर सरकार कशाला असाही प्रश्न निर्माण होतो. आम्ही त्या ठिकाणी हेडलाईन वाचली. खरे असेल तर आनंद आहे. हा केवळ फयान वादनाळानंतर झालेल्या नुकसानीचा किंवा अती पावसाचा प्रश्न नाही प्रश्न नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा जो शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे हा मूळ प्रश्न आहे. कोकणामध्ये जशी भातशेती गेली तसे भाताचे प्रचंड नुकसान विदर्भामध्ये गोंदिया, चंद्रपूर या सगळ्या भागामध्ये झालेले आहे. ज्या ठिकाणी शक्य आहे त्या ठिकाणी जाऊन पाहिले आणि भेटी घेतल्या. आता शासन नक्की काय देणार ? हा विषय ज्यावेळी आम्ही निर्माण करतो त्यावेळला आपण जाळ्यांच्या बाबतीत मदत केली तसे आम्ही 10 हजार रुपये मृतांच्या कुटुंबियांना शिवसेनेच्या वतीने दिले. आमच्या तिकडच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी तातडीने घरावर टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणवर ताडपत्र्या दिल्या. आपण जाळी दिली. आपल्या कुवतीप्रमाणे आपण त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करतो. परंतु शेवटी शासनाची मदत आणि शासनाचा त्यावरचा अधिकार हा महत्वाचा असतो. कारण मायबाप सरकारच जनतेला तारते आणि त्याकरिताच ते सरकार निवडून दिलेले असते. सभापती महोदय , आमची मागणी आहे. बॉम्बस्फोटात मरा आणि 2 लाख रुपये घ्या, 5 लाख रुपये घ्या. रेल्वेत मेला तर अमूक रुपये घ्या. ही सुध्दा आपत्तीच आहे. या कुटुंबाना किमान 5 लाख रुपये दिले गेले पाहिजेत अशा प्रकारची आमची पहिली मागणी आहे. जे अजून आलेले नाही, जे गायब झालेले आहेत, त्यांची आपण किती महिने वाट बघणार आहात ? ते आलेत तर आनंदच आहे. भले ते वर्षानंतर येवोत. पण त्या कुटुंबाला जो घोर लागलेला आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

ते जे कुटुंब उद्ध्वस्त झालेले आहे, त्यांना मदत देण्याच्या बाबतीत 12 वर्षाचा जो निकष आहे तो बदलावा. त्याबाबतीत निश्चित असे सांगावे की, अमूक या महिन्यापर्यंत वाट बघावयाची आणि त्याच्यानंतर तुम्हाला मदत देऊ आणि कोणती मदत देऊ ते नक्की सांगावे. ती अपेक्षा आज आहे. कोळ्यांची जाळी मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त झालेली आहेत. आपण जाळी दिली पण ती पुरणारी नाहीत. सगळी बंदरे बघितली तर आपण कितीही काही केले तरी ती मदत तुटपुंजी असते. त्यांना जाळ्यांकरिता तातडीने अनुदान देणे आवश्यक आहे. त्यानंतर ज्या बोटी फुटलेल्या आहेत त्यांचा प्रश्न आहे. आम्ही एकाला विचारले की, तुझी बोट किती रुपयांची होती. त्यांनी सांगितले की, साडेतीन लाखाचे कर्ज आहे. नवीन बोट घ्यावयाची म्हटली तर साडेतीन लाख रुपये कर्ज घ्यावे लागणार. म्हणजे पूर्वीचे कर्ज आहेच आणि नवीन कर्ज घ्यावयाचे आहे. ते उभे राहील. त्यांनी व्यापा-यांकडून ॲडव्हान्स घेतलेला आहे. त्यांना ते सावकार म्हणतात. म्हणजे त्यांनी सावकारी कर्ज घेतलेले आहे. म्हणून जसे आपण शेतकऱ्यांच्या बाबतीत सांगितले त्यांना ते मिळाले नसले तरी तशा प्रकारचा ठोस निर्णय ज्यांच्या छोट्या छोट्या बोटी उद्ध्वस्त झालेल्या आहेत त्यांच्या बाबतीत घेतला पाहिजे. ते फार मोठ्या संख्येने किंवा हजारोच्या संख्येने नाहीत. त्यांचे जुने कर्ज आपण कोणत्या पध्दतीने माफ करणार, नवीन कर्ज कोणत्या पध्दतीने त्यांना उपलब्ध करुन देणार ही त्यांची अपेक्षा आहे आणि हे सांगणे गरजेचे आहे. जी डीएटी मशीन आहे ती कायद्याने सर्व जहाजावर कंपल्सरी केली पाहिजे. आपल्याला जे काही 40 टक्के, 50 टक्के अनुदान द्यावयाचे असेल ते द्यावे अशी अपेक्षा आहे. पण ते यंत्र सगळीकडे असले पाहिजे अशा प्रकारची मागणी आहे. आपदग्रस्त घरांच्या बाबतीत मघाशी सांगितले त्याप्रमाणे 2400 रुपये वगैरे नाही तर त्यांचे पुनर्वसन करावे. कोकणामध्ये त्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर किंवा लाखाच्या घरामध्ये नाही. म्हणून त्यांना मदत मिळणे आवश्यक आहे. 65 मी.मी. पेक्षा कमी पावसाचा जो निकष आहे त्याबाबत सुध्दा फेरविचार करावा. गुहागर-बोऱ्या मच्छिमार बंदराच्या काही जेट्टी तुटलेल्या आहेत त्यांनाही फायदा दिला पाहिजे. दरवेळी कोकणावर या ठिकाणी चर्चा होते. पक्ष बाजूला ठेऊन सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते .....

सन्माननीय सदस्य एकत्र येतात. कोकणाच्या विकासाची चर्चा करतात. त्यातून काय निर्माण होते हे माहीत नाही. स्पीड बोटीच्या संदर्भात आता ते उत्तर वाचून दाखविणार आहेत. त्याबाबत शासनाचे अधिकृत पत्र आलेले आहे त्यामुळे मी त्याबाबत अधिक बोलत नाही. त्याबाबतही विचार व्हावा. ऊस उत्पादकांना आपण उभा ऊस जाळण्याकरिता 25 हजार रुपये देतो त्या पध्दतीने धान उत्पादकांना मदत करावी. कारण हे एकवेळचेच पीक आहे. ते बारमाही पीक नाही. एका पिकावर त्यांचे संपूर्ण घर चालते.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

म्हणून झालेले पीक संपूर्ण वर्षभरासाठी गेलेले आहे. त्यांचे घर वर्षभर चालले पाहिजे यासाठी त्यांच्या पिकाची नुकसान भरपाई त्यांना मिळाली पाहिजे. यासाठी शासन त्यांना कोणती नुकसान भरपाई देणार आहे ते शासनाने सांगावे. सध्या राज्यात बी-बियाण्यांचे भाव वाढलेले आहेत, त्यांना कोणत्या दराने बियाणे दिले जाणार आहे ते सांगितले पाहिजे. खतांचे, शेतीच्या अवजारांचे भाव वाढलेले आहेत. शेतातील उभ्या पिकांचे त्यांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे भाताच्या शेतीसाठी हेक्टरी 25 हजार रुपये मदत दिली पाहिजे. खराब झालेले धान्य शासनाने काळया ज्वारीसारखे विकत घ्यावे. त्यांच्याकडून पाणीपट्टी घेऊ नये. अशाप्रकारच्या मी मागण्या करतो. यावर फार मोठी चर्चा न करता शासनाने या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी मी अत्यंत तळमळीने विनंती करीत आहे. शेतक-यांची परिस्थिती मी पाहून आलो आहे, उद्ध्वस्त झालेल्या शेतक-यांना शासनाचा मदतीचा हात मिळावा, त्यांना आधार वाटावा असे निर्णय शासनाने जाहीर करावेत अशी पुन्हा एकदा विनंती करतो. मला संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये आणलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात माझे मत मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी प्रस्ताव मांडताना असे म्हटले होते की, या विषयावर नियम 289 अन्वये देखील चर्चा करण्याला आमची हरकत नाही. महाराष्ट्रातील जनतेला नियम 260 अन्वये चर्चा झाली काय किंवा 289 अन्वये चर्चा झाली काय याच्याशी काही देणे घेणे नाही. सरकारने जनतेला काय मदत दिली याची चर्चा होणे हे अत्यंतिक महत्वाचे आहे. त्यामुळे नियम 260 अन्वये की नियम 289 अन्वये ही चर्चा करावी यामध्ये मी जाणार नाही. तसेच माझ्या पूर्वीच्या वक्त्यांनी जे मुद्दे मांडले त्याची मी पुनरावृत्ती देखील करणार नाही. या फयान वादळामुळे महाराष्ट्रातील अनेक भागामध्ये भयानक परिस्थिती निर्माण झाली. 72 हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. 7 लाख 4 हजार शेतक-यांचे नुकसान झाले. 5 लाख छोटे शेतकरी आहेत ज्यांच्याकडे 2 हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. या छोटया शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे. सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी राज्याचे नेतृत्व केलेले आहे, सरकारचे नेतृत्व केलेले आहे. आपली निर्णय शक्ती, आपली कार्यक्षमता लक्षात घेता आपण या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांसाठी जे पॅकेज जाहीर केलेले आहे ते वाढवून द्यावे अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे. या वादळामुळे अनेक कोटींचे नुकसान झालेले आहे. वृत्तपत्रामध्ये या नुकसानीची आकडेवारी आलेली आहे. नुकसानीच्या संदर्भात राज्य सरकारने केंद्र सरकारकडे एक अहवाल पाठविला आहे. या अहवालात असे नमूद केले आहे की, शेतीचे 2,469 कोटींचे नुकसान झाले आहे. मच्छिमारी क्षेत्राचे 23 कोटींचे, जलसिंचन, ऊर्जा व पायाभूत सुविधांचे 27 कोटींचे नुकसान झालेले आहे. परंतु केंद्राकडून मदत मागताना राज्य सरकारने काय मागितले तर बाधित शेतक-यांच्या अनुदानासाठी 178 कोटी, बागायती पिकांच्या पुनर्लावणीसाठी 177 कोटी, बागायती झाडांच्या नुकसानीसाठी 55 कोटी मागितले. म्हणजे शेतीचे नुकसान 2400 कोटींचे झाले आहे, पण राज्य सरकारने 700 कोटींची मागणी केली आहे. म्हणून केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त अनुदान मिळण्यासंबंधी राज्य सरकारकडून प्रयत्न होणे ही आजची गरज आहे. या संकटाच्या काळात शासन दुर्बल शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहते, शेतकऱ्यांना आधार देते,

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.अरुण गुजराथी....

शेतकऱ्यांना शक्ती देते अशाप्रकारचे चित्र महाराष्ट्रात निर्माण करण्यासाठी शासनाने निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मघाशी म्हटले की, 1989 साली वादळ झाले त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.शरदराव पवार यांनी मागील सर्व निर्णय बदलले आणि नवीन निकष लावून आपद्ग्रस्तांना जास्तीत जास्त मदत देण्याचा प्रयत्न केला होता. त्याप्रमाणे यावेळी आपद्ग्रस्तांना शासनाने मदत देण्याचा निर्णय घ्यावा. सभापती महोदय, राज्यात दर सहा महिन्यांनी वादळ होते. आमच्या खानदेशात विशेषत: यावल, रावेर, भुसावळ या भागात दर दीड महिन्यांनी वादळ होते. आमच्या पवित्र भूमीशी या वादळाशी काय संबंध आहे ते समजत नाही. कारण या भागात महिन्यानंतर किंवा दीड महिन्यांनी वादळ होते. यासंबंधी कधीतरी अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी....)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)

मी तर पुढे जाऊन असे म्हणेन की, असे बियाणे आणा की, चक्रीवादळामध्ये देखील झाड उभे राहील. ड्राऊट रेझिस्टन्स सीड तयार केले पाहिजे की, जे पेरल्यानंतर आणि त्याचे पीक उभे राहिल्यानंतर महिनाभर पाऊस पडला नाही तरी ते जगेल, तासाला 100 कि.मी. वेगाने वादळ आले तरी ते पीक टिकेल, मग ते धानाचे पीक असो, कापसाचे पीक असो वा अन्य कोणते पीक असो. तेव्हा यादृष्टीने संशोधन करण्याची गरज आहे. शासनाच्या वतीने असे सांगण्यात आले की, झालेल्या नुकसानीचे पंचनामे पाच दिवसात करण्यात येतील. परंतु ते झाले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पंचनामे करण्यासाठी तलाठ्याऐवजी दुसरी एखादी यंत्रणा शोधता येईल का ते पहावे. इलेक्ट्रॉनिक्सच्या माध्यमातून सॅटेलाईटच्या माध्यमातून याबाबतीत काही करता येईल का ते पहावे. कारण तलाठी हा देखील शेवटी माणूस आहे. जर संबंध गावातीलच पीक नष्ट झाले असेल तर एखाद दुसरा तलाठी किंवा सर्कल अधिकारी ते काम किती दिवसात करणार हाही प्रश्न आहे. तेव्हा यासंदर्भात देखील प्रयत्न व्हावयास पाहिजे. मच्छिमारांच्या संदर्भात संपूर्ण माहिती या ठिकाणी देण्यात आलेली आहे. मी माननीय महसूल मंत्र्यांना सांगू इच्छितो की, 65 मिमी पावसाची अट काढून टाकण्यासंबंधीचा विचार शासनाच्या माध्यमातून झाला पाहिजे अन्यथा मदत मिळणार नाही. त्याच प्रमणे 50 टक्क्याची अट देखील काढून टाकण्याचा विचार व्हायला पाहिजे. 10 टक्के नुकसान झाले असेल तर 10 टक्के मदत द्या, 30 टक्के नुकसान झाले असेल तर 30 टक्के मदत द्या, 45 टक्के नुकसान झाले असेल तर 45 टक्के मदत द्या. परंतु आता अट अशी आहे की, 50 टक्क्यापेक्षा कमी नुकसान झाले असेल तर कोणतीही मदत मिळत नाही. तेव्हा याबाबतीत पुनर्विचार करण्याची गरज आहे. या फयान वादळामुळे झालेल्या नुकसानाची पाहणी करण्यासाठी माननीय महसूल मंत्री कोकणात गेले, माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ हे नाशिकला गेले, माननीय राज्यमंत्री श्री. गुलाबराव देवकर हे केळीच्या पिकाच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी खानदेशला गेले. केळी पिकाच्या नुकसानीपोटी हेक्टरी 10 हजार रुपये मदत देण्यात आली. एका हेक्टरमध्ये केळीची 2700 झाडे लावली जातात. हेक्टरी 10 हजार रुपये याप्रमणे एका केळीच्या झाडाला 2 ते 3 रुपये मदत मिळते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सुपारीचे झाड उभे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी...)

राहायला 8 वर्षे लागातात आणि त्यानंतर उत्पन्न मिळते. चक्रीवादळात 8 वर्षाची उत्पन्न देणारी झाडे भूईसापाट झाली तर त्या शेतक-याची काय स्थिती होईल ? या चक्रीवादळाचा तडाखा केवळ कोकणालाच नाही तर मराठवाडा, खानदेश या भागाला सुध्दा बसला. चक्रीवादळाने महाराष्ट्राला एकटे सोडले नाही तर खानदेश, मराठवाडा, कोकण या भागाला जबर तडाखा देऊन एकात्मता दाखविली. या भागातील शेतक-यांना फार मोठा फटका बसलेला आहे. शेतक-यांना नुकसानीपोटी जी 10-15 हजार रु.ची मदत देण्यात येणार आहे ती वाढवून द्यावी अशी माझी शासनाला विनंती आहे. 10-15 रु.मध्ये काही होत नाही. केळीचे झाड लावण्यासाठी 70-80 रुपये लागतात. त्यापासून 130 ते 140 रु. उत्पन्न मिळते. असे असताना शासन एका केळीच्या झाडाला फक्त 2 किंवा 3 रुपये मदत देत आहे. ज्या ज्या पिकांचे नुकसान झालेले आहे त्या पिकांच्या बाबतीत किमान 20 ते 25 टक्के मदत देण्याच्या दृष्टीने शासनाने विचार करावा. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ज्वारी, कडबा, कापसाची पत्ती काळी पडली आणि जे काही उत्पन्न हाती लागले ते देखील कमी भावात जात आहे. त्याबाबतीत देखील शेतक-याला फटका बसला आहे. तेव्हा ही परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने शेतक-यांना जास्तीत जास्त मदत द्यावी अशी माझी विनंती आहे. आंबा, काजू, नारळ, पपई, द्राक्ष, केळी, धान, गहू, हरभरा इत्यादी पिकांचे नुकसान झालेले आहे. एकही पीक या चक्रीवादळाने सोडलेले नाही. काही वेळा मानवापेक्षा निसर्ग किती क्रूर आहे असे वाटायला लागते. सभापती महोदय, जे बाधित शेतकरी आहेत त्याचे कर्ज माफ करा असे म्हटले तर ते कदाचित कठीण होऊ शकेल. शेतक-याचे कर्ज माफ करीत असाल तर ती स्वागतार्ह बाब आहे. पण त्यांच्या कर्जाचे रिशेडयुलिंग करा. या वर्षी कर्ज भरले नाही तरी चालेल यादृष्टीने विचार करा. तसेच कर्जावरील संपूर्ण व्याज माफ करण्याचा विचार झाला पाहिजे जेणेकरुन शासनाच्या माध्यमातून काही मिळते आहे अशा प्रकारचा विश्वास त्यांच्यात निर्माण होईल.

....नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री.अरुण गुजराथी.....

सन्माननीय सभापती महोदय, काही दिवसापूर्वी एक न्यूज होती की, केंद्रीय कृषिमंत्री यांनी नॅचरल कॅलॅमिटी कॉन्टिजन्सी फंडाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त 28 जिल्हयांना 628 कोटी रुपये मंजूर केले. नेमके काय आहे ते मला माहिती नाही. परंतु तशी न्यूज होती म्हणून सांगितले. माझी शासनाला विनंती आहे की, केंद्रामध्ये या पध्दतीचा जो फंड आहे तसा शेतकऱ्यांच्या संदर्भातील एक कॉन्टिजन्सी फंड राज्यामध्ये देखील निर्माण केला पाहिजे. दरवर्षी नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर कुठेतरी कॅबिनेट बैठक घ्यायची, त्यामध्ये मदत जाहीर करायची, यावेळी किती वाढवून द्यायचे, निधी कुठून आणायचा याची चर्चा होते. आज राज्यातील 65 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. परंतु राज्यातील कृषि खात्याला अर्थसंकल्पीय तरतूद नाही. 50 ते 100 कोटी रुपये मिळतात, ते देखील पगारावर खर्च होतात. केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये 1 टक्का तरतूद कृषिसाठी आणि 1.5 टक्का तरतूद पाटबंधाऱ्यांसाठी केली जात होती. आता ती वाढवून घेण्यात आली आहे. राज्यात असा एखादा निधी आपल्याला उभा करता आला तर ज्यावेळी शेतीच्या संदर्भात अडचण येईल, नैसर्गिक आपत्ती येईल त्यावेळी या निधीचा उपयोग होऊ शकेल. त्यादृष्टीने यावर्षी सुरुवात करावी. 500 कोटी रुपये आज उभे केले तर पुढील 10 वर्षात टप्प्याटप्प्याने 5000 कोटी रुपयापर्यंत वाढ केली गेली तर त्या रक्कमेच्या व्याजातून काही मदत देता येईल का याचा निश्चितपणे विचार करावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

माननीय सभापती महोदय, माननीय ऊर्जामंत्री याठिकाणी उपस्थित नाहीत. बागायतदारांना जे थकित व्याज द्यावे लागते ते 25 टक्के आहे, बाधित शेतकरी आहेत त्यांचे व्याज तरी माफ करावे. त्यांनी थकित व्याज भरले नसेल तर सर्व व्याज माफ करावे. बागायतदार शेतकरी देखील मोठया प्रमाणावर आहेत.

माननीय सभापती महोदय, पीक विमा योजनेबाबत बोलत असताना जोपर्यंत चांगल्या पध्दतीने पीक विमा योजना आपण राज्यात अंमलात आणत नाही तोपर्यंत शासनाने दर हेक्टरी 10, 20 किंवा 25 हजार रुपये मदत दिली तरी शेतकरी उभा राहू शकणार नाही. म्हणून पीक विमा योजनेच्या संदर्भात आपल्याला निश्चित आग्रह धरावा लागेल व त्यादृष्टीकोनातून विचार व्हावा.

माननीय सभापती महोदय, प्रेत सापडले नाही तर कुटुंबियांना मदत दिली जात नाही असे सांगितले गेले. कोकणात वादळामुळे जे मच्छिमार समुद्रात बेपत्ता झाले त्यांची प्रेते सापडली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

नाहीत. 6 ते 7 वर्षात प्रेत सापडले नाही तरी देखील मदत देण्याबाबत कायद्यात बदल करण्याचा विचार व्हावा. कोकणातील मच्छिमारांनी अभिनव असा मोर्चा काढला होता. 40 बोटींचा मोर्चा समुद्रात काढण्यात आला व शासनाकडे मागण्यांचे निवेदन दिले गेले. कोकणाचे प्रश्न वेगळे आहेत. खानदेशातील प्रश्न वेगळे असतील. विदर्भातील धानाचा प्रश्न वेगळा आहे. नाशिक जिल्हयातील टोमॅटो, कांद्रा, द्राक्ष पिकांचे प्रचंड नुकसान झाले. खानदेशातील कापूस, केळी आणि ऊसाचे प्रचंड नुकसान झाले. या संदर्भात चांगला असा निर्णय महसूलमंत्र्यांनी शासनाच्या माध्यमातून आग्रहाने करुन घ्यावा अशा पध्दतीची विनंती करतो. बाधित शेतकऱ्यांच्या वतीने त्यांचे जे दु:ख आहे ते हलके करण्याच्या संदर्भात शासन त्यांच्या पाठीशी उभे राहिले आहे असे चित्र निर्माण करावे इतके बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, फयान वादळाच्या संकटाने प्रामुख्याने समुद्र किनाऱ्याच्या जिल्हयांचे जे नुकसान झाले त्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी सविस्तरपणे आपली मते मांडली आहेत. प्रामुख्याने अवेळी आलेल्या पावसाने पश्चिम महाराष्ट्रात झालेले नुकसान या विषयाकडे मी आपल्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

सांगली जिल्ह्यामध्ये द्राक्ष पिकाचे प्रचंड नुकसान झालेले असून हा नुकसानीचा आकडा जवळपास 390 कोटीपर्यंत आहे. तसेच या भागात अवेळी झालेल्या पावसामुळे ज्वारीचे झालेले नुकसान जोडले तर द्राक्ष पीक आणि ज्वारीचे पीक मिळून हा आकडा 480 कोटीपर्यंत जातो. या व्यतिरिक्त कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा वगैरे भाग हा भात शेतीसाठी प्रसिध्द आहे. या भागात भात पिकाचेही नुकसान झालेले आहे. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात प्रचंड गुऱ्हाळे आहेत. या भागात साखर सम्राट जास्त असल्यामुळे ज्या गोष्टीकडे कोणाचेही लक्ष वेधले जाणार नाही अशा गुऱ्हाळांचेही भरपूर नुकसान झालेले आहे. सांगलीतील आटपाडी भागात डाळिंबाचे पीक मोठ्या प्रमाणात या वादळात व अवेळी पावसाच्या तडाख्यात सापडले असून त्याचेही नुकसान झालेले आहे, याचाही शासनाने विचार केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उल्लेख केला की, सातारा जिल्ह्यामध्ये सरकारी अधिकारी पाहणी करण्यासाठी केले त्यावेळेस नुकसान ग्रस्तांना मदत करण्याऐवजी त्यांची चौकशी करण्याऐवजी त्यांनाच पावसाच्या अगोदर पीक कापून घरी का नेले नाही असे विचारत होते. वास्तविक ओल्या लोंब्या घरी नेऊन फायदा नसतो हे सुध्दा अधिकाऱ्यांना समजत नाही. महाबळेश्वर आणि वाई भागात तर हेलिकॅप्टरने झालेल्या नुकसानीची पाहणी करुन अंदाज घेण्यात आले. मला वाटते की, अवेळी झालेल्या पावसामुळे पश्चिम महाराष्ट्रात द्राक्ष, डाळिंब, ज्वारी, भात इ. पिकाचे आणि गुऱ्हाळांचे जे प्रचंड नुकसान झाले आहे त्यांचा सर्वांचाच विचार केला पाहिजे. झालेल्या नुकसानीचे पंचनामे लवकरात लवकर पूर्ण झाले पाहिजेत आणि नुकसानग्रस्तांना ताबडतोब मदत दिली पाहिजे अशी मागणी करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, फयान वादळामुळे राज्यात ठिकठिकाणी झालेल्या नुकसानीच्या संदर्भात जो प्रस्ताव चर्चेला आला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, प्रामुख्याने कोकणाच्या संदर्भात बोलत असताना महत्वाचा मुद्दा असा आहे की, ओल्या भाताला आज मोड आलेले आहेत आणि तो भात खरेदी करण्यासाठी शासनाकडे कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही, अशी यंत्रणा शासनाने ताबडतोब उभी करण्यासंदर्भात दोन दिवसात आदेश काढावेत, अशी मी विनंती करतो. कारण सध्याच्या परिस्थितीत असा भात हा फेडरेशनच्या माध्यमातून खरेदी केला जातो आणि त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना एजंट म्हणून शासनाकडून नेमले जाते. पण अशा प्रकारे भात खरेदी केला तर त्यामध्ये घट होणार आहे आणि त्याची तफावत किती राहणार यासंबंधीचे ठोस उत्तर आजच दिले पाहिजे. माझी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, याबाबत तातडीने यंत्रणा उभी करुन हा ओला भात खरेदी करावा. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते बोलले की, काळी ज्वारी ज्याप्रमाणे शासन खरेदी करते त्याप्रमाणे कोकणातील भात खरेदी करण्यासाठी कोणतीही यंत्रणा नाही, अशी यंत्रणा तातडीने उभी करावी व त्यासंबंधीचा निर्णय दोन दिवसात घेण्यात यावा. माननीय मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात हे रायगडमध्ये आले त्यावेळेस भरपूर वादळ आले होते, ते पायी जाऊन भेट देत होते. माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे साहेबांचा दौरा आमच्याकडे आला परंतु वादळामुळे त्यांना रत्नागिरीहून येणे शक्य झाले नाही. आम्ही तीन तास त्यांची वाट पाहत बसलो होते. अधिकाऱ्यांनी मात्र प्रत्यक्ष जी पाहणी केली ती चुकीची झाली असून योग्य पंचनामे होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे 28 जुलै 2005 रोजी मुंबईत पावसाने जे नुकसान झाले होते त्यावेळेस शासनाने निर्णय घेतला होता की, आस्ट्रेलियाची मदत घेऊन आपण अशी यंत्रणा उभी करणार आहोत की, 15 दिवस अगोदर अशा प्रकारची आपत्ती येणार, कमी-जास्त दाबाचे पट्टे कोणत्या भागात तयार होतील हे अगोदरच कळेल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

फयान वादळ येणार आहे याची जाणीव शासकीय यंत्रणेला पाच दिवसापूर्वी होती. माझा स्वत:चा प्रवासी बोट वाहूतुकीचा व्यवसाय आहे. फयान वादळ येण्याच्या चार दिवसापूर्वीच आमच्या बोटी बंद करण्यात आल्या होत्या. फयान वादळ येणार आहे व या वादळामुळे काय परिस्थिती ओढवू शकते याची कल्पना महसूल खात्याला होती. वादळ येणार आहे याची माहिती महसूल विभागाला मिळाल्यामुळेच त्यांनी सागरी प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय बंद केला होता. परंतु ज्या बोटी माच्छिमारीसाठी खोल समुद्रात गेल्या त्यांना मात्र थांबविण्याचा प्रयत्न महसूल विभागाकडून झाला नाही. जिल्हा दंडाधिकारी आणि जिल्हाधिकारी ही पदे भूषविणा-या जिल्हाधिका-यांनी कोकणातील तीन जिल्हयात जाणीवपूर्वक काम केलेले नाही. ज्या अधिका-यांनी आपल्या कामात हलगर्जीपणा केला, कामात बेपर्वाई केली,कसूर केली अशा अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे याची माहिती या ठिकाणी आम्हाला मिळणे आवश्यक आहे. आम्ही पिढयानंपिढया अशा नैसर्गिक संकटांना तोंड देतच आलेलो आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले की, जी काही नैसर्गिक आपत्ती ओढवते त्यावर मात करण्यासाठी खालच्या पातळीवर सुध्दा सर्व यंत्रणा पुरवली गेली पाहिजे. सभापती महोदय, प्रत्येक लहान आणि मोठया बोटींवर आता मोबाईल असतोच असतो. परंतु लहान बोटी 12 वावच्या बाहेर मच्छिमारी करण्यास कधीही जात नाहीत तसेच दोन तीन सिलेंडरच्या बोटी सुध्दा 12 वावच्या बाहेर मच्छिमारी करण्यासाठी कधीही जात नाहीत. परंतु या छोटया बोटींना वादळ येणार आहे याची साधी कल्पनाही महसूल विभागाने दिलेली नाही, जिल्हाधिका-यांनी दिलेली नाही. त्यामुळे यासंदर्भातील माहिती माननीय महसूल मंत्र्यांनी या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. ज्या अधिका-यांनी आपल्या कामात कसूर केली अशा अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे याचीही माहिती या ठिकाणी माननीय महसूल मंत्र्यांनी देण्याची आवश्यकता आहे. कोकणामध्ये वादळामुळे जे काही नुकसान झालेले आहे ते भरुन काढण्यासाठी 5 ते10 वर्षे तरी लागतील. माननीय श्री. नारायण राणे यांची महसूलमंत्री म्हणून निवड झाली त्यावेळेस मी त्यांचे अभिनंदन करण्यासाठी गेलो होतो. खारलँडसाठी शासन 10 -20 कोटींची तरतूद करते त्यामध्ये 500 ते 600 कोटींची तरतूद करावी अशी सूचनाही मी माननीय महसूल मंत्र्यांना त्यावेळी केली होती. या वादळामुळे कोकणातील

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

दगडी ताटयांचेही नुकसान झालेले आहे. वैयक्तिक नुकसानभरपाई शासन आपल्या कुवती प्रमाणे देईलही परंतु फयान वादळामुळे ज्यांच्या धंद्यांचें नुकसान होणार आहे, धंद्यात अडचणी निर्माण होणार आहेत त्यासाठी शासन काय धोरण आखणार आहे याचीही माहिती कोकणवासींयाना तसेच महाराष्ट्रातील तमाम जनतेला कळाली पाहिजे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, कोकणातील शेतीमध्ये अजून सुध्दा पाणी साचलेले आहे. मी काल माझ या शेतावर गेलो होतो त्यावेळेस भाताची कापणी आणि मळणीही झाली होती परंतु पुढील जी पिके लावावयास पाहिजेत त्यासाठी जमीन कोरडी असावयास पाहिजे असते ती जमीन कोरडी नसल्यामुळे वालाची शेती तसेच इतर शेतीही करता येत नाही. शेती करता न आल्यामुळे शेतक-यांचे जे काही नुकसान होणार आहे त्यासाठी शासन काही मदत देणार आहे काय ? याचीही माहिती या ठिकाणी महसूल मंत्र्यांनी देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील ...

त्या बाबतीत सुध्दा माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. अलिबागचे वाल आणि पांढरे कांदे प्रसिध्द आहेत. परंतु पावसामुळे त्याचे पीक सुध्दा घेता येत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. तेव्हा या बाबतीत शासनाने ठोस असे धोरण जाहीर केले पाहिजे आणि कोकणवासिंयाना दिलासा दिला पाहिजे असे मला वाटते. फयान चक्रीवादळामुळे राज्यातील शेतीचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले असले तरी कोकणातील तीन जिल्हयात त्याही पेक्षा अधिक नुकसान झालेले आहे असे मला शासनाला सांगावयाचे आहे. कोकणातील तीन जिल्हयाच्या शेतक-यांना 50 कोटी रुपयांचे पीक कर्ज देण्यात आले कोकणातील शेतकरी प्रामाणिक असून कर्जाची परतफेडसुध्दा ते ताबडतोब करीत असतात .मी एक सहकारी बॅन्क चालवत असून सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्हयामध्येसुध्दा सहकारी बॅन्का आहेत. त्या बॅन्का मार्फत शेतक-यांना जे पीक कर्ज दिलेले आहे त्याला खास बाब म्हणून शासनाने माफी द्यावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे. ऊस आणि द्राक्ष पिकावर रोग पडल्यामुळे नुकसान झाले तर ऊस आणि द्राक्ष पिकविणा-या शेतक-यांना नुकसान भरपाई दिली जाते. त्याप्रमाणे कोकणातील शेतक-यांनासुध्दा नुकसान भरपाई दिली जावी. कोकणामध्ये मात्र अशा प्रकारे नुकसानभरपाई अजूनपर्यंत शासनाने दिलेली नाही तेव्हा या वर्षी नुकसान झालेल्या शेतक-यांचे पीक कर्ज माफ करण्यात यावे व शेतक-यांना दिलासा द्यावा. एवढया मोठया प्रमाणावरील नुकसान यापूर्वी कधीही कोकणामध्ये झालेले नाही. तेव्हा येथील शेतक-यांच्या कर्जाला माफी देण्यात यावी आणि शेतक-यांना दिलासा द्यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. चक्री वादळामुळे मच्छिमारांचेसुध्दा मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. या वादळामुळे छोटया मच्छिमारांच्या जाळया तुटल्या आहेत . त्यांची कोठेही नोंद नसल्यामुळे त्यांना मदत मिळत नाही. शासकीय अधिकारी फक्त मच्छिमार सोसायटयांमध्ये जाऊन माहिती घेत असतात .व तेथे ज्यांची नोंद आहे त्याच मच्छिमारांना मदत दिली जाते.मच्छिमार सोसायटयांमधून जे मच्छिमार डिझेल घेतात मच्छिमार सोसायटयांमध्ये जे मच्छिमार मासळी देतात त्यांनाच फक्त नुकसान भरपाई दिली जाते परंतु जे मच्छिमार तेथून डिझेल घेत नाहीत त्यांची नोंद मत्स्य व्यवसाय विभागाकडे होत नाही तसेच महसूल विभागामध्ये सुध्दा होत नाही त्यामुळे त्यांना शासनाकडून नुकसान भरपाई मिळत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही.तेव्हा अशा मच्छिमारांनासुध्दा मदत दिली गेली पाहिजे अशी माझी या चर्चेच्या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी सुक्या मासळीसबंधीचा एक मुद्दा मांडला आहे. अलिबाग तालुक्यात सर्वात जास्त सुकी मासळी तयार होत असते. कोळीवाडयामध्ये जेथे मासळी गोळा केली जाते त्याला मांडा असे म्हटले जाते आणि एका एका सोसायटीचा आठवडयाचा चार कोटी रुपयांचा मांडा असतो. पावसामुळे 17 कोळीवाडयातील कोटयावधी रुपयांची मासळी भिजून गेलेली आहे. ज्यांचे नुकसान झालेले आहे अशाही मच्छिमारांना मदत मिळाली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो. माननीय मंत्री महोदय मघाशी सभागृहात नव्हते ते आता आलेले असल्यामुळे मी पुनरुच्चार करतो की ओला झालेला भात सुध्दा शासनाकडून तातडीने खरेदी करण्यात आला पाहिजे त्याचबरोबर 70 टक्के उतारा असावा अशी मार्केटीग फेडरेशनकडे मागणी केली जाते तो उतारा 20 टक्क्यानी कमी करुन तो भात खरेदी करुन उता-याची घट कमी करण्याच्या बाबतीत शासकीय धोरण जाहीर करण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय, आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, 2005 साली तसेच या वर्षी तीन वेळा झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील शेतक-यांचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्या शेतक-यांना मदत करण्याच्या बाबातीत शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे त्यामुळे शासनाचे कोकणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे असे दुर्देवाने म्हणावेसे वाटते.

सभापती महोदय, 2005 साली शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासाठी 6 कोटी रुपये मंजूर करण्यात आले व त्यापैकी 5 कोटी रुपये परत गेले होते. ही नुकसान भरपाई या वर्षी देण्यात आल्याचे शासनाकडून सांगण्यात येत आहे . या वर्षी 24 जुलै व 2 ऑक्टोबर रोजी पाऊस पडला त्यामुळे ज्यांच्या पिकांचे नुकसान झालेले आहे त्या पिकाचे पंचनामे करण्यात आले 26 जुलै 2005 रोजी ज्याप्रमाणे मुसळधार पाऊस पडला होता त्या प्रमाणे 2 ऑक्टोबर 2009 रोजी सुध्दा पाऊस पडला होता. त्यामुळे दोन तासामध्ये घरामध्ये पाणी घुसले व काही घरे पडली तसेच काही घरे वाहून गेली होती त्याचे पंचनामे झाले परंतु अजूनही त्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही. त्यानंतर पुन्हा फयान वादळामुळे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे या वेळीसुध्दा प्रशासनाकडून मदत देण्याच्या बाबतीत दिरंगाई झाली आहे. आम्ही काही सन्माननीय सदस्यांनी त्या ठिकाणी जाऊन नुकसानीची पहाणी केली होती . सभापती महोदय, आपण सुध्दा त्यावेळी आमच्या समवेत होता.

नंतर श्री सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. उपरकर ....

जिल्हाधिकाऱ्यांबरोबर या संबंधात बोलत बसलो असताना त्यांनीच हे सांगितले आहे की, या वादळासंबंधात टीव्हीवर सारे सांगितले जात असताना जी काही माहिती उपलब्ध आम्हाला झाली ती 10 नोव्हेंबर रोजी 12 वाजता उपलब्ध झाली आणि ती आम्ही खाली दुपारी 2.00 वाजता दिली आणि ती माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दुसऱ्या दिवशी 11 वाजेपर्यंत इतरांना सांगितली. त्याबाबत कारणे सांगताना कोणी इंटरनेट बंद होते वगैरे कारणे सांगितली. पण अशा प्रकारे 10 तारखेला कळलेली माहिती स्थानिक पातळीवरच दुसऱ्या दिवशी 11 तारखेला पोहोचली आणि त्यांच्याकडून ती मच्छिमारांना आणि किनाऱ्यावरील लोकांना समजली पण त्यापूर्वीच अनेक मच्छिमार मच्छिमारासाठी खोल समुद्रात गेले होते. आपल्या अधिकाऱ्यांनाही याची माहिती होती की, हे मच्छिमार लोक मच्छिमारीसाठी दुपारी 2.00 वाजताच जात असतात आणि त्यामुळेच त्या मच्छिमारांना त्या दिवशी वादळ येणार आहे याची धोक्याची सूचना सरकारी यंत्रणेकडून दिली गेली नव्हती. परिणामी अनेकांचा जीव धोक्यात आला, अनेकांना आपला जीव गमवावा लागला. त्यातील कित्येक आजही बेपत्ता आहेत. सभापती महोदय, एवढेच नव्हे तर केंद्र सरकारकडून सिंधुदुर्ग जिल्ह्याला दोन बोर्ड आलेले आहेत. म्हणजी ही एक प्रकारचे यंत्र आहे. त्यातून कोणती मासळी कोणत्या भागात मिळणार आहे हे कळते तसेच एकूण वातावरण, हवामान कसे राहील याचीही माहिती समजते. सॅटेलाईटवरून चालणारे हे यंत्र आहे पण ते मेंटेनन्स अभावी सध्या बंद अवस्थेत आहे. ते यंत्र चालू असते तर मच्छिमारांना वादळाची पूर्वसूचना मिळू शकली असती आणि ते मच्छिमारीसाठी खोल समुद्रात गेले नसते. म्हणजेच केवळ शासनाने दुर्लक्ष केल्यामुळेच खऱ्या अर्थाने या मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे, अनेकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. म्हणूनच या सर्व मच्छिमारांना त्यांचे जे काही नुकसान झाले आहे त्याची शंभर टक्के भरपाई देण्याची गरज आहे. या वादळात ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना तातडीने मदत देता यावी यासाठी झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांनी दिल्या होत्या. परंतु पंचनामे करण्यासाठी लोक पुढे येत असतानादेखील अजूनही ते पंचनामे पूर्ण झालेले नाहीत. जे काही पंचनामे झाले आहेत ते 8 कोटी 25 लाख नुकसानीचे पंचनामे झाले पण प्रत्यक्षात मदत आली ती 4 कोटीची आणि ती मिळत असताना मत्स्य अधिकाऱ्यांकडून आपद्ग्रस्तांना सांगितले जात होते की, नुकसानीचे पुरावे आणा, जाळी फाटली

..... आयआय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उपरकर ....

असेल तर त्याचे पुरावे आणा, जाळींची बिले आणा. सभापती महोदय, आज जाळीवर विक्रीकर नाही मात्र 2005 पासून वॅट लागू झालेला आहे. पण त्यापूर्वीपासूनच त्यांच्याकडे जाळी आहेत. मग त्याचे पुरावे ते कसे काय आणू शकतील. दुसरे असे की, कोकणातील या मच्छिमारांचे कोणी ना कोणी तरी मुंबईमध्ये नोकरी करीत असतात आणि ती नोकरदार माणसे त्यांना मुंबईहून जाळ्यांसाठी दोरांची खरेदी करीत असतात व त्या दोरांची कोकणातील हे मच्छिमार लोक घरी जाळी विणत असतात. त्यामुळे त्या जाळ्याची पावती-बिले दाखविण्याचा जो आपला नियम आहे तो या मच्छिमारांना भरपाई देत असताना शिथिल करून त्यांना भरपाई देण्याची गरज आहे. सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, खोल समुद्रात मच्छिमारी करताना मृत्यू आल्यास किती भरपाई मिळते आणि कोकणात हत्तीने मारल्यास दोन लाख रूपये, वाघाने मारल्यास 10 लाख रूपये, ट्रेनमध्ये अपघातात मृत्यू आल्यास 5 लाख रूपये अशी भरपाई दिली जाते. खरे तर माणूस मरण्याची प्रक्रिया एकच आहे. परंतु तरीही अशा प्रकारे वेगवेगळ्या प्रकारे त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या नातेवाईकांना भरपाई दिली जाते. आता या वादळात सापडलेल्या मच्छिमारांना, खोल समुद्रात गेलेल्या मच्छिमारांना वादळामुळे आणि विशेषत: आपल्या सरकारी अधिकाऱ्यांनी वादळाची पूर्वसूचना मिळूनही ती मच्छिमारांना वेळेवर पोहोचविली नसल्याने त्यांचे जे नुकसान झालेले आहे, त्यांना जीव गमवावा लागला आहे त्याची भरपाई सरकारने जास्तीत जास्त दिली पाहिजे. खोली समुद्रात मृत्यू आल्यास त्याला 5 ते 10 लाख रूपयांची भरपाई दिली जाण्याची गरज आहे. आजही अनेक मच्छिमारांचे नातेवाईक आपला माणूस खोल समुद्रात बोट घेऊन गेला आहे पण तो परत आलेला नाही म्हणून त्याची वाट पाहत बसलेले आहेत. त्यातील काही नातेवाईक तर बंदर अधिकाऱ्यांना अमुक ठिकाणी आमची माणसे, आमच्या बोटी असतील असे सांगत आहेत, त्यांच्या मोबाईलवरून त्यांचे लोकेशन ते काढून ही माहिती देत आहेत आणि बंदर अधिकाऱ्यांना त्या मच्छिमारांना परत आणण्यासाठी जाण्यास सांगत आहेत. पण बंदर अधिकारी सांगतात की, आमच्या बोटी समुद्रात जात नाहीत. या संदर्भात आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे सिंधुदुर्ग जिल्ह्यात बंदर अधिकारी हे पद 20.9.2008 पासून रिक्त आहे इतकेच नव्हे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण, वेंगुर्ला सारख्या बंदरावर बंदर अधिकारीच नसल्यामुळे तेथील श्रेणी 3 व 4 चे कर्मचारीच बंदर अधिकाऱ्याचे काम करीत आहेत. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... जेजे 1 ...

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

अशापध्दतीने दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देतांना म्हटले आहे की, आमच्याकडे बोटी आहेत परंतु त्या खोल समुद्रामध्ये जात नाहीत. कारण त्यांची नोंदणी इन्लँड व्हेसल ॲक्टखाली झाली आहे. मच्छिमार सांगत होते की, 30 नॉटिकल माइल, 60 नॉटिकल मैलापर्यंत शासनाची यंत्रणा जाऊ शकत नव्हती, त्यामुळे मच्छिमारांना ते वाचवू शकत नव्हते. परंतु रत्नागिरीच्या मच्छिमारांनी स्वत:च्या हिंमतीवर, जबाबदारीवर वादळामध्ये सापडलेली एक बोट आणि त्यावरील तीन खलाश्यांना इंधन देऊन, डिझेल देऊन परत बंदरामध्ये आणले. अशाप्रकारे खाजगी मच्छिमार, किंवा स्थानिक मच्छिमार लोकांना वाचवू शकतात. परंतु प्रशासनाकडून मच्छिमारांना वाचविण्यासाठी कोणत्याही प्रकारची उपाययोजना होत नाही. याठिक्राणी आपल्याला खऱ्या अर्थाने मच्छिमारांना दिलासा द्यावासा वाटत असेल तर नुकसान भरपाईचे निकष बदलले पाहिजेत. मच्छिमार मत्स्य दुष्काळाच्या खाईमध्ये सापडलेला असतांना आणि वादळामध्ये त्यांची बोटी वाहून गेलेली असतांना माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे सुके मासे देखील वाहून गेले. मासे खारविण्यासाठी त्यांनी आणलेले मीठ देखील वाहून गेले. अशाप्रकारे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जवळ जवळ 20 लाखाची सुकी मच्छी वाहून गेली, आणि 14 लाखाचे मीठ पूर्णपणे नष्ट झाले. तेव्हा याबाबत देखील नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने उपाय योजना केली पाहिजे. आज मत्स्य व्यवसाय करण्यासाठी मोठया बोटींबरोबर छोटया बोटींचा वापर करावा लागतो. मोठया बोटींमधून छोटया बोटीमधून मासे वाहून किनाऱ्यावर आणावे लागतात. त्यामुळे अशा छोटया बोटींना डिंगी किंवा पगारे म्हणतात. असे 40 पगारे पूर्णपणे वाहून गेले आहेत. त्यांचा शोध लागत नसल्यामुळे 12 लाखाचे नुकसान झाले आहे. एवढेच नव्हेतर बोटी चिखलातून नेण्यासाठी लाकडे वापरली जातात, ही लाकडे सुरुची वृक्षाची असल्यामुळे ती समुद्रामध्ये तरंगत नाहीत. ती समुद्राच्या पाण्यामध्ये बुडतात. त्या लाकडांच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा झाला परंतु त्याची नुकसान भरपाई देण्याबाबत कोणत्याही प्रकारची उपाय योजना केली नाही. लोकांना दिलासा देण्याच्या बाबतीत शासनाची अशी पध्दत आहे की, सुरुवातीचे कर्ज आणि नव्याने दिले जाणारे कर्ज असे दोन्ही कर्ज वसूल करुन त्यांचे पुनर्वसन केले जाते. असे करण्यापेक्षा त्यांच्या बोटीचे झालेले नुकसान पाहून सुरुवातीचे त्यांनी घेतलेले कर्ज माफ करावे आणि पुन्हा नव्याने कर्ज देण्यात यावे. अशाप्रकारची उपाय योजना करण्याची गरज आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. परशुराम उपरकर...

सभापती महोदय, त्याचप्रमाणे आंबा बागायतदार, या काळात पालवी येतांना आंब्याच्या झाडावर फवारणी करतात. सिंधुदुर्ग जिल्हयातील एका औषध व्यापाऱ्याकडून घेतलेल्या माहितीनुसार आंबा बागायतदारांनी कोटयवधी रुपयांची औषध फवारणी झाडांवर केली होती. परंतु अवकाळी आलेल्या पावसामुळे आणि वादळामुळे ती पूर्णपणे नष्ट झाली. त्यामधून आंबा बागायतदारांचे जे नुकसान झाले आहे त्यांची योग्यरितीने त्यांना भरपाई मिळाली पाहिजे.त्यासाठी आपण निकष बदलण्याची गरज आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये भाताचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. शेतामध्ये भाताचे पीक उभे असतांना 2 ऑक्टोबर रोजी झालेल्या पावसामुळे भाताचे पीक पूर्णपणे पाण्याखाली गेले. त्यानंतर आलेल्या वादळामुळे भाताचे पीक पूर्णपणे झोपून गेले. त्यामध्ये झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी शासनाने योग्य पध्दतीने निर्णय घेऊन नुकसान भरपाई द्यावी. कोकणामध्ये नुकसान भरपाई देतांना शासन दुर्लक्ष करते हे आमचे दुर्दैव आहे. वादळामुळे मच्छिमारांचे नुकसान होत असतांना या राज्याचे मत्स्योद्योग मंत्री कोकणामध्ये फिरकले नाहीत, किंवा तेथील मच्छिमारांना ते दिलासा देऊ शकले नाहीत हे कोकणाचे दुर्दैव आहे. आणि म्हणून कोकणाला दिलासा देण्यासाठी, असलेले निकष बाजूला ठेवून मच्छिमारांचे खऱ्या अर्थाने पुनर्वसन करण्यासाठी शासनाने उपाय योजना करावी अशी मागणी करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना मी आपल्या सर्वांसमोर काही मुद्दे मांडू इच्छिते.

सभापती महोदय, ज्यावेळेला फयान वादळाची सुरुवात झाल्यानंतर आम्हाला त्याची तीव्रता समजली तेव्हा शासनाने आमच्या यंत्रणेला मग ती सिंधुदूर्ग जिल्ह्यातील असो, रत्नागिरी जिल्ह्यातील असो किंवा रायगड जिल्ह्यातील असो कल्पना देण्यात आली. मी स्वत: या तीनही जिल्ह्यांमध्ये थोडयाफार फरकाने काम करीत असते. फयान वादळ झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे माननीय महसूल मंत्री यांनी स्वत:जातीने दोन दिवस त्या परिसरामध्ये पहाणी केली. तेथील लोकांच्या सुख-दु:खाबाबत चर्चा केली आणि त्यानुसार आदेश दिले. परंतु तेवढ्यावर काम भागले असे मला म्हणावयाचे नाही. याचे कारण असे की, आजची प्रशासकीय यंत्रणा मग ती मच्छिमारांच्या संबंधातील असू देत किंवा शेतकऱ्यांच्या संदर्भातील असू देत किंवा आणखी कोणत्याही भागातील असू देत, त्यांच्याबद्दल जनतेच्या मनामध्ये फारशी आस्था आहे अशा प्रकारचे चित्र या वादळानंतर या तीनही जिल्हयांमध्ये पहावयास मिळालेले नाही. परंतु नाशिक जिल्ह्यामध्ये कांदा आणि द्राक्षाच्या पिकाचे नुकसान झालेले आहे, सोलापूर मध्ये डाळिंब व इतर फळांचे नुकसान झालेले आहे. तसेच मी खास करुन सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या बाबतीत उल्लेख करीन. त्या जिल्ह्याची अशी निर्मिती झालेली आहे की, त्याच्या तीनही बाजूने पाणी आहे आणि त्यामधून तो जिल्हा वरपर्यंत गेलेला आहे. तेथे मच्छिमार आणि इतर मंडळी आपापला उद्योगधंदा करतात. तेथे माझ्या परिचयाचे श्री.मानकर कुटुंबीय आहेत. त्यांची बोट समुद्रामध्ये गेली आणि त्यावरील माणसे अजूनही परत आलेली नाहीत. मी स्वत: तेथे तीन दिवस जाऊन आले आहे. आता समुद्राच्या काठावर उभे राहून आपल्या लोकांची वाट पहाण्याखेरीज त्यांच्या हातामध्ये काहीही राहिलेले नाही. अशा वेळी आपण या लोकांसाठी काय करणार आहात ? हा महत्वाचा मुद्दा आहे. मी असे म्हणणार नाही की, अमुक भागाला इतके पैसे मिळाले वगैरे. पण रत्नागिरी, सिंधुदूर्ग आणि रायगड मधील लोकांना देखील भरीव मदत व्हावयास पाहिजे अशी मी मागणी करते. याचे कारण सिंधुदूर्ग, रत्नागिरी व रायगड मध्ये नारळ, सुपारीच्या बागा आहेत, आंब्याच्या बागा आहेत. जेव्हा फयान वादळ झाले तेव्हा नारळाचे एक झाड दुसऱ्या झाडावर आणि दुसरे झाड तिसऱ्या झाडावर अशा प्रकारे झाडे पडली. तशीच अवस्था सुपारीच्या बाबतीत झाली आहे. आंबा बागायतदारांनी आंब्याची लागवड केली पण त्याचेही नुकसान

. . . .2 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाले आहे. मग आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचले की, जे नुकसान झालेले आहे, त्याचे पंचनामे करण्यात आले असून शेतकऱ्यांना अमुक इतकी मदत मिळालेली आहे. परंतु प्रत्यक्षात अजूनही काही ठिकाणी पंचनामे झालेले नाहीत. याबाबतीत शासकीय यंत्रणा फारशी अग्रेसर आहे अशा प्रकारचे चित्र आम्हाला पहावयास मिळत नाही. त्यामुळे आपल्याला यादृष्टीने देखील पावले उचलावी लागतील. जर अशा प्रकारे पावले उचलली नाहीत तर प्रशासकीय यंत्रणेमध्ये आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये मग ते बंदर विभागातील अधिकारी असतील, दुसऱ्या विभागातील अधिकारी असतील त्यांच्यावर कोणाचाही वचक रहाणार नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथीसाहेब यांनी केळीच्या पिकाचे जे नुकसान झालेले आहे, त्याबाबत उल्लेख केला. परंतु त्याचबरोबर कापसाचे देखील नुकसान झाले आहे, ज्वारी काळी पडली आहे आणि तसेच रायगड जिल्ह्यामध्ये भाताच्या पिकाचे अतोनात नुकसान झाल्याची माझ्याकडे माहिती आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

शासन त्यांना दोन ते तीन हजार रुपये मदत देऊन थांबणार असेल तर शासनाला तसे थांबता येणार नाही.यासंदर्भात मी शासनाला विनंती करु इच्छिते की, या संदर्भात एक उच्चस्तरीय समिती नेमून त्या समितीच्या माध्यमातून पुन्हा एकदा झालेल्या नुकसानीचा अहवाल मागविण्यात यावा. त्या त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांचे किती नुकसान झालेले आहे हे त्या त्या जिल्हयाचे कलेक्टर आणि त्या संदर्भातील सगळया यंत्रणेला बोलावून माहिती घेण्यात यावी. त्यावेळी आम्हाला बोलावण्यात यावे असे आम्ही म्हणणार नाही पण लोकांपर्यंत मदr पोहचणे अत्यंत गरजेचे आहे. नाही तर जसे मानकर कुटुंब समुद्राच्या किनाऱ्यावर उभे राहून आपला बुडालेला माणूस आज येईल उद्या येईल याची वाट पहात आहे तसे होईल. थोडया वेळापूर्वीच आमच्या मंत्री महोदयांनी सांगितले की, सात वर्षानंतर त्याचे काय बरे-वाईट होईल यावरुन त्याला किती मदत द्यावयाची हे ठरणार आहे. सात वर्षानंतर त्याचे कुटुंब उभे राहील. त्यावेळी ते शासनाकडे मदत मागण्यासाठी येणार नाही. म्हणून आता शासन काय मदत करणार आहे ते शासनाने सांगावे. त्याचप्रमाणे जे 56 मच्छिमार बुडालेले आहेत त्यांच्या कुटुंबियांसाठी शासन काय मतद देणार आहे हेही सांगितले पाहिजे.

मला शासनाला आणखी एक सूचना करावयाची आहे. पाच ट्रॉलर आजही मिळालेले नाहीत हे ट्रॉलर कुठे गेले, ते कधी मिळणार आहेत याची माहिती देणे गरजेचे आहे. ठाणे जिल्हयाचे मी या ठिकाणी उदाहरण देते. मंत्रालयातील प्रशासकीय यंत्रण महाराष्ट्रातील सर्व जिल्हे सोडून फक्त ठाणे जिल्हयावर लक्ष केंद्रीत करीत होती, त्यावेळी मला मोठे आश्चर्य वाटले. मी तेथील एका अधिकाऱ्याला प्रश्न सुध्दा विचारला की, ठाणे जिल्हयामध्ये एवढे काय घडले आहे की, तुम्ही सगळेजण ठाणे जिल्हयावर लक्ष केंद्रीत करीत आहात. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये, रत्नागिरी-मिऱ्या बंदर येथे वादळ झालेले आहे. असे असताना तुम्ही फक्त ठाणे जिल्हयावर लक्ष का केंद्रीत करता. तेव्हा याबाबतीत देखील चौकशी व्हावी, अशी मी शासनाला विनंती करते. सातपाटी, विरार वसई या ठिकाणच्या सुक्या मच्छीवाल्यांचे नुकसान झालेले आहे. त्या मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळणे अत्यंत गरजेचे आहे आणि ती मिळाली पाहिजे. नाही तर असा एक संदेश जाईल की,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

श्रीमती अलका देसाई....

पश्चिम महाराष्ट्राला सर्व काही मदत मिळते आणि कोकणाकडे कोणी बघत नाही. हा चुकीचा संदेश दादांच्या नेतृत्वाखाली जाणार नाही, हे मला ठाऊक आहे. तरीही आम्ही सगळ्यांनी याला हातभार लावला पाहिजे आणि या तिन्ही जिल्हयातील लोकांना शासनाने मदत केली पाहिजे अशी माझी आग्रहाची मागणी आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, फयान वादळामुळे कोकणात जे नुकसान झालेले आहे तसेच महाराष्ट्राच्या निरनिराळया भागामध्ये जे नुकसान झालेले आहे त्यासंबंधात मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रात जरी शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असले तरी कोकणातील बागायतदार शेतकरी देखील मोठया प्रमाणात उद्ध्वस्त झालेला आहे. कोकणात 72 हजार हेक्टर जमीन आणि सात ते आठ लाख लोक या फयान वादळामुळे उद्ध्वस्त झाले आहेत. या संदर्भातील नेमके मुद्दे मी याठिकाणी मांडणार आहे. 11 तारखेला फयान वादळ झ ाले. त्या आधी देखील कोकणात अतिवृष्टी झाली होती. पण त्याबाबतचा मुद्दा कुठे उपस्थित झ ालेला दिसत नाही. दि. 30 सप्टेंबर रोजी कोकणात जी अतिवृष्टी झाली त्यामध्ये देखील काही ठिकाणी मोठया प्रमाणात हानी झाली पण ती दुर्लक्षित केली गेली की काय? असे मी त्याठिकाणी जाऊन आल्यानंतर माझ्या लक्षात आले. मी काही दिवसांपूर्वी राजापूर तालुक्यामध्ये गेलो होतो. त्या ठिकाणी भू या पंचक्रोशीमध्ये सुपारी, नारळ इत्यादीचे उत्पादन करणारे बागायतदार आहेत, त्या ठिकाणी मी भेटी दिल्या. या बागायतदारांना अद्याप कुठलीही नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे त्या ठिकाणी तातडीने मदत करण्याची गरज आहे. त्याठिकाणी नऊ बंधारे आहेत. मातीचे आणि दगडाचे हे सगळे बंधारे नदीचा प्रवाह बदलल्यामुळे पडले आहेत. पुढच्या काळात हे बंधारे बांधले गेले नाहीत, त्यासाठी योग्यवेळी त्या ठिकाणी मदत पोहचली नाही तर येथील बागायतदार जे आधीच संपलेले आहेत ते पूर्णपणे उद्ध्वस्त होणार आहेत अशा प्रकारची त्या ठिकाणची आजची परिस्थिती आहे. म्हणून राजापूर जवळच्या भू पंचक्रोशीतले, आंबे, ढोकण परिसरातील हे बंधारे तातडीने बांधले गेले पाहिजेत.

(सभापतीस्थानी तालिकासभापती श्री. चंद्रकांत पाटील)

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

त्या ठिकाणी तातडीने मदतकार्य झाले पाहिजे. त्या ठिकाणी प्रवाह बदललेला आहे. त्या ठिकाणी ज्यांचे पंचनामे अजून झालेले नाहीत त्यांचे देखील पंचनामे झाले पाहिजेत. हे मी अतिवृष्टीबाबत सांगत आहे. त्यानंतर फयान झाले. म्हणजे अतिवृष्टी झाल्यानंतर शासनाने काही केले नाही आणि प्रशासनाने काही केले नाही. त्यामुळे आता कोकणातील लोकांना शासन फयाननंतर काही करणार की, नाही याची काळजी वाटावयास लागली आहे. कारण अजून अतिवृष्टीच्या बाबतीत त्यांना काही मिळालेले नाही. त्यामुळे त्यांना तातडीने मदत करणे अत्यंत आवश्यक आहे. खरे म्हणजे वीज मंडळाच्या संदर्भात आपण देखील वर्तमानपत्रामध्ये वाचले की, शेकडो विजेचे खांब पडलेले आहेत. त्या ठिकाणी लाईट गेली आणि सगळीकडे अंधार झाला. ते खांब लावण्याच्या बाबतीत सुध्दा वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी काही बघितले नाही. जे खांब त्या ठिकाणी लावावयास पाहिजे, त्या ठिकाणी पुन्हा लाईट आली पाहिजे ते काही केले नी. दापोली भागामध्ये तेथील बागायतदारांनी स्वत: ते खांब लावले. ते खांब त्यांनी माती इकडेतिकडे करुन त्यांच्या ताकदीनुसार लावलेले आहेत. त्यामुळे वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने ते खांब त्यांच्या पध्दतीने लावले पाहिजेत. नाही तर पुन्हा ते खांब कोसळतील. शेकडो खांब त्या ठिकाणी कोसळलेले आहेत. त्या ठिकाणी फयानच्या निमित्ताने जे बागायतदार उद्ध्वस्त झालेले आहेत त्यांच्या बाबतीत सगळ्यांनी सांगितले की, ही जी मदत अपुरी आहे. त्याचे निकष बदलले पाहिजेत. कोकणातील लोकांकरिता तर निश्चितपणे निकष बदलले पाहिजेत. त्या ठिकाणी त्यांनी जे टेबल दिलेले आहे त्यानुसार एका हेक्टरमध्ये 100 नारळ, एका हेक्टरमध्ये 135व सुपारी, एका हेक्टरमध्ये 100 नग हापूस, एका हेक्टरमध्ये 200 नग काजू होतात. आज जी मदत आपण दिलेली आहे त्यानुसार 100 नग नारळाला 150 रुपये, सुपारीला प्रती झाड 11 रुपये आणि काजूला 75 रुपये अशी स्थिती आहे. त्यामुळे त्या बागायतदारांचे असे म्हणणे आहे की, ही आमची चेष्टा आहे. झाडाची लागवड केल्यानंतर प्रत्यक्ष पीक हातामध्ये येण्यासाठी किंवा फळे हातामध्ये येण्यासाठी 10 ते 15 वर्षे लागतात. त्या ठिकाणी त्यांना एक झाड वाढविण्यासाठी प्रतिवर्षी 200 रुपये खर्च येतो. नारळाला 200 रुपये, सुपारीला 70 रुपये, हापूसला 235 रुपये, काजूला 30 रुपये खर्च येतो. त्यामुळे ही

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

श्री. संजय केळकर .....

मदत अपुरी आहे. ही मदत त्यांना तातडीने वाढवून मिळाली पाहिजे. नाही तर ते बागायतदार मदत घेण्याच्या मन:स्थितीमध्ये नाहीत. एवढी मदत घेऊन आम्हाला काय करावयाचे आहे, आधीच आम्ही उद्ध्वस्त झालेलो आहोत. आधीच दोन तीन वर्षापासून आंबा, नारळ, सुपारी, काजू बागायतदार आहेत किंवा धान पिकविणारे शेतकरी आहेत ते आधीच चिंतेमध्ये आहेत. प्रत्येक वेळी त्यांना नुकसानभरपाई द्यावी लागली आहे अशा प्रकारचे संकट सातत्याने त्यांच्यवर आलेले

सभापती महोदय, माझी आणखी एक विनंती आहे. 2005 साली ज्यावेळी अतिवृष्टी झाली होती त्यावेळी अनेक शाळा आणि कॉलेजेसचे पत्रे उडाले होते, भिंती पडल्या होत्या. राजापूर तालुक्यामध्ये एका शाळेची भिंत कोसळली. खरे म्हणजे त्याची चौकशी झाली पाहिजे. ज्यावेळी अशा प्रकारचे वातावरण निर्माण होते त्यावेळी आपण शाळांना सुट्टी देतो, मुलांना सुरक्षित ठिकाणी हलवतो पण त्या ठिकाणी पेपर चालू होता. त्या ठिकाणी संरक्षक भिंत पडल्यामुळे 8 वर्षाच्या आणि 12 वर्षाच्या दोन मुलींचे निधन झाले. आम्ही त्यांच्या घरी जाऊन आलो. त्यांना पूर्ण मदत देखील मिळालेली नाही. त्यांच्या घरच्या लोकांना 50 हजार रुपये मिळालेलें आहेत. अशा प्रकारे जसा शेतकऱ्यांना त्रास होतो, शेतकऱ्यांचे नुकसान होते, घरांचे नुकसान होते त्याच पध्दतीने शाळा कॉलेजेसचे नुकसान होते. पत्रे उडाल्याच्या संदर्भात आमच्याकडे अनेक शाळांची पत्रे आलेली आहेत. हे परवडणारे नाही. कोकणामध्ये 30-40 वर्षापासून शाळा चालवित आहेत. एक तर त्यांना शासनाचे अनुदान मिळत नाही. त्यांना वेतनेतर अनुदान मिळत नाही. हा खर्च भागविता भागविता त्यांचा दम निघतो आणि त्यामुळे अशा प्रकारचे संकट आल्यानंतर या शाळा आणि कॉलेजेसचे जे जे नुकसान झाले असेल त्यांना देखील नुकसानभरपाई मिळाली पाहिजे. मागच्या अतिवृष्टीच्यावेळी वारंवार पाठपुरावा केला तरी देखील त्यांना मदत मिळाली नाही. कारण शासनाच्या निकषामध्ये बसत नाही असे उत्तर दिले गेले. परंतु यावेळी अतिवृष्टीमुळे किंवा फयानमुळे जे काही नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात शालेय विद्यार्थ्यांना आणि संस्थांना देखील मदत मिळाली पाहिजे अशा प्रकारची मागणी या ठिकाणी मी शासनाकडे करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

मच्छिमारांसंबंधी अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. कोकणाला 750 कि.मी.ची किनारपट्टी लाभली आहे. मच्छिमारांकडून अनेक मागण्या केल्या जातात, परंतु त्या पूर्ण होत नाहीत. त्यासाठी त्यांनी शासनाकडे निवेदने दिलेली आहेत. खरेतर डिझेलच्या विक्रीकराची रक्कम 15 दिवसात मिळाली पाहिजे. पण ती रक्कम 5-5 महिने मिळत नाहीत. रॉकेलचे अनुदान बाकीच्या राज्यामध्ये मिळते, परंतु आपल्या राज्यात ते मिळत नाही. केंद्र सरकारकडून सर्व मच्छिमारांना प्रति लिटर 3 रुपये अनुदान मिळाले पाहिजे. हे सर्व अनुदान मच्छिमारांना दिले तर ता उभा राहील. कोकणातील मच्छिमार सरकारच्या व निसर्गाच्या भोवऱ्यात अडकला आहे. महाराष्ट्रातील विदर्भात व इतर भागात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तशी वेळ कोकणातील या मच्छिमारांवर येऊ नये म्हणून याबाबत अगोदरच काळजी घेतली पाहिजे. त्यांच्याजवळ जे काही आहे त्याच्यातून त्यांचा उदरनिर्वाह भागत नाही. त्यात निसर्गाच्या संकटाची भर पडल्यामुळे त्याच्या हालाला पारावार राहिलेला नाही. या लोकांना शासनाने वेळेवर मदत दिली नाही तर फार मोठी बिकट परिस्थिती निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, वादळाची सूचना देणारी आपल्याकडे यंत्रणा आहे. ही यंत्रणा सक्षम आहे की नाही हे तपासले पाहिजे. देवगडमध्ये किंवा किनारपट्टीवर 9, 10, 11 तारखेला फयान वादळ आले. परंतु या तारखेपूर्वी या यंत्रणेमार्फत सूचना दिली गेली असती तर आज लोक बेपत्ता झाले नसते, बोटी बेपत्ता झाल्या नसत्या, त्यातून अनेक प्रश्न सुटले असते. त्यामुळे ही यंत्रणा सक्षम करणे आवश्यक आहे. किनारपट्टीवर सुरक्षेचे धोके आहेत. असे वादळ आले तर अनेक धोके निर्माण होतात. म्हणून सूचना देणारी यंत्रणा आहे. त्या यंत्रणेमध्ये कोण अधिकारी होते, त्यांनी मच्छिमारांना वेळेवर सूचना का दिली नाही, कोणती यंत्रणा त्यावेळी कार्यरत होती ? त्यांच्यात सुसूत्रता नसते त्यामुळे या मच्छिमारांना संकटाला सामोरे जावे लागते. कस्टम, कोस्ट गार्ड, नेव्ही या यंत्रणांमध्ये सुसूत्रता असणे आवश्यक आहे. साधी सायरनची व्यवस्था सुध्दा नाही. स्पीड बोटी, किनारपट्टीवर लाईट देणारी यंत्रणा असते ती व्यवस्था नाही ही व्यवस्था करण्यात यावी. सभापती महोदय, शासनाने कोकणावर सातत्याने अन्याय केलेला आहे. शेतीच्याबाबतीत,

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

बागायती शेतीच्याबाबतीत, सिंचनाच्या अनुशेषाबाबतीत नाही तर शालान्त परीक्षा मंडळाच्याबाबतीत अन्याय केला आहे. अडीच वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये कोकणासाठी स्वतंत्र शालान्त परीक्षा मंडळ सुरु केले जाईल असे सभागृहात सांगितले गेले आहे. परंतु आजतागायत त्याबाबतचा जी.आर.निर्गमित झालेला नाही. प्रत्येक विषयाच्याबाबत कोकणावर अन्याय होतो, तो दूर झाला पाहिजे. फयान वादळामुळे आणि 30 सप्टेंबर रोजी अतिवृष्टीमुळे कोकणातील लोकांचे नुकसान झाले त्यांना योग्य पध्दतीने न्याय द्यावा अशी सूचना करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, फयानग्रस्त शेतकऱ्यांच्या संदर्भात याठिकाणी चर्चा होत आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मागील अधिवेशन सुरु होते. नेमक्या त्याच अधिवेशनाच्या दिवशी फयान वादळ आले होते. त्यामुळे मंत्री महोदयांनी असे सांगितले की, शाळा व शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना लवकर सोडून देण्याची सुरुवात करीत आहोत. शेवटी ते वादळ आले, त्या वादळामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांची स्थिती प्रत्यक्षात जाऊन पाहण्याचा दुर्दैवी योग आला. मी वेंगुर्ल्यापासून दापोलीपर्यंत सर्व ठिकाणी जाऊन आलो. आपद्ग्रस्त मच्छिमारांच्या घरामध्ये जाऊन आलो. त्याठिकाणी जो आक्रोश पाहिल्यावर काळीज फाटून जात होते. रत्नागिरी जिल्हयातील 22 मच्छिमार बेपत्ता झाले आहेत, त्यांच्या घरी गेलो, सिंधुदुर्ग जिल्हयातील 13 मच्छिमार बेपत्ता झाले आहेत, त्यांच्या घरी गेलो. शिवसेना पक्षाच्यावतीने या लोकांना जमली तेवढी मदत देण्यात आली आहे. परंतु सर्वात महत्वाचे म्हणजे या बेपत्ता झालेल्या मच्छिमारांची वये लहान होती. सिंधुदुर्ग जिल्हयातील 13 पैकी 11 मच्छिमारांचे वय केवळ 22 ते 40 वर्षे होते, उर्वरित केवळ 2 मच्छिमार 53 व 55 वर्षांचे होते.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत....)

या सर्व कुटुंबांची अवस्था फार वाईट आहे. मी देवगड तालुक्यातील वाडातर मधील डोके कुटुंबाला भेटलो. त्या माऊलीचा आक्रोश बघवत नव्हता. ती सांगत होती की, मला मदतीची वगैरे गरज नाही. मला माझे मूल ज्या अवस्थेत असेल त्या अवस्थेत माझ्या समोर आणून ठेवा, ते गेले असेल त्याचा देह माझ्या समोर आणून ठेवा. अशा प्रकारचे दुर्दैवी चित्र पहायला मिळाले. सभापती महोदय, ज्यावेळी यासंदर्भात आपण चौकशी करतो त्यावेळी ह्या आपत्तीतून आपण सारे वाचलो असतो, जे काही नुकसान झाले ते झाले नसते, असे वाटते. फक्त आपत्कालीन नावाची जी काही व्यवस्था आपण निर्माण केलेली आहे ती त्यावेळी कुठे होती याची चिंता वाटायला लागते. 1966 साली वादळ आले होते आणि त्याची सूचना शासनाने तीन महिने आधी दिली होती. 1966 पासून 2009 पर्यंत आपण किती तरी प्रगत झालो आहोत. आपण एवढे प्रगत झालेलो असताना सुध्दा आमच्या मच्छिमार बांधवांना आपणाला साधी एक सूचना देता आली नाही. कुणाचा कुणाला ताळमेळ नव्हता. रत्नागिरीमध्ये जिल्हाधिका-याबरोबर बैठक झाली. इतका संवेदनाहीन, संवेदनाशून्य, ढीम्म माणूस मी पाहिला नाही. काही तत्परतेने करण्याची इच्छा नाही, सारे दुस-यावर ढकलून आम्ही त्यामध्ये नाही हे सांगण्याचा त्याचा प्रयत्न. सभापती महोदय, आपत्कालीन व्यवस्थेच्या संदर्भात या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. डिझास्टर मॅनेजमेंटसाठी जो कोणी अधिकारी नेमलेला होता त्या अधिका-याने काय केले ? ते पूर्वसूचना का देऊ शकले नाहीत ? जिल्हाधिकारी आणि दंडाधिकारी देखील तेच . ते काय करीत होते ? मग आम्ही बंदर अधिकारी, कस्टम, कोस्टगार्ड यांच्याकडे बघतो. मच्छिमारांची समुद्रात तरंगणारी प्रेते काढण्याच्या बाबतीत कोस्टगार्ड सांगते की ते आमचे काम नाही, जिवंत माणसांना शोधण्याचे आमचे काम आहे. या फयानमध्ये घरेदारे संपूर्णपणे उद्ध्वस्त झालेली आहेत. मालवण जवळ देवबाग हे गाव पूरनियंत्रण रेषेच्या आत आहे. ते गाव निष्कासित करण्यासंबंधी महसूल खात्याने नोटीस दिलेली असावी. मी त्या गावाला भेट दिली. त्या गावामध्ये एक घर असे आहे की, थोडे ढकलले तरी त्याची भिंत पडेल. त्या कुटुंबाला काय मदत देणार अशी मी विचारणा केल्यानंतर त्यांना यापूर्वी घर खाली करण्यास सांगितलेले असून देखील त्यानी तसे केले नाही म्हणून त्यांना मदत मिळणार नाही असे सांगितले. माणूसकीहीन वागणूक कशी दिली जाते याचे हे एक उदाहरण आहे. पूरनियंत्रण

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

रेषेखाली एक बंधारा बांधलेला आहे. तो बंधारा असा बांधलेला आहे की त्सुनामी तर सोडाच परंतु साध्या लाटेने देखील तो उद्ध्वस्त होऊ शकेल. वेंगुर्ला किना-यावर बांधलेला बंधारा पूर्णपणसे उद्ध्वस्त झालेला आहे. त्याठिकाणी बंधारा बांधलेला होता की नाही असा प्रश्न निर्माण होतो. त्या ठिकाणी मोठ्या लाटा आल्या तर आजूबाजूची घरे पूर्णपणे उद्ध्वस्त होतील. माननीय मंत्री महोदयांनी त्या परिसराची पाहणी केलेली आहे. एका तुटलेल्या बोटीच्या शेजारी उभे असल्याचा त्यांचा फोटो वर्तमानपत्रतून छापून आलेला आहे. सभापती महोदय, बंधा-याचा पाया जर मजबूत असेल तरच तो त्यावर धडकणा-या लाटापासून तग धरु शकेल. पाया मजबूत नसेल तर तो बंधारा एखाद्या सुमार लाटेने देखील कोसळेल. आपण कोटयवधी रुपये खर्च करुन अनेक कि.मी.चे बंधारे बांधतो. पण ते जर नीट बांधले गेले नाहीत तर ते उद्ध्वस्त होतात. या गोष्टींकडे शासनाचे लक्ष नाही. फयानग्रस्त शेतक-यांना, मच्छिमारांना मदत करण्याच्या बाबतीत शिथिलता आहे. गुहागर शहर उद्ध्वस्त झालेले आहेत. तेथील टेलिफोनच्या तारा, विजेच्या तारा तुटलेल्या आहेत. मी जेव्हा पाहणी करण्यासाठी गेलो त्यावेळी सगळीकडे अंध:कार होता. धोपावकर नावाच्या कुटुंबाची परिस्थिती फार वाईट झाली आहे. त्या कुटुंबामध्ये 6 मुले. त्यातील 5 मुली आणि 1 मुलगा. त्या मुलांची आई 6 महिन्यापूर्वी वारली आणि धोपावकर हे देखील फयान वादळात बेपत्ता झाले. आता शासनाच्या निकषाप्रमाणे धोपावकर यांचा 7 वर्षे शोध घ्यावा लागेल.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री.अरविंद सावंत.....

दरम्यान मला असे कळले की, शासन 7 वर्षाचा निकष बदलत आहे आणि दोन महिन्यात मदत देऊ असे सांगितले गेले. किती मदत देणार? एक लाख रुपये? काय होणार त्या कुटुंबाचे? कसे होणार त्या सहा मुलांचे? आम्ही कल्याणकारी राज्य म्हणतो ते कल्याण कुठे आहे? बोटी तुटल्या. आमच्याकडे पाती म्हणतात. दोन ते अडीच लाख रुपये एका पातीला लागतात. इंजिन बसविण्यासाठी कर्ज घेतले जाते. पर्सोनेट जाळयांच्या माध्यमातून केरळ आणि कर्नाटकातील होड्या मासेमारीसाठी येत असल्यामुळे मासळीचा दुष्काळ जाणवतो. आपले मच्छिमार खोल समुद्रात जाऊ शकत नाहीत. परंतु केरळ,तामीळनाडूमधील ट्रॉलर खोलवर समुद्रात जातात. पर्सोनेट जाळ्यांमध्ये छोटे मासे सुध्दा पकडले जातात. त्यामुळे छोटे मासे आपल्या मच्छिमारांच्या हाती लागतील ते सुध्दा लागत नाहीत. दिवसाचे उत्पन्न तरी किती? 1500 रुपये मिळतात. 5-6 खलाशी एका बोटीवर असतात. विकणार काय? मिळणार काय? डिझेलसाठी किती पैसे गेले? त्याची रिकूपमेंट वेळेवर होत नाही. संसार कसा चालतो? निदान ज्यांच्या छोट्या होड्या आहेत त्यांचे पूर्ण कर्ज माफ करावे आणि पहिल्यांदा या मच्छिमारांना दिलासा द्यावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, ऊस कारखान्यांबद्दल नेहमी बोलले जाते. यांनी महाराष्ट्राला लूट लूट लुटले आहे. ऊस उत्पादक हे शेतकरीच असल्यामुळे बोलता येत नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नाडले जाते म्हणून गप्प रहावे लागते. परंतु कारखाने बंद पडतात त्याठिकाणी तुमचेच गैरव्यवस्थापन आहे. एखादा कारखाना चांगला भाव देऊनही चालतो. परंतु इतर कारखाने डबघाईला येतात त्यांना शासन भरभरुन मदत करते. 50-50 कोटी रुपये दिले जातात. परंतु गरीब मच्छिमारांचे 2.5 लाख रुपयांचे कर्ज माफ करायला शासन तयार नाही. म्हणून माझी नम्र विनंती आहे की, त्या मच्छिमारांचे पूर्ण कर्ज माफ करावे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी व्याज माफ करण्याची मागणी केली. व्याज माफ करण्याऐवजी कर्ज का माफ करु नये? जाळ्यांचे नुकसान झाले त्याबद्दल वॅटची पावती मागितली जाते. 2005 नंतर वॅट लागू झाला. वॅटची पावती सादर केली नाही त्यांना मदत दिली जात नाही. अडवणूक केली जाते. याकडे शासनाने खास करुन लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, केळीची बाग 15 महिन्यात पुन्हा उभी होते. सुपारी कधी उभी होणार? नारळ कधी उभा राहणार? किती वर्षांनी उत्पन्न मिळते? माननीय मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे, तुम्ही 15 हजार रुपये हेक्टरी मदत देणार आहात. परंतु प्रत्यक्षात विभागाचे अधिकारी बागांमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

झाडांची मोजणी करुन पैसे देत आहेत याची आपण चौकशी करावी. हा माझा आरोप आहे. हेक्टरी मदत सुध्दा दिली जात नाही. झाडांची मोजणी का केली जाते? आमची अशी मागणी आहे की, झाडनिहाय मदत द्या. जे माड लावले त्यांना 10 वर्षानंतर उत्पन्न मिळणार आहे. सुपारीच्या झाडांना 5 ते 7 वर्षानंतर उत्पन्न मिळणार आहे. किती उत्पन्न मिळणार आणि कधी मिळणार? तो शेतकरी कसा उभा राहणार? कोकणाला नेहमीच सापत्नभावाची वागणूक दिली जाते. मंत्री आमच्या भागातील असोत किंवा नसोत, काही फरक पडत नाही. कसे ओरबाडायचे हे पश्चिम महाराष्ट्राकडून शिकले पाहिजे. विदर्भातील लोकांना सुध्दा विचारा. पुरेपूर ओरबाडून घेऊन जाणार. या संदर्भात माझी अशी मागणी आहे की, झाडनिहाय शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे. आता ज्या पध्दतीने मदत दिली जात आहे तशी न देता झाडनिहाय मदत दिली जावे.

सभापती महोदय, दापोली कृषि विद्यापीठाचे जवळजवळ 5 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. या कृषि विद्यापीठाला भेट देण्याचा अनेकदा योग आला. तेथे मेहता नावाचे अधिकारी कार्यरत आहेत. खूप काही करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. दुर्दैवाने तेथेही तीच अवस्था आहे. मदत दिली जात नाही. आमचे विद्वान अधिकारी आहेत. त्यांचे बोलण्याचे काय धारिष्ट्य आहे याचा विचार करा. कापलेला भात खळ्यात का ठेवला? यांना शेती कशी करतात हेही माहिती नाही. भात कापला तो खळ्यात मळणीसाठी ठेवला होता. पाऊस पडला आणि तो भात भिजून पुन्हा नव्याने उगवला.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

वास्तविक भात मळणी केल्यानंतरच घरी घेऊन जाणार, परंतु त्याचीही नुकसान भरपाई द्यायला शासन तयार नाही. एक तर भाताला 950 रुपये प्रति क्विंटलप्रमाणे भाव दिला जातो परंतु नुकसान झाल्यानंतर मात्र फक्त दहा-वीस रुपये इतकीच नुकसान भरपाई शासन देते. अशा प्रकारे शेकऱ्याची क्रूर चेष्टा हे सरकार करीत आहे. राज्यात शाळांचे सुध्दा मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अनेक शाळांच्या इमारती आज अशा आहेत की, त्यांची वेळीच डागडुजी केली नाही तर दुर्दैवाने सरकारवर एक नवीन आपत्ती येऊ शकते. अशा प्रकारे डागडुजी केली नाही आणि एखाद्या शाळेचे छत कोसळले तर कोणता प्रसंग निर्माण होईल याचा विचार होणे आवश्यक आहे. मी राजापुरातील नाटेगावची शाळा पाहून आलो. त्या शाळेचे पिलर वाकले असून जर छत कोसळले तर विद्यार्थी त्या अपघातात जखमी होण्याची शक्यता आहे म्हणून यासंबंधीची कार्यवाही तातडीने करावी.

महोदय, झालेल्या नुकसानीच्या संदर्भात जे निकष आहेत ते बदलण्याबाबत माझ्या 12 वर्षाच्या कारकिर्दीत मी अनेक वेळा हा विषय उपस्थित करुन मागणी केली की, शासनाने प्रचलित निकष कोकणात तरी बदलावे. या अनुषंगाने राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना मी सविस्तरपणे मांडणारच आहे. परंतु निवडणुकीपूर्वी दे दणादण अशा प्रकारे पॅकेजेस देण्याची घोषणा सरकारने केली. त्यानुसार कोकणात सुध्दा 5232 कोटीचे पॅकेज जाहीर केले. प्रत्यक्षात किती रक्कम मिळाली हा प्रश्नच वेगळा आहे. हा आकडा शासनाने सांगावा म्हणजे वर बसलेले जे आहेत त्यांनाही कळेल की, शासनाने एवढे मोठे पॅकेज दिले आणि त्याला कशा प्रकारे गळती लागली. आज राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त झालेला आहे. आमच्या भागात भेट देण्यासाठी मी गेलो असता रानडे नावाच्या गृहस्थाच्या आंब्याच्या बागेला भेट दिली. त्यावेळेस असे दिसून आले की, आंब्याची पाने पिळवटून गेली, संपूर्ण मोहोर गळाला होता. त्या शेतकऱ्याच्या बाजूला कोणाची बाग आहे अशी चौकशी केली असता ती बाग माननीय सदस्य श्री. कृपाशंकर सिंह यांची असल्याचे मला समजले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात त्यांची बाग पाहून मला आश्चर्य वाटले. या वादळात हा शेतकरी सुध्दा उद्ध्वस्त झालेला आहे. या निमित्ताने माझी शासनाला अशी विनंती आहे की, कोकणातील मच्छिमारांना बोटीसाठी दिलेले कर्ज माफ करावे, राज्यात शेतकऱ्यांचे जे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

नुकसान झालेले आहे त्यांचे पीक कर्ज माफ करावे, कृषी खात्याला अर्थसंकल्पीय तरतूद असली पाहिजे आणि ही मागणी मान्य झालीच पाहिजे. शिक्षण, आरोग्य, शेती पिकाची वाट लावण्याचे काम हे आदर्श सरकार करीत आहे. हे सरकार शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेऊन राज्य करीत आहे पण सगळीकडे आनंदी आनंद आहे. खास करुन कृषी खात्याला तर कॉन्टिंजन्सी फंड निर्माण केला पाहिजे आणि तो मल्टिपल होत जाईल अशी व्यवस्था करावी, अशी सूचना माननीय श्री. अरुणभाई गुजराथी यांनी सुध्दा केली, तीच मागणी मी करतो. या निधीतून अशा आपत्तीच्या प्रसंगी शेतकऱ्यांना मदत करता येईल, म्हणून शासनाने असा निधी उभा करावा अशी विनंती करतो आणि मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देतो. तसेच सरकार यानंतर जी मदत करेल ती शेतकऱ्याच्या अंगणापर्यंत पोहचेल अशी अपेक्षा व्यक्त करुन आपली रजा घेतो.

.....3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, फयानच्या संदर्भात सभागृहात जो प्रस्ताव सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, आताच सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी बोलत असताना आघाडी सरकारवर आरोप केला की, या सरकारने शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेत घेत आरोग्य, शिक्षण आणि कृषी क्षेत्राची वाट लावण्याचे काम केले आहे. पण या आरोपाचे मी येथे खंडन करते. खऱ्या अर्थाने या देशातील पहिले शिक्षक या देशातील पहिला कृषीभूषण पुरस्कार ज्यांना मिळाला अशा महात्मा ज्योतिबा फुले यांचा शेतकऱ्यांकडे पाहण्याचा, शेतकऱ्याला उभे करण्याचा दृष्टीकोन जो होता जे धोरण होते ते धोरण अंमलात आणण्याचा यशस्वी प्रयत्न, त्या परिवर्तनाचा यशस्वी प्रयत्न हे आघाडी सरकार करीत आहे. संकटे येतात परंतु त्यांचा मुकाबला करण्याची जिद्द आणि हिंमत ही आंबेडकरांनी दिलेली आहे म्हणूनच महाराष्ट्र या ठिकाणी उभा आहे, जिवंत आहे हे सांगण्यास मला अभिमान वाटतो.

यानंतर श्री जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

मला कोणावरही टीका करावयाची नाही कारण हा विषय फार संवेदनशील आहे. परंतु तरी सुध्दा विरोधी पक्षाचे जे रुप आहे त्यासंदर्भात मी फक्त दोनच वाक्यात सांगू इच्छिते की, नेहमी लोकांच्या भावनेला हात घालणे, जातीच्या नावाने, वंशाच्या नावाने भांडणे लावणे, देवाच्या नावाने भांडणे लावण्याचे काम विरोधी पक्ष करीत आलेला आहे. विरोधी पक्षाच्या आंदोलनामध्ये ऊसाच्या, कापसाच्या किंवा बाजरीच्या संदर्भात कधीही विषय निघत नाही,चर्चा होत नाही. (अडथळा) ज्यावेळेस आघाडी सरकारवर टीका होते त्यावेळेला टीकेचे खंडण करणे हे माझे काम आहे. विरोधी पक्षाची जी भूमिका आहे संदर्भात मी सांगू इच्छिते की, "काय भुललासी वरलिया सोंगा, ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा" असे म्हणता येईल. या जातीयवादी वादळाला महाराष्ट्र खंबीरपणे तोंड देत आलेला आहे. विरोधी पक्षाला फक्त आरोप करण्याचीच माहिती आहे. फयानच्या संदर्भात बोलतांना आकडेवारी सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. कारण फयानच्या संदर्भात माझ्या अगोदरच्या सन्माननीय सदस्यांनी सविस्तर माहिती सभागृहाला दिलेली आहे. फयान वादळामुळे किती माणसे गायब झाली, किती कुटुंबे उद्ध्वस्त झाली, किती केळीच्या बागा उद्ध्वस्त झाल्या, किती सुपारीच्या बागा उद्ध्वस्त झाल्या याची माहिती सभागृहासमोर आलेली आहे. नुकसानग्रस्त जनतेला नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात सत्ताधारी पक्षाने तसेच विरोधी पक्षाने एकत्र येऊन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. या महिन्यात मी माननीय कृषी मंत्र्यांचे एक स्टेटमेंट वाचले होते त्यामध्ये त्यांनी म्हटले होते की, "महाराष्ट्र शासन कृषी विषयक धोरण लवकरच जाहीर करणार आहे, आणि कृषी क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देणार आहे" अशा प्रकारचे ते स्टेटमेंट होते. कृषी मंत्र्यांचे स्टेटमेंट ज्याअर्थी मी वाचले त्या अर्थी ते स्टेटमेंट सभागृहाच्या वाचण्यात सुध्दा आले असेलच. फयान वादळामुळे ज्या घरातील माणसे मृत झाली ती माणसे आपण परत आणू शकणार नाही परंतु त्या कुटुंबाला आपण आधार देण्याचा प्रयत्न करु शकतो, त्या घराचे पुनर्वसन करण्याचे प्रयत्न करु शकतो. परंतु पुन्हा पुन्हा अशा प्रकारची नैसर्गिक आपत्ती आली तर त्या आपत्तीमध्ये कुटुंब मोडून पडणार नाही यासाठी कृषी क्षेत्राला उद्यागाचा दर्जा देण्याचा कायमस्वरुपी निर्णय घेतला तरच ते शक्य होईल. कृषी विषयक धोरणाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने लवकर निर्णय घेतला तर पुन्हा पुन्हा या संकटात जो शेतकरी सापडतो आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

त्याला वाचविण्याच्या दृष्टीने आपल्याला प्रयत्न करता येईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितले की, मी एका कुटुंबाला भेट देण्यासाठी गेलो होतो त्या कुटुंबात सहा मुले होती, आई वारली होती आणि फयान वादळामुळे वडीलही गेले होते. प्रत्येक कुटुंबाचे आपल्याला अशा प्रकारे विश्लेषण करता येईल. कुटुंब अशा प्रकारे का मोडून पडतात त्याचेही एक कारण आहे. आपल्या कुटुंबाची सध्याची जी समाजिक स्थिती आहे त्यामध्ये 99.99 टक्के कुटुंबामध्ये सर्व घर आई-बहिणी-बायकोसह एका पुरुषावर घर अवलंबून असते. कुटुंबातील कर्ता माणूस गेला की, घर उघडयावर पडते, कुटुंब भिकेला लागते. त्या कुटुंबाची शैक्षणिक अवस्था, आरोग्य विषयक अवस्था, शेती विषयक अवस्था, समाजिक अवस्था मोडून पडलेली असते. या कुटुंबाला पुन्हा शुन्यातून उभे रहावयाचे असते. अशा वेळेस आपण त्या कुटुंबाला किती मदत करणार ? हा समाज परिवर्तनाचा मूळ गाभा आहे. 1994 मध्ये शासनाने महिला सक्षमीकरणाचे धोरण अवलंबवे होते. कुटुंब उभे राहत असतांना ते एकट्या पुरुषाचे नव्हे तर बाईच्याही पायावर उभे राहिले पाहिजे म्हणूनच आपण महिला विषयक धोरण अवलंबविले होते. 1994 नंतर सन 2001 मध्ये पुन्हा महिला सक्षमीकरणाचे धोरण अवलंबविले होते. या बेसीक धोरणात अशी कन्स्टेप्ट आहे की, महिलांचे धोरण दर तीन वर्षानी जाहीर केले पाहिजे. महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात जर आपण गतीने पाऊले टाकली तर कुटुंबातील पुरुषावर विसंबून राहण्याची जी प्रक्रिया आहे त्यातून आपण बाहेर येऊ शकू. फयान वादळामुळे जी कुटुंबे उध्वस्त झालेली आहेत त्यांना कदाचित यांतून दिलासा मिळणार नाही. परंतु दुर्दैवाने पुन्हा अशी घटना घडली तर त्या घटनेत कुटुंबे उघडयावर पडणार नाहीत यादृष्टीने निश्चित फायदा होऊ शकेल. म्हणून शासनाने महिला सक्षमी करणाच्या दृष्टीने नवीन धोरण जाहीर करणे व त्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. आता ऋतूचक्र पूर्णपणे बदलून गेलेले आहे. अगोदर शेतकरी बायकोसह 7 जूनला पेरणी करीत असे. पुढे शेतकरी बियाणे पेरतो आहे आणि त्याच्या मागे तिफणीवरुन त्याची बायको खत पेरीत असे चित्र आपल्याला दिसत असे परंतु आता जून महिन्यात पाऊसच पडत नाही. साधारणत: पाऊस आता जुलै किंवा ऑगस्ट महिन्याच्या शेवटीच पडतो.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ...

मुग,उडीद, हुलगे इत्यादी कडधान्याचा योग्य वेळी पेरा झाला तर योग्य वेळी त्याचे पीक येते तसेच तूरीचासुध्दा योग्य वेळी पेरा झाला तर योग्य वेळेला तुरीचे पीक येते. परंतु आज प्रत्यक्षात तसे होत नाही त्यामुळे कडधान्याची आणि तूर डाळीची टंचाई भासत आहे. आज ऋतूचक्र बदलल्यामुळे योग्य वेळी कडधान्ये आणि तूर डाळ तयार होत नाही. बाजरीच्या बाबतीत सुध्दा तसेच घडत असून आज बाजरीचा पेरासुध्दा उशिरा व्हावयास लागाला आहे. हायब्रीड ज्वारीचासुध्दा पेरा उशिरा व्हावयास लागला आहे. ज्याला पांढरे सोने म्हटले जाते अशा कापसाच्या बाबातीत बीड जिल्हा दुस-या नंबरवर आहे. कापसाचा पेरासुध्दा आज उशिरा व्हावयास लागला आहे.निसर्गावर शेती अवलंबून असल्यामुळे ऊसाची लागवडसुध्दा या वर्षी कमी झाली असल्यामुळे परिणामी साखर कारखाने बंद पडावयास लागले आहेत. या सगळया गोष्टीचा आता आपल्याला विचार करावा लागेल.

सभापती महोदय, पाऊस कमी पडला किंवा पडला नसला तरी भात शेतीचे नुकसान होणार नाही अशा प्रकाराचे जनुक परदेशात शोधून काढण्यात येत आहे अशा प्रकारची बातमी मी मागच्या महिन्यात वर्तमानपत्रातून वाचली होती . कमी पावसावर भाताचे पीक काढण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. केवळ पाण्यातच भाताचे पीक घेतले पाहिजे असे नाही. तर कमी पावसामध्येसुध्दा भाताचे पीक घेता येऊ शकेल अशा प्रकारे नवीन जनुकाचा शोध आंतरराष्ट्रीय पातळीवर लावला जात असेल तर आपल्या देशात सुध्दा अशा प्रकारचे जनुक शोधून काढले पाहिजे. आपल्या देशातील शेतकरीसुध्दा कमीत कमी निसर्गावर कसा अवलंबून राहील या साठी नवीन जनुकांचा शोध लावला पाहिजे आणि निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे. नवीन जनुक शोधून काढले पाहिजे त्याच बरोबर गव्हाचे आणि बाजरीचे नवीन बियाणे शोधून काढले पाहिजे. नवीन बियाण्यांच्या बाबतीत आपण यापूर्वीसुध्दा काही प्रगती केलेली आहे. माझ्या लहानपणी एका एकरमधून एक पोते बाजरी निघाली तरी आम्ही खुष असावयाचो परंतु आता त्याही पेक्षा अधिक बाजरीचे उत्पादन कसे होईल त्यासाठी निसर्गावर मात करण्याची गरज निर्माण झाली आहे व त्यासाठी अधिकाधिक प्रयत्न व्हावयास पाहिजेत असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ...

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. दुग्ध व्यवसाय,मत्स्य व्यवसाय, प्रक्रिया उद्योग आणि सिंचन तसेच पीक विम्याच्या बाबतीत अधिक लक्ष देणे ही काळाची गरज आहे. या सर्व बाबतीत गांभीर्याने लक्ष दिले गेले पाहिजे. शेतक-यांचे पर्यायी व्यवसाय जर जीवंत राहिले तर त्याचा एक व्यवसाय मोडून पडला तर त्याला दुसरा व्यवसाय उपलब्ध असल्यामुळे त्याचे घर उद्ध्वस्त होणार नाही. तेव्हा या संदर्भात विशेष असे धोरण् आखण्याची आवश्यकता आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, अवेळी पडलेल्या पावसामुळे केळी, द्राक्ष आणि डाळिंबाचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्याच बरोबर ज्याला आपण पांढरे सोने म्हणतो अशा कापसाचे सुध्दा मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे.शेतात पडलेल्या पावसाच्या पाण्याला शेता बाहेर काढता आले नाही . दुस-या बाजूला कापसाची जी दहा बारा बोंडे शिल्लक होती ती पिवळी पडल्यामुळे गळून गेली. जी बोंडे नंतर आली त्यावर लाल्या रोग पडला व त्याही बोंडाचे नुकसान झाले. त्यामुळे शेताच्या बाहेर कापूस काढणे शेतक-याला अवघड झाले आहे. ऊसाची तसेच केळीच्या पिकाचीसुध्दा तीच स्थिती आहे. डाळींबावर सुध्दा रोग पडला आहे. मराठवाडयामध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडल्यामुळे अनेक शेतक-यांचे नुकसान झालेले आहे. सकाळी उठल्यानंतर ढग आलेले दिसावयाचे , दुपारीसुध्दा अंधारुन आल्यामुळे संध्याकाळचे वातावरण निर्माण व्हावयाचे. लहरीपणामुळे हा पाऊस कधीही यावयाचा व सतत पडणा-या पावसामुळे शेतकरी 15 दिवस शेतामध्ये जाऊ शकला नाही. शेतातील जे काही बाजरीचे पीक शेतक-यांनी गोळा करुन ठेवले होते आले होते ते सुध्दा पाखरांनी खाल्ले होते. शेतातील चिखलातून जी काही कणसे शेतक-यांनी गोळा केली होती त्याला सुध्दा कोंब फुटले होते.अवेळी पडलेल्या पावसामुळे भात, बाजरी,तूर इत्यादीचे नुकसान झालेले असूनल अशा परिस्थितीमध्ये फक्त एकच पीक मोठया प्रमाणावर आलेले आहे. कोणत्याही गावातील पाणंदीमधून जात असतांना गाजर गवत, चिमण चारा, पिवळा आणि लाल तरवट मोठया प्रमाणावर आल्याचे आपल्याला दिसून येईल.कोणत्याही शेतात गेलो तर तेथे मका, हायब्रीड ज्वारी,बाजरीच्या उंची एवढें गवत वाढलेले दिसून येईल. ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहेत त्यांना नुकसान भरपाई देण्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ...

बाबतीत पंचनामा करण्यात आला आहे. ज्या शेतक-यांचे झाड उन्मळून पडले आहे वा ज्याच्या बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत त्याचा सर्व्हे करण्यात आला आहे एक एक र क्षेत्रासाठी पाच हजार रुपयांची मदत देण्यात येणार आहे. गवतामध्ये जाऊन ही जमीन व्यवस्थित लागवडी योग्य करण्यासाठी ही रक्कम अत्यंत तुटपुंजी आहे ती पुरणार नाही याबाबत शासन सर्व्हे करणर आहे काय ? याचा सुध्दा शासनाने विचार केला पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. भाजीपाला पिकविणारा शेतकरीसुध्दा उद्ध्वस्त झालेला आहे. फळ आणि भाजीपाल्याचे नुकसान झालेले असल्यामुळे त्याचे भाव गगनाला भिडले आहेत.अ डाळीचे आणि भाताचे नुकसान झालेले असल्यामुळे त्याची टंचाई निर्माण होणार आहे . महाराष्ट्रात तांदळाचा आणि डाळीचा साठा किती आहे आणि आपली गरज किती आहे याचा विचार करुन येणा-या कालावधीमध्ये राज्याला त्याची झळ पोहोचणार नाही याची सुध्दा दखल घेण्यात आली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.फयानग्रस्तांना जी काही मदत करण्यात आलेली आहे ती सुध्दा अत्यंत कमी आहे. आपण फक्त त्या शेतक-यांचे डोळे पुसत आहोत त्याला पूर्णपणे उभे केले जात नाही. जे काही दिले आहे तेसुध्दा कमी नाही. ही मदत अधिक वाढवून .....

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

ॲड. श्रीमती दराडे ...

द्यायला पाहिजे हेही मान्य आहे. पण याहीपेक्षा जास्त पॅकेज वाढवून देता आले तर दिले पाहिजे आणि थोडीशी कृपादृष्टी आपण कोकणावर तर ठेवाच. नशीब समजा की, मुंबईपासून हे फयान वादळ पळाले, अन्यथा मुंबईमध्ये केवढा हाहाक्कार माजला असता याची आपण कल्पना देखील करू शकत नाही. आपण त्यापासून वाचलो आहोत. पण तरीसुद्धा थोडेसे लक्ष आमच्या मराठवाड्याकडे देखील द्या. बाकीच्या जिल्ह्यांमध्ये अधिक नुकसान झाले असल्याने माझ्या बीड जिल्ह्यावर, मागासलेल्या बीड जिल्ह्यावर आणि मराठवाड्यावर चुकूनही दुर्लक्ष होऊ नये याची काळजी महाराष्ट्र शासनाने घ्यावी. जे केले आहे ते खूप केले आहे, पण करणे, अजूनही करणे गरजेचे आहे. थोडे आहे, थोडेकी और जरूरत आहे असे म्हटल्याप्रमाणे आपण या संकटाचा मुकाबला हा निश्चितपणे करू आणि माझा शेतकरी मोठ्या मोठ्या संकटांना तोंड देतो, महाराष्ट्रातील नागरिक मोठमोठ्या संकटांना तोंड देतो आणि पुन्हा हा महाराष्ट्र उभा करतो, पुन्हा निर्णय प्रक्रियेत येतो, पुन्हा उद्योगात येतो, विकासाच्या गतीत येतो आणि जगामध्ये नंबर एक चे राज्य करण्याचा प्रयत्न करतो. हा आशावाद आहे आणि याची खात्री मला आहे आणि शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारामुळेच हे घडते आहे त्याचाही स्वाभिमान मला आहे एवढेच या ठिकाणी मी सांगते आणि या प्रस्तावाला समर्थन देऊन माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद. जयहिंद, जय भीम, जय महाराष्ट्र.

- -

..... टीटी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. श्रीमती ऊषाताई दराडे यांचे भाषण ऐकून मला सामाजिक चळवळीच्या अभिसरणावरच येथे परिसंवाद सुरू आहे असे वाटले. सभापती महोदय, या ठिकाणी फयाण या वादळाने निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत चर्चा सुरू आहे. मुळामध्ये हा जो प्रस्ताव येथे आला तो सर्वंकष असा विरोधी आणि सत्तारूढ पक्षातर्फे आपण येथे आणू अशा प्रकारचा मनोदय सभापती महोदयांनी येथे व्यक्त केला होता आणि त्याप्रमाणे त्यांनी आदेश दिला व त्यानुसार ही चर्चा सुरू झाली. क्षणभर खरे तर सन्माननीय सदस्या ॲड. दराडेताई नेहमीच येथे मुद्देसूद, प्रामाणिकपणे आणि अगदी हृदयापासून बोलत असतात परंतु आम्ही कोठल्या परिस्थितीचा गैरफायदा घेतला आहे असे मी त्यांना विचारतो. आम्ही भावनाशून्य, विवेकशून्य नाही आहोत. साधारणतः माझा पहिला मुद्दा असा आहे की, माननीय मंत्री महोदय स्वत: आजारी असताना देखील तेथे गेले होते. ते स्वत: सुदैवाने कोकणातीलच आहेत. माझी त्यांना आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे की, पहिल्या प्रथम आपण ब्रिटीश काळासारखे सदृश्य असणारे आपले कायदे बदला, निकष बदला, जी.आर.बदला. या ठिकाणी अशा प्रकारे भाषणे चालली आहेत की, जणू काही आम्ही कोणी तरी नेटीव्ह येथे बसलो आहोत, एतद्देशीय आहोत आणि समोरच्या बाजूला इंग्लंडच्या राणीचे प्रतिनिधी बसले आहेत आणि आम्ही त्यांच्याकडे काही तरी मागतो आहोत की, आम्हाला काही तरी द्या हो, काही तरी द्या हो. असे होता कामा नये. कारण या ठिकाणी तुम्ही शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेता, खरे तर या ठिकाणी या थोरांची नावे घेण्याची गरजच नाही. ती इतकी मोठी माणसे आहोत की आपण त्यांची नावे केवळ निवडणुका जिंकण्यासाठी आणि व्यक्तिगत सत्तेचा मुकुट आपल्या डोक्यावर चढविण्यासाठीच घेतो आहोत वा त्यांचा उपयोग करीत आहोत. दैनंदिन राजकारणासाठी आपण या महापुरुषांची नावे आपण घेऊ नये, त्यांना एका विशिष्ट चौकटीत बसवू नये असे मला वाटते. सभापती महोदय, मुळात हे सगळे आपले कायदे ब्रिटीश काळासदृष्य आहेत. ब्रिटीशांनी काही कायदे असे केले होते की, काही संकट आले, महामारी आली, नैसर्गिक संकट आले तर त्या काळात भारतातील शेतकऱ्यांना, मजुरांना, नागरिकांना कमीत कमी देता यावे. जास्तीत जास्त त्यांचे केवळ शोषणच करायचे. त्यांना देताना मात्र कमीत कमी द्यायचे त्यासाठीच त्यांनी असे सगळे निकष लावले होते. मानवी मनाला संवेदना जागी ठेवून त्या ठिकाणी निकष लावण्यात आलेले नव्हते. परंतु आपले कल्याणकारी राज्य आहे आणि कल्याणकारी राज्य करीत असताना

..... टीटी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

आपण आपल्या डोळ्यासमोर जीवंत माणसाला ठेवून नियम, कायदे, निकष केले पाहिजेत, सर्वसामान्य माणसाला डोळ्यासमोर ठेवूनच आपण कल्याणकारी राज्यामध्ये सगळी धोरणे आखत असतो. या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी साहेबांनी जे सजेशन केले होते ते मला पटले. त्यांनी सांगितले होते की, यासाठी बजेटमध्ये एक वेगळे हेड करावे. काही संकटे ही अस्मानी असतात, काही सुलतानी असतात. आता हे संकट नैसर्गिक आहे. निसर्गाने हळूहळू आपली कूस आता बदलायला सुरूवात केलेली आहे. आता आपणही सांगितले की, पूर्वी 7 जूनला पाऊस पडायचा आता ऑगस्टपर्यंत पाऊस पडत नाही. पण ही सारी परिस्थिती मानवाने निर्माण केलेली आहे. या वादळाने जी काही परिस्थिती निर्माण केली आहे त्या संबंधात फार मोठी तार्किक चर्चा करण्यासाठी, तांत्रिक चर्चा करण्यासाठी हा प्रस्ताव येथे आणलेला नाही. कालच आपण वाचले की, अमेरिकेमध्ये जास्त वादळे का निर्माण झाली. तर सगळ्यात जास्त कार्बनडायॉक्साईड आता माणूस हा आपल्या स्वार्थासाठी हवेत सोडू लागला आहे आणि त्यामुळे सगळ्या सृष्टीचा समतोलच बिघडू लागला आहे. अमेरिकेची लोकसंख्या ही जगाच्या पाच टक्के आहे आणि अमेरिका ही 20 टक्के कार्बन हवेत सोडते की ज्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडून जातो आहे आणि अशा बिघडलेल्या समतोलातून ही अशी नैसर्गिक संकटे निर्माण होऊन येतात. ...

(यानंतर श्री. सरफरे ... यूयू 1 ...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

हे शासन निर्मित संकट नाही. या बाबत आम्ही आपल्याला दोष देत नाही. परंतु एकदा संकट आल्यानंतर शासन कसे वागते? त्याठिकाणी शासनाने संवेदनशील वागले पाहिजे. माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे एक बोट अडीच ते तीन लाखाची असते. ती वादळामध्ये फुटल्यानंतर तो माणूस उद्ध्वस्त होऊन जातो. तो माणूस काय करणार? त्या बोटीचा पंचनामा इतका काटेकोरपणे केला जातो. त्याबाबत काही अपवाद सोडला तर ते अधिकारी हृदयावर दगड ठेवून पंचनामा करतात. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, नुकसान भरपाईचे निकष आपण बदलले पाहिजेत. प्रत्येक झाडामागे नुकसान भरपाई देण्याबाबत जी.आर. काढला पाहिजे. माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे साहेब हे कोकणातील मंत्री आहेत. नारळ, सुपारीचे झाड लावण्यासाठी किती खर्च येतो? सुपारीचे उत्पन्न 8 वर्षानंतर येते, नारळाचे उत्पन्न 10 वर्षानंतर येते, हापूस आंब्याचे उत्पन्न 12 वर्षानंतर येते. अशाप्रकारे त्यांचे सुपारीचे किंवा नारळाचे नुकसान झाल्यानंतर त्यांना नुकसान भरपाई देतांना झाडांची मोफत रोपे पुरविली पाहिजेत. प्रत्येक झाडामागे आपण त्यांना नुकसान भरपाई दिली पाहिजे. त्यामधून तो नवीन झाड लावेल आणि त्या नुकसान भरपाईमधून आपला उदरनिर्वाह करील. मी विधानसभेच्या माननीय विरोधी पक्षनेत्यांबरोबर दापोली येथे गेलो होतो. त्याठिकाणी 1 हजार झाडांपैकी 800 झाडांचे नुकसान झाल्यामुळे त्या कुटुंबामधील माणसे घरामध्ये कुणी तरी मेले आहे अशाप्रकारची भयाण आर्थिक स्थिती निर्माण झाली असल्यामुळे शून्यामध्ये पहात बसले होते. अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर नुकसान भरपाई कशी द्यावयाची? नुकसान भरपाईचे निकष कसे बदलावयाचे हे आपण ठरवा. परंतु आपण याठिकाणी काही निधी उभा केला पाहिजे. याबाबत माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे अर्थसंकल्पामध्ये कायम स्वरुपी एक हेड निर्माण केले पाहिजे. आणि जर नैसर्गिक संकट आले तर त्यामधून आपल्याला पैसे देता येतील. त्यामध्ये आपल्याला अर्थसंकल्पामधून तात्कालिक आर्थिक भर घालून कायमस्वरुपी उपाय योजना करता येईल. ज्याप्रमाणे आपण नवीन गाडी विकत घेतांना तिचा विमा काढतो. तिचे नुकसान झाल्यानंतर आपल्याला भरपाई मिळते. अशाप्रकारे फळबागा असतील किंवा शेतीचे उत्पादन करणारी साधने असतील. उदा.एखाद्या शेतकऱ्याकडे 600 नारळाची झाडे असतील, तर त्या शेतकऱ्याने प्रत्येक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/

श्री. मधुकर चव्हाण...

झाडामागे सरकारकडे 2 रुपये जमा करावेत. आणि त्या झाडांचा विमा काढावा. हापूस आंब्याचे झाड असेल तर वर्षाला प्रत्येक झाडामागे 5 रुपये जमा करावेत. अशाप्रकारे आपल्याला विम्याची योजना तयार करता येईल काय? नैसर्गिक आपत्तीमुळे त्याचे नुकसान झाले तर तो नुकसान भरपाईसाठी शासनाकडे भीक मागणार नाही. मी माझ्या पोफळीच्या, नारळाच्या, हापूस आंब्याच्या झाडांचा, बोटींचा विमा उतरविला असल्यामुळे त्याचे झालेल्या नुकसानीचे पैसे आपण मला द्या अशी तो मागणी करील. तशाप्रकारची योजना आपणास आखता येईल काय? हे आपण पाहिले पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की, याठिकाणी भातशेतीच्या विषयावर खूप चर्चा झाली असल्यामुळे मी त्याबाबत पुनरुक्ती करणार नाही. गेल्या वर्षी फलोत्पादन मंत्री माननीय श्री. विनय कोरे असतांना कोकणामध्ये हापूस आंब्याचे नुकसान झाल्याबद्दल शासनाने एकरी 15 हजार रुपये नुकसान भरपाई जाहीर केली. ते पैसे अजून शेतकऱ्यांना मिळाले नाहीत. जर तुम्हाला द्यावयाचे नसतील तर निदान जाहीर तरी करु नका. याठिकाणी एखादा निर्णय कठोरपणे जाहीर करीत असतांना विरोधी पक्षाचे सदस्य कितीही वेळा "वेल" मध्ये आले किंवा कितीही वेळा सभात्याग केला तरी आमच्या शासनाच्या धोरणापेक्षा एक पैसा देखील देणार नाही. त्यामुळे आपण जे देणार असाल त्याबाबत बोला, तेच रेकॉर्डवर आले पाहिजे. निवडणुकीमध्ये मते मिळविण्यासाठी आपण वारेमाप आश्वासने देतो त्याप्रमाणे सभागृहातील चर्चेला स्वरुप येता कामा नये असे मला वाटते.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, मच्छिमारांच्या संदर्भात याठिकाणी एक योग्य मुद्दा मांडण्यात आला. माननीय मुख्यमंत्र्यांना आमचे शिष्टमंडळ भेटावयास गेले त्यावेळी त्यांना सांगण्यात आले की, 7 वर्षे जर तो माणूस मिळाला नाही तर त्याला मृत जाहीर करता येईल. त्याच्या कुटुंबाला नुकसान भरपाई मिळेल. माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, आम्ही दोन महिन्यात त्याबाबत निर्णय घेतो. त्यामुळे तशाप्रकारचा कायदा करुन त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे की नाही याची मला माहिती नाही. हा सुध्दा भावनेचा प्रश्न आहे. मला आठवते की दळवी नावाचे नाटय सृष्टीमधील कलाकार होते. "रायगडाला जेव्हा जाग येते" या नाटकामध्ये ते संभाजीची भूमिका करीत होते. त्यांचा मुलगा नेव्हीमध्ये गेला, तो समुद्रामध्ये पडला. त्याच्या पत्नीचे वय आज 60 वर्षे झाले असतांना सुध्दा तिने गळयातील मंगळसूत्र काढले नाही.ती म्हणते माझा नवरा मेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/

श्री. मधुकर चव्हाण...

आहे, परंतु मी त्याचे प्रेत कुठे पाहिले आहे? लोक भावनेवर जगू शकतात, परंतु पोट भावनेवर जगू शकत नाही. पोट व्यवहारावर जगते, पोट हे व्यवहारवादी आहे. पोट इमोशनल नाही तर प्रॅक्टिकल आहे. समुद्रामध्ये बुडालेल्या माणसाचे दोन-तीन महिन्यानंतर सुध्दा प्रेत मिळाले नाही. समुद्रातील माश्यांनी किंवा जलचर प्राण्यांनी ते प्रेत खाऊन टाकले असेल तर तो जीवंत राहण्याची शक्यता कमी आहे. आणि म्हणून अशाप्रकारचे ब्रिटीश काळापासून चालत आलेले कायदे आपण बदलले पाहिजेत. एखादा माणूस बेपत्ता झाल्यानंतर तो 7 वर्षानंतर मृत जाहीर करुन त्यानंतर त्याच्या विधवा पत्नीला किंवा आईला किंवा मुलांना त्याचे आर्थिक फायदे देता येतील.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .. . .

त्यामुळे यासंबंधातील कायदे बदलणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते. दुसरी गोष्ट अशी की, जातीय दंगल झाली तर केंद्र शासनाकडून 2 लाख रुपये, राज्य शासनाकडून 2 लाख रुपये, संस्थांकडून 2 लाख रुपये मदत दिली जाते आणि अशा वेळी आम्हा सर्व राजकीय पक्षांचा, माझ्या पक्षासकट सगळयांचा राजकीय अभिनवेष जागा होतो. मग आम्ही त्याठिकाणी केवळ राजकारण डोळयासमोर ठेऊन मदत करण्यासाठी अहमिका लावतो.पण आज याठिकाणी ही माणसे छोटया-छोटया गोष्टींसाठी सरकारकडे मागणी करीत आहेत आणि अशा वेळी शासन त्यांना एक लाख रुपये देणार आहे काय ? पूर्वी बेहराम पाडा येथे 1993 मध्ये दंगल झाली होती. याबाबतीत सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब सांगू शकतील. पोलिसांकडील बंदूक त्यांच्या हातातून हिसकावून घेऊन पोलिसांवरच गोळीबार करीत होता. त्याला रिॲक्शन म्हणून पोलिसांनी गोळीबार करुन त्याला मारले. मी त्याच्या जाती-धर्माचा उल्लेख केलेला नाही. पण पोलिसांच्या हातातून बंदूक घेऊन पोलिसांना मारण्याचा प्रयत्न करीत असताना दुसऱ्या पोलिसाने त्याला गोळी घातली, तर त्याच्या कुटुंबियांना 5 लाख रुपयांची मदत दिली. खरे म्हणजे एक दमडा देखील द्यावयास नको होता. समाजामध्ये विद्रोह निर्माण करणाऱ्या माणसांना नुकसान भरपाई आणि दुसरीकडे मातीतून सोने पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना मात्र 50 रुपये, 5 रुपये, 4 रुपये, 3 रुपये, 2 रुपये याप्रमाणे मदत दिली जाते. मात्र माझे असे मत आहे की, हे निकष बदलणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, कोकणपट्टीतील अनेक शेतकऱ्यांनी सांगितले की, आम्हाला वादळाच्या संदर्भात वेळेवर इशारा मिळाला नाही वगैरे. मी त्याची पुनरावृत्ती करीत नाही. कारण अनेक सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये हा मुद्दा आलेला आहे. या लोकांचे म्हणणे असे आहे की, चेन्नई मध्ये एक यंत्र काढण्यात आलेले असून काहीजण त्याची किंमत 12 हजार रुपये आहे तर काहीजण 16 हजार रुपये किंमत आहे असे सांगतात. माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणेसाहेब तेथे गेलेले होते, तेव्हा त्यांना सुध्दा सांगितलेले असेल. तेथील शेतकऱ्यांनी आम्हाला ही माहिती दिली आहे, तर माननीय महसूल मंत्री महोदयांना देखील नक्की सांगितले असेल. माझे असे म्हणणे आहे की, येथील मच्छिमारांना सबसिडीव्दारे ते यंत्र पुरविता येईल काय ? ज्याच्यामुळे समुद्रामध्ये काही नॉटीकल मैल आत गेल्यानंतर आपल्याला धोका आहे असे समजल्यानंतर ते आपल्या होडया घेऊन परत येऊ शकतील.तसेच घरावर नारळाचे किंवा आंब्याचे झाड पडते,आम्ही

. . . .2 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .. . .

रत्नागिरी येथील श्री.बाळ माने यांच्या गावामध्ये गेलो होतो. तेथे सडयामिऱ्याच्या बाजूला, किनाऱ्याच्या बाजूला घरावर आंब्याचे एक झाड पडले, घराचा सर्व कोपरा पडलेला आहे, पडवी पडलेली आहे अशा वेळी त्या लोकांना 500 रुपये, 1000 रुपये अशी मदत दिली जाते. त्यामुळे मला असे वाटते की, शासनाने मानवी मन जागे ठेऊन निकष ठरविणे आवश्यक आहे. काही ठिकाणी असे झाले आहे की, 35-40 लाख रुपयांची बोट आहे. पण माननीय मंत्री महोदय या बोटीचा मालक वेगळा आहे. परंतु त्यावर काम करणारे मजूर मात्र केरळ मधील किंवा दक्षिणेकडील आहेत. आपल्या अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की, तुम्ही महाराष्ट्रातील नसल्यामुळे, तुमच्याकडे डोमिसाईल सर्टीफीकेट नसल्यामुळे तुम्हाला नुकसान भरपाई मिळणार नाही. मला असे वाटते की, हे बरोबर नाही. शेवटी तो माणूस येथे काम करण्यासाठी आलेला आहे. बोटीचा मालक घरी असतो आणि बोटीवर पाच-सहा खलाशी गेलेले असतात. त्यामुळे तो कोणत्या प्रांतातून आलेला आहे हे न पहाता, तो भारताचा नागरिक आहे की नाही हे पाहून मग आपण त्याला नुकसान भरपाई द्यावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, माझी आणखी एक विनंती आहे की, ज्याचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे, ते नुकसान आपल्या भांडवलातून भरु शकतात. पण जे छोटे-छोटे शेतकरी आहेत, मच्छिमार आहेत, बागायतदार आहेत त्यांच्याकडे कोणी पहात नाही. म्हणून शासनाने नुकसान भरपाई देताना सर्वात कोण दुर्बल आहे ? ज्याचे जास्तीतजास्त नुकसान झालेले आहे त्याच्याकडे लक्ष दिले पाहिजे. शासनाला आईची उपमा दिली जाते. आपण जर निरीक्षण केले तर आपल्याला दिसून येईल की, एक कुत्री असते, तिची पिल्ले असतात. त्यातील जे धष्ट-पुष्ट पिल्लू असते, ते आपल्या आईकडे जाऊन जास्तीतजास्त दूध प्राशन करीत असते. परंतु त्यातील जे दुबळे पिल्लू असते ते आपल्या भावंडांबरोबर स्पर्धा करु शकत नाही. म्हणून ती कुत्री तोंडाने किंवा शेपटीने त्या पिल्लाला जवळ घेते आणि त्याच्याकडे जास्त लक्ष देते.मला असे वाटते की, राज्य कारभार करताना शासनाची भूमिका ही संकटाच्या काळामध्ये दुर्बल माणसाला शासनाकडून मदत कशी मिळेल हे पहाण्याची असली पाहिजे. परंतु सध्या उलट प्रकार होत असून ज्याच्या लहान होडया आहेत, कमी शेती आहे त्यालाच कमी नुकसान भरपाई मिळत आहे. यापूर्वी कर्ज माफीच्या बाबतीत देखील असेच झाले. कर्ज माफी कोणाला झाली ? नियमाचा आधार घेऊन काहींना 25-25

. . . .2 व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लाख, 30-30 लाख, 40-40 लाख रुपये इतकी कर्जमाफी झाली. परंतु जो छोटा शेतकरी होता, त्याला कर्जमाफी मिळाली नाही. म्हणून फयान वादळामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर विशेषत: कोकणातील शेतकऱ्यांवर जे संकट आलेले आहे, त्याबाबतीत लक्ष दिले पाहिजे. कोकणी माणूस हा भांडण्यामध्ये पुढे असतो, मागणी करण्यामध्ये नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.....

उगाचच नको तेथे त्याचा स्वाभिमान जागा होतो. मला कशाला मदत पाहिजे. मी मदत मागणार नाही, असे म्हणेल आणि आयुष्यभर कर्ज काढत बसेल आणि कोर्ट कचेऱ्या करीत बसेल. आयुष्यभर तो संघटीत होणार नाही. म्हणून तो असंघटीत आहे. आता तो शासनाकडे काही मागत नाही. म्हणून त्याच्या मागण्याची वाट न बघता शासनकर्त्याने कल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून या सगळयाच्या संदर्भात त्या ठिकाणी 80 टक्के ते 90 टक्के पंचनामे झालेले आहेत. शासनाने चांगले आदेश दिलेले आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. खडसेसाहेबांबरोबर आम्ही त्या ठिकाणी भेट दिल्यानंतर शासनाने पटापट आदेश दिलेले आहेत. त्यामुळे कोकणपट्टीमध्ये 80 ते 90 टक्के पंचनामे पूर्ण झालेले आहेत. परंतु हे निकष बदलून त्या शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत कशी मिळेल या दृष्टीकोनातून शासनाने बघितले पाहिजे. आम्ही कुठल्याही प्रकारच्या राजकीय अभिनिवेशातून हा प्रस्ताव आणलेला नाही, हे मी या ठिकाणी श्रीमती दराडेताईंना सांगू इच्छितो. महाराष्ट्राचे वैशिष्टय त्यांनी सांगितले. महाराष्ट्राचे दुसरेही वैशिष्ट्य आहे. की संकटाच्या काळामध्ये "वयं पंचाधिकमं शतम्" अशा तऱ्हेच्या भावनेने आपण काम करीत असतो. म्हणून महाराष्ट्रावर आलेल्या संकटाच्या बाबतीत मग तो विदर्भातील शेतकरी असेल, मराठवाडयातील शेतकरी असेल, त्यांना सगळयांना मदत मिळाली पाहिजे. याबाबतीत श्रीमती अलका देसाईताई धाडसाने या ठिकाणी म्हणाल्या की, पश्चिम महाराष्ट्रालाच सर्व काही मदत का मिळते? आता त्या काँग्रेसमध्ये आल्यामुळे अशा प्रकारे धाडसाने या ठिकाणी बोलल्या. पूर्वी त्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होत्या त्यावेळी साहेबांची परवानगी घेतल्या शिवाय त्या असे बोलल्याच नसत्या. तरी सुध्दा पश्चिम महाराष्ट्र असो, मराठवाडा असो, सर्वांना मदत मिळाली पाहिजे. विशेषत: विदर्भात फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे थोडयाशा उदार अंत:करणाने नुकसान भरपाईचे निकष बाजूला ठेवून मदत करण्याची आवश्यकता आहे. मी पुन्हा या ठिकाणी पुनरावृत्ती करतो की, या संबंधीचे सगळे जुने जी.आर. बदलण्यात यावेत.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण माझे नांव घेऊन बोलत आहात. मला जे बोलावयाचे होते ते मी धाडसाने बोलले. तुमच्यामध्ये जर तेवढे धाडस असेल तर तुम्ही बोला, माझी त्याला हरकत नाही.

(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ. वसंत पवार)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : तुमचे धाडस मी महानगरपालिकेत पाहिलेले आहे. तुम्ही धाडसी आहात, याचे मला कौतुक आहे. सभापती महोदय, मला असे वाटते की, नैसर्गिक आपत्तीमधील नुकसान भरपाईच्या यासंदर्भातील सगळे निकष बदलले पाहिजेत. त्यासंदर्भात्ील सगळे जी.आर. बदलले पाहिजेत आणि नवीन निकष तयार केले पाहिजेत. माझी पुन्हा विनंती आहे की, ही सगळी चर्चा रिझल्ट ओरिएन्टेड होईल. शासनाच्यावतीने माननीय मंत्रिमहोदय उत्तर देत असताना या चर्चेमधून नवनीत निघाले आणि या सगळया आपदग्रस्तांना चांगली नुकसानभरपाई मिळाली अशा प्रकारचा संदेश महाराष्ट्रात सर्वदूर जाईल, या विश्वासासहीत माननीय सभापती महोदय, आपण मला बोलायला परवानगी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण पूर्ण करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री किरण पावसकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित): सभापती महोदय, फयान वादळाच्या संदर्भात सन्माननीय सर्व ज्येष्ठ सदस्यांनी चर्चा केलेली आहे. त्याबाबतीत पुनरावृत्ती न करता व सभागृहाचा अधिक वेळ न घेता मी याबाबतीतील माझे मुद्दे या ठिकाणी मांडणार आहे. या फयान वादळानंतर महाराष्ट्रात वित्त हानी किती झाली? कृषी हानी किती झाली? मच्छिमारांचे नुकसान किती झाले? सुक्या मच्छीचे टर्नओव्हर बघितल्यानंतर त्याचे नुकसान किती झाले? या सर्व बाबींचा परामर्ष घेतला तर ही नैसर्गिक आपत्ती होती याबाबत दुमत नाही. पण जरी नैसर्गिक आपत्ती असली तरी सरकार या येणाऱ्या संकटाला थांबवू शकले नसते. पण झालेल्या नुकसानापेक्षा कमी नुकसान करण्याचा प्रयत्न नक्कीच करु शकले असते. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, प्रवासी वाहतूक करणाऱ्याना तीन दिवस अगोदर प्रवाशी वाहतूक बंद करण्याबाबत समजले होते. परंतु मच्छिमारांना मात्र 11 तारखेला कळले. म्हणजे त्याच दिवशी 12.00 वाजता कलेक्टर ऑफिसना कळविले गेले आणि सर्व कलेक्टर ऑफिसकडून सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगडमधील मच्छिमारांना आपण समुद्रात जाऊ नका अशा प्रकारचा मेसेज देण्यात आला नाही.कदाचित हा इशारा अगोदर मिळाला असता तर जे नुकसान झालेले आहे त्यापेक्षा फार कमी नुकसान झाले असते आणि कित्येक निरपराध लोकांचे जीव सरकार वाचवू शकले असते. सर्व यंत्रणा असल्या तरी सरकारचीच एक यंत्रणा आहे. जिला आपण डिझास्टर मॅनेजमेंट असे म्हणतो. त्यांच्याकडे खरोखर आपत्कालीन परिस्थितीसाठी काही व्यवस्था आहे काय? आणि जर याबाबतची व्यवस्था होती तर जिल्हावार ती वापरली गेली आहे काय? ही यंत्रणा जिल्हावार वापरली गेली असती तर या फयान वादळाच्या संदर्भात अशा प्रकाकरचे वेगवेगळे स्टेटमेंट करण्यात आले नसते. सरकारच्या यंत्रणेने आणि माननीय मंत्री महोदयांनी केलेले स्टेटमेंट बघितले तर असे दिसून येईल की, काही स्टेटमेंट हे स्वत:च्या सरकारची पाठ थोपटून घेण्यासाठी प्रेससमोर करण्यात आलेले आहेत. यासंदर्भात मंत्र्यांनी केलेली विधाने मी सभागृहासमोर मांडू इच्छितो. 17 तारखेला एक विधान असे करण्यात आले की,"रत्नागिरी जिल्हयात आता पर्यंत 20 बळी घेतले आहेत. वादळामुळे जिल्हयात तब्बल 28 कोटी 29 लाख रुपयाचे नुकसान झाले असल्याची माहिती पुनर्वसन राज्यमंत्री श्री. भास्करराव जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

नुकसानग्रस्तांना आतापर्यंत सुमारे 17 लाखांची मदत केल्याचेही त्यांनी सांगितले." पुढे असे म्हटले आहे की, "वादळामुळे जिल्ह्यात 31 हजार 953 घरांचे नुकसान झाले आहे. 2693 गोठ्याचेही अंशत: नुकसान झाले असून या सर्वांचे पंचनामे 100 टक्के पूर्ण झाल्याचे श्री. जाधव यांनी सांगितले. त्यांनी हे 17 तारखेच्या पत्रकारपरिषदेमध्ये सांगितले. याच राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेल्या अहवालाच्या बाबतीत असे म्हटले आहे की, "फयानमुळे राज्यात केवळ शेती आणि मच्छिमारी क्षेत्राचे अनुक्रमे 2469.14 कोटी व 23.71 कोटी रुपयांचे तर जलसंधारण, ऊर्जा, शिक्षण, पाणीपुवठा, पायाभूत सुविधा या व अन्य क्षेत्रांचे एकूण सुमारे 27.79 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. तसेच नागरिकांच्या वैयक्तिक स्थावर मालमत्तांचे 11.75 कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे राज्याने केंद्राकडे पाठवलेल्या अहवालात म्हटले आहे." केंद्राकडे पाठविलेल्या अहवालात जवळपास 2500 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. शासनाने ही बाब गांभीर्याने घेतली पाहिजे. फयान वादळ झाल्यानंतर या शासनाने दिलेली आकडेवारी आणि आज एक महिन्यानंतर झालेले नुकसान 10 पटीने नसून 100 पटीने झाल्याचे सरकार मान्य करते. पुरग्रस्तांना मदत करणे बाजूलाच राहिले परंतु शासनाने या ठिकाणी पुरग्रस्तांच्या जीवनाशी खेळ चालविलेला आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. या चर्चेमध्ये आपण मच्छिमारांचे झालेले नुकसान सांगितले. मच्छिमारांना 10 हजार रुपये देण्यासाठी मालवण, वेंगुर्ला, देवगड या ठिकाणी लोक जात आहेत. मंत्रिमहोदय गेले, आमदार गेले. पण त्या मच्छिमारांचे जे नुकसान झाले, त्या ठिकाणी ज्या जाळ्या तुटलेल्या आहेत, त्या ठिकाणी ज्याला आपण पाटा म्हणतो अशा 70-80 किलो वजनाच्या दोन दोन लाकडी पाटा एका एका ट्रॉलरला बांधल्या जातात त्यांची किंमत, त्याच्यासाठी रॉड लावला जातो त्याची किंमत हे सर्व बघितल्यानंतर 1 लाख रुपयांचे नुकसान झालेले असेल त्यांना शासन 10 हजार रुपये मदत देते आणि शासन त्यांना पुन्हा सांगते की, पंचनामे झाल्यानंतर तुम्हाला जाळीचे पैसे हवे असतील तर व्हॅटची रिसीट आणून द्या. लघु उद्योगाच्या माध्यमातून माडाच्या झाडाखाली बसून पारंपरिक पध्दतीने कोळी समाजाचे लोक जाळी विकतात. ही बाब सरकारला माहीत आहे, जिल्हाधिकारी कार्यालयाला तसेच महसूल खात्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

सर्व अधिकाऱ्याना माहीत आहे. परंतु जो आधीच गांजलेला आहे, ज्याच्याकडे असलेले सगळे गेलेले आहे त्यांच्या बाबतीत अशा पध्दतीने पंचनामे करुन त्यांना आणखी त्रास देत आहेत. माझे असे म्हणणे आहे की, केंद्राकडे मागितलेली मदत, मच्छिमारांचे झालेले नुकसान, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील मच्छिमार, मी फक्त मच्छी पकडणारे किंवा बोटीवर जाणाऱ्यांसंबंधीच बोलत नाही तर त्या व्यवसायाला इतर उपलब्धता करुन देणारे, मग ते डिझेलचा पुरवठा करणारे असतील, त्यांच्यासाठी जाळी बनविणारे असतील, कारपेंटरीचे काम करणारे लोक असतील, बोटीचे काम करणारे लोक असतील, मच्छी सुकविणारे असतील, मच्छी विकणारे असतील, असे या जिल्ह्यातील जवळजवळ 75 हजार लोक या व्यवसायावर वर्षानुवर्षे आपले पोट भरत आहेत आणि त्यांच्या नशिबी मात्र वेगवेगळे स्टेटमेंट करुन सरकार असे दाखवून देत आहे की, आम्ही त्यांना काही तरी मोठी मदत करीत आहोत. वस्तुत: मदत बाजूलाच राहिली. सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण यांनी सांगितले की, एखादे माडाचे झाड किंवा एखादे सुपारीचे झाड लावण्याच्या संदर्भात कोकणात एक म्हण आहे की, वडील झाड लावतात आणि त्याची फळे मुले खातात. एक झाड उद्ध्वस्त झाल्यानंतर त्यासाठी 10 हजार रुपये आणि 15 हजार रुपये जी मदत आपण देत आहात ती पुरेशी नाही. ही तुटपुंजी मदत आहे. पण या तुटपुंज्या मदतीसाठी आपण पत्रकारपरिषदा घेऊन आपण असे दाखवित आहात की, आम्ही मोठ्या प्रमाणावर मदत करीत आहोत. सरकारने आपल्या वेगवेगळ्या कामकाजात जर फरक केला असता तर मदतच नाही पण होणारे नुकसान सुध्दा थांबविता आले असते. मी तर असे म्हणेन की, फयानग्रस्तांमध्ये मच्छिमार तसेच शेतकरी यांचे झालेले नुकसान आहे ते भरुन मिळाले पाहिजे. कोकणामधील शेतकरी एक टक्का सुध्दा विजेची चोरी न करणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. सहकार तत्वावर कोठले तरी कारखाने काढले गेले आणि ते बुडाले म्हणून पुन्हा त्याच्यासाठी सरकारकडून पैसे घ्या अशातला सुध्दा तो जिल्हा नाही. पण त्यांचे नुकसान झालेले आहे आणि जेवढे नुकसान झाले आहे तेवढे तरी त्यांना व्यवस्थित मिळू द्यावे एवढी इच्छा या ठिकाणी व्यक्त करतो. पण त्याच बरोबर मी सांगेन की, फयानग्रस्तांना मदत करीत असताना वेगवेगळ्या वर्तमानपत्रांमध्ये मंत्रिमहोदयांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/

श्री. किरण पावसकर .....

मदतीच्या संदर्भात जी विधाने आलेली आहेत ती पाहता असे करुन आपण त्यांना आणखी दुर्बल करु नका. याचे कारण असे की, सरकार नावाची ही जी बोट आहे ती समुद्रामध्ये फयानग्रस्तांसाठी मदत घेऊन गेली आहे पण मला असे वाटते की, फयानग्रस्तांपेक्षा या सरकारची बोट मात्र महाफयानमध्ये अडकलेली आहे आणि ती पहिल्यांदा बाहेर काढावी आणि ज्या लोकांना जी गरज आहे ती त्यांच्यापर्यंत पोहचू द्यावी एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेला प्रस्ताव आणि विरोधी पक्षाच्यावतीनेही याच विषयावर मांडण्यात आलेला नियम 289 अन्वये प्रस्ताव हे दोन्ही प्रस्ताव एकत्रितपणे चर्चेसाठी घेण्यात आलेले आहेत. या प्रस्तावावर थोडक्यात माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये फयान नावाच्या भयानक वादळामुळे निर्माण झालेली परिस्थिती, त्यातून झालेले नुकसान आणि या नुकसानीमुळे सबंध महाराष्ट्रातील विविध भागामध्ये जे संकट आले त्यातून आर्थिक दुरावस्था निर्माण झाली त्याची भरपाई शासनाने कर्तव्य म्हणून करावी आणि ती योग्य प्रमाणात, योग्य वेळी लोकांपर्यंत पोहोचावावी असा या प्रस्तावा मागचा मूलत: हेतू आहे. मी सर्व चर्चा ऐकत असताना माझ्या आधीच्या अनेक सन्माननीय सदस्यांचे जे विचार ऐकले ते निश्चितच मार्गदर्शक आहेत. नुकसानीचा अंदाज कसे घेतात, नुकसानीची पूर्व सूचना कशी मिळाली पाहिजे, संकटाची सूचना कशी मिळाली पाहिजे, एवढेच नाही तर ऋतू चक्र बदलाबाबतच्या सर्व गोष्टींचा उहापोह याठिकाणी झाला आहे. मला वाटते की, आज आपला देश जगामध्ये महासत्ता होण्याच्या प्रयत्नामध्ये आहे. महासत्ता होण्यातील महत्वाचा वाटा कोणत्या राज्याचा असेल तर तो निश्चितपणे महाराष्ट्राचा राहणार आहे. एक प्रगतीशील राष्ट्र आणि एक प्रगतीशील प्रदेश महाराष्ट्र म्हणून महाराष्ट्राची जी ख्याती आहे, ती ख्याती आपल्यासमोर असताना एक अतिशय मोठा, व्यापक विषय आहे तो हा की, चॅलेंज टू द प्रेझेंट सिव्हिलायझेशन. एकूणच मानवी व्यवहार संस्कृतीपुढे निसर्गाने उभे केलेली ही जी आव्हाने आहेत ती वेगवेगळया स्वरुपामध्ये येत असताना वेगवेगळया देशातील लोक अशा संकटांचा सामना करण्यासाठी काय करतात, कशाप्रकारे यंत्रणांची उभारणी करतात याचा अभ्यास कधीतरी करणे आवश्यक आहे असे मला वाटते. मला असेही वाटते की, 26 नोव्हेंबर रोजी आतंकवाद्यांनी जो हल्ला केला त्यानंतर पोलीस यंत्रणा सक्षम करण्यासाठी गृह विभागातर्फे पोलिसांना इंग्लंड, अमेरिका, इस्त्रायल या देशांमध्ये वेगळया प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी पाठविले होते. देशाची आणि नागरिकांची सुरक्षा जेवढी महत्वाची आहे तशीच या देशातील नैसर्गिक संपत्तीची सुरक्षा महत्वाची आहे आणि या संपत्तीचा उपयोग करुन देशाची अन्नधान्य पुरविणारी शेतकरी नावाची यंत्रणा आहे त्याच्याबाबतही

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.हेमंत टकले....

जगभरातील अनुभव आपल्याला निश्चितपणे उपयोगी पडू शकतात अशाप्रकारचे आहेत. जपान सारख्या देशात वारंवार भूकंप होतात. तेथे एकही महिना भूकंपाशिवाय जात नाही. परंतु जपान सरकारला लोकांना नुकसान भरपाई द्यावी लागली, अमुक करावे लागले, तमुक करावे लागले असे कधी ऐकण्यात आलेले नाही. येणाऱ्या प्रत्येक नैसर्गिक संकटाला एक नाव देऊन आपण त्याचे बारसे करीत असतो. तसे या वादळाला फयान हे नाव दिले गेले. 10 तारखेपर्यंत हा शब्द कोणाच्या वाचनातही नव्हता. अशाप्रकारची वादळे ठिकठिकाणी येत असतात, त्यानंतर जर तेथे झालेल्या नुकसानीचा आणि नुकसानीपेक्षा तेथे झालेल्या जीवित हानीचा विचार केला तर जगभरात अशा संकटामध्ये जीवित हानी होण्याचा भारताचा नंबर फार वरचा असेल अशी शंका मला वाटते. या सगळया विषयामध्ये शासन आणि आपण सर्वजण नव्या माहितीच्या युगामध्ये प्रवेश करीत आहोत. ई-गर्व्हेन्स नावाची सिस्टिम आली आहे. महाराष्ट्र शासनाचे ते एक धोरण आहे. नॉलेज कॉर्पोरेशन नावाची सर्व शिक्षण देणारी संस्था आहे. या सगळया गोष्टींचा ई-गर्व्हेन्सशी संबंध जोडला जातो काय ?

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंत्रालयात त्या जागेवर बसलेले जे अधिकारी आहेत त्यांचा आपापसात संपर्क आहे काय हे देखील पाहिले पाहिजे. ते जर कार्यक्षम नसतील तर त्यांना कार्यक्षम करण्यासाठी वरुन आदेश मिळतील अशी व्यवस्था आहे काय, याचा देखील कधी तरी अभ्यास होणे गरजेचे आहे. आपण राज्यामध्ये दोन टप्प्यामध्ये निवडणुका घेतो. याबाबतचे कारण सुरक्षा व्यवस्था एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी हलवावी लागते असे सांगितले जाते. राज्याला फयान वादळाचा तडाखा बसला, मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, मच्छिमारांच्या बोटी बेपत्ता झाल्या, खलाशी बेपत्ता झाले. याबाबतीत पंचनामा करण्याचे काम महसूल यंत्रणेचे आहे. या यंत्रणेतील शेवटचा माणूस तहसीलदार आहे. या यंत्रणेला मनुष्यबळ कमी पडत असेल तर आपल्या राज्यातील दुस-या ठिकाणचे मनुष्यबळ याठिकाणी आणून सहकार्य करुन वेगाने आणि कार्यक्षमतेने काम होईल अशा प्रकारची व्यवस्था करता येणार नाही का, याचा शासनाने विचार करावा, असे मला वाटते. फयान वादळ, अन्य वादळे, नैसर्गिक आपत्ती यांचा सामना आपण करीत असताना ग्लोबल वार्मिंगमुळे हवामानामध्ये वारंवार होणा-या बदलांचा देखील आपणाला सामना करावा लागणार आहे. या सगळयांना सक्षमतेने सामारे जावयाचे असेल तर शासनाची यंत्रणा अधिक सक्षम करण्याची, अधिक प्रशिक्षित करण्याची, लोकाभिमुख करण्याची जरुरी आहे. मी एकच उदाहरण सांगतो. फार वर्षापूर्वी मी लहान असताना तामिळनाडूमध्ये सहलीला गेलो होतो. त्यावेळी ते मद्रस राज्य होते. त्यावेळी बसमधून प्रवास करण्यासाठी लहान मुलांना अर्धे तिकीट आणि प्रौढांना पूर्ण तिकीट काढावे लागत होते. त्यावेळी बस स्थानकाच्या बाजूच्या भिंतीवर मार्किंग केले होते. त्याच्या खालून गेल्यानंतर अर्धे तिकीट दिले जात होते...(अडथळा) मला एवढेच सांगायचे आहे की, यंत्रणेमध्ये काम करणारा माणूस हा कॉमनसेन्स वापरुन काम करु लागला, ती यंत्रणा जाणीवपूर्वक संवेदनशीलता ठेवून काम करु लागली तर भविष्यामध्ये अशा प्रकारच्या संकटांचा सामना आपण सक्षमतेने करु शकू. तेव्हा याबाबतीत देखील शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, आज आपण फयान वादळाच्या संदर्भात येथे चर्चा करीत आहोत. आपल्याला स्मरत असेल की, निवडणुकांनंतर मुंबईमध्ये 11 नोव्हेंबरला विधानपरिषदेचे विशेष अधिवेशन भरविण्यात आले होते. त्या दिवशी मध्यवर्ती सभागृहामध्ये दोन्ही सभागृहाच्या सदस्यांसमोर माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाले होते. त्या दिवशी वादळाची शक्यता होती. वादळ येणार म्हणून मंत्रालयातील सर्व महिलांना लवकर सोडण्यात आले होते. त्या वेळी विधानसभा आणि विधानपरिषद ही दोन्ही सभागृहे सुरु होती. या दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना वादळाच्या संदर्भात किती माहिती प्रसृत केली याबाबतीत आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. गेल्यावेळी नागपूर अधिवेशनाचे वेळी मोटरमनने अचानक संप केल्यामुळे मुंबईमध्ये कोलाहल निर्माण झाला होता. अशा परिस्थितीमध्ये विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असेल तर ते विधिमंडळ जनतेला कशा पध्दतीने मार्गदर्शन करणार आणि त्यादृष्टीने तातडीची यंत्रणा आपणाकडे काय आहे याबाबतीत विचार केला पाहिजे.

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

कारण 11 तारखेला माननीय राज्यपालांचे अभिभाषण होत असताना सर्व आमदार एकत्रित असून देखील अधिकृत घोषणा किती वाजता झाली? वाहिन्यांवर आपण टीका करतो. परंतु वाहिन्यांवरुन जी माहिती पोहोचत होती त्या खेरीज लोकांकडे अधिकृत माहिती असणारी कोणतीही यंत्रणा दुपारी 12 ते 1 वाजेपर्यंत सुध्दा उपलब्ध नव्हती. सगळेजण वाहिन्यांवरुन येणाऱ्या माहितीच्या आधारे आपापल्या लोकांपर्यंत माहिती पोहोचवित होते. म्हणून नैसर्गिक आपत्ती आल्यावर आपण जो विचार करतो, आपत्ती निवारणावर एवढी चर्चा करतो त्यावेळी आपत्ती निवारण आराखडा प्रत्येक जिल्हयात केला आहे असे प्रत्येक जिल्हाधिकारी विचारणा केल्यावर उत्तर देतात. आपत्ती निवारण आराखडा अशा आपत्तीच्या वेळेला किती तासांनी कार्यान्वित होतो? लोकांना सूचना सुध्दा मिळत नाही. एका बाजूला हवामान खात्यावर विनोद होत असतात. एकीकडे संशोधन होत आहे. आज वेदर चॅनेल्स आलेली आहेत. सामान्य लोकांना माहिती मिळाली पाहिजे. खऱ्या अर्थाने हवामानासंबंधी अचूक माहिती देणे ही शासनाची जबाबदारी आहे. एकाद्या ठिकाणी भूकंपमापक यंत्रणा बिघडली तर त्या यंत्रणेला दोष दिला जातो. परंतु ही माहिती आपल्याकडे वेधशाळा असताना सुध्दा 10-12 तासांच्या आत मिळत नसेल तर आपण कोणत्या मध्ययुगामध्ये जगत आहोत आणि मग पुढील नुकसान भरपाईच्या संदर्भात विचार करतो याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्या याठिकाणी वाहिन्यांची बाजू घेत आहेत. वाहिन्या जो हवामानाचा अंदाज घेतात तो वेधशाळेकडील माहितीच्या आधारेच घेत असतात. चुकीची नोंद होऊ नये म्हणून मी हा मुद्दा उपस्थित केला आहे. वाहिन्या हवामानाचा अंदाज घेतात त्या शासनाच्या वेधशाळा आहेत. त्यांच्याकडील माहितीच्या आधारेच वाहिन्या हवामानाची माहिती देत असतात. वाहिन्यांकडे हवामान मोजण्याची यंत्रणा नाही असे मला वाटते. असेल तर आमच्या ज्ञानात भर घालावी. चुकीची नोंद याठिकाणी होऊ नये एवढीच माझी विनंती आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा हरकतीचा मुद्दा आहे का? एकाग्रता माझ्या बोलण्याकडे ठेवली असती तर हा मुद्दा मांडण्याची वेळ आली नसती. आम्ही बोलायला उभे राहिलो की यांना विनोद सुचतात. यामुळे विषयाचे महत्व कमी होते असे मला वाटते. हरकतीचा मुद्दा गैरलागू आहे असे मला वाटते. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (डॉ.वसंत पवार) : मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. आपल्याला तसे काही म्हणायचे नव्हते असे आमच्या लक्षात आले आहे. आपण पीठासीन अधिकाऱ्यांना उद्देशून बोलावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : वेधशाळेकडील माहिती फक्त सरकार पोहोचविणार की वाहिन्यांमार्फत जाणार हा मुद्दा आहे. सह्याद्री किंवा इतर वाहिन्यांवरुन माहिती दिली जाऊ शकते. फयान वादळ झाले त्याची एक बाजू कोकणपट्टीमध्ये झालेले नुकसान स्पष्ट करते. त्याचबरोबर संपूर्ण महाराष्ट्रात अवकाळी पाऊस झाला. खानदेशात केळी, पश्चिम महाराष्ट्रात द्राक्ष, डाळिंब, विदर्भ आणि मराठवाड्यात वेचणीला आलेल्या कापसाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. विदर्भ आणि मराठवाडा त्याचबरोबर उर्वरित महाराष्ट्रामध्ये पिकांचे जे नुकसान झाले त्यामुळे शेतकरीवर्ग उद्ध्वस्त झाला आहे. नॅचरल कॅलॅमिटी कॉन्टिजन्सी फंडमधून 1170 कोटी रुपयांची शासनाने

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

मागणी केली. प्रत्यक्षात 2538 कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आमच्याकडे उपलब्ध झाली आहे. 2538 कोटी रुपयांपैकी प्रत्यक्ष नुकसान झाले त्याबदल्यात केंद्राकडून महाराष्ट्राला प्रत्यक्षात किती निधी मिळाला, उर्वरित निधीसाठी सरकार काय पावले उचलणार आहे या संदर्भात माहितीपर अहवाल देऊन खरोखर किती लोकांना कशा पध्दतीने मदत मिळाली हे सभागृहाला सांगावे. आपण चर्चामागून चर्चा करीत असतो. परंतु प्रत्यक्षात ज्यांच्या कुटुंबातील व्यक्ती दगावली अशा कुटुंबांना 10-15 लाख रुपये मदत मिळते. सन्माननीय मंत्रीमहोदयांकडे नैसर्गिक आपत्ती विभाग आहे. प्रत्यक्षात या कुटुंबांना रेस्क्यू रिहॅबिलिटेशन पलिकडे जाऊन पुनर्वसन आणि त्यांचा विकास याचीही आवश्यकता आहे. एका कुटुंबाला ज्यावेळेला 1-2 लाख रुपये मिळतात त्या कुटुंबातील मुलांच्या पुढील शिक्षणाचे काय होते? एखादी स्त्री कुटुंब प्रमुख असेल तर तिच्या संदर्भात काय विकासाचे कार्यक्रम राबविले जातात? भूकंप, वादळ, वीज कोसळून मृत्युमुखी पडल्यास पुनर्वसन विषयक पावले उचलली गेली पाहिजेत.

(नंतर श्री.खर्चे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

मघाशी सन्माननीय सदस्या म्हणाल्या की, सरकार कृषी विषयक धोरण तयार करणार आहे. मग सध्या सरकार कोणते धोरण राबवित आहे हा प्रश्न देखील त्या निमित्ताने निर्माण होतो. मला या निमित्ताने हँड रेडियोचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. हा हँड रेडियो आपत्तीकाळात वापरला गेला पाहिजे. परंतु आपण वर्षानुवर्षे आपत्ती आल्यानंतरच चर्चा करीत आलो हे दुर्दैव आहे. पर्यावरण बदलासंबंधी एक मोठी कॉन्फरन्स झालेली आहे पण त्याचा प्रत्यक्षात फटका मात्र कोकण आणि राज्यातील शेतकऱ्यांना बसलेला आहे. म्हणून अशा आपत्तीच्या काळात मदत देण्यासंबंधीचे जे निकष शासनाने बदलले असतील त्यांचा उल्लेख झाला पाहिजे, आणि ते बदलले नसतील तर बदलण्याची गरज आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षाकडिल दोन्ही सदस्य या दोन मुद्यांवर एकत्र येत असताना संपूर्ण विदर्भातील शेतकऱ्यांची जी अपेक्षा आहे त्यातून शेतकऱ्यांच्या हाताला काय मिळणार आहे, कोकणातील शेतकऱ्यांना काय मिळणार आहे याकडे लोकांचे लक्ष लागलेले आहे. अन्यथा विदर्भातील लोकांच्या मनात या विधिमंडळ अधिवेशनाच्या संदर्भात संपूर्ण नकारात्मक भावना जी निर्माण होत असते त्याला पुष्टी मिळेल. माझी अशी मागणी आहे की 6 महिन्यात मच्छिमारांच्या कुटुंबियांना न्याय मिळाला पाहिजे तसेच ज्या अधिकाऱ्यांनी आपत्तीसंबंधीची माहिती उशिरा दिली त्यांची चौकशी करुन कडक कारवाई केली पाहिजे. त्याचप्रमाणे फयान वादळाचा उल्लेख जो होतो त्याला वेगवेगळी नावे दिली जातात. म्हणून फयान वादळ आणि अवकाळी पाऊस याच्या बाबतीत व्यवस्थित कृती कार्यक्रम आखला पाहिजे याकडे शासनाचे लक्ष वेधते व माझे भाषण पूर्ण करते.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आणि विरोधी पक्षाकडून नियम 260 अन्वये फयानच्या संदर्भात सभागृहात जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, अनेक सनमाननीय सदस्यांनी या ठिकाणी आपल्या मौल्यवान सूचना सरकारला केलेल्या आहेत. तसेच वेळ भरपूर झालेला असल्यामुळे मी फक्त काही सूचना करणार आहे. कोकण, ठाणे आणि संपूर्ण राज्यातील शेतकरी, बागायतदार व मच्छिमार तसेच वीट भट्टीवाले अशा अनेक लोकांना या फयान वादळाचा तडाखा बसलेला आहे. संकटे येत असताना सांगून येत नसतात तर त्यांचे अंदाज फक्त वर्तविले जातात. असे अंदाज वर्तवित असताना हे वादळ मुंबईवरुन कोकणाकडे वळले आणि दुर्दैवाची बाब म्हणजे कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि ठाणे या भागातील चित्रण आम्ही चॅनलवरुन पाहत होतो. हे चित्र डोळ्यासमोर उभे राहिले तर फारच विचित्र अवस्था निर्माण होते. मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, या आपत्तीत नुकसान झालेल्यांमध्ये ज्यांचा उल्लेख झाला आहे त्यात वीट भट्टीवाल्यांचाही उल्लेख प्रामुख्याने करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितले की, शेती आणि भात पीक याचे नुकसान झालेले आहे. पण ठाणे जिल्ह्यात भाताचे पीकच शिल्लक राहिलेले नाही, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .....

भात कापण्याची वेळ होती त्यावेळीच पाऊस आला आणि त्यामध्ये भाताचे पीक शेतक-यांच्या हातून निघून गेले. काही शेतक-यांनी भाताचे पीक कापून आपल्या शेतात ठेवले होते त्या पिकाची नासाडी झाली आजही आमच्या भागातील शेतक-यांच्या शेतात पाणी आहे. ठाणे जिल्हा हा संपूर्णपणे आदिवासी जिल्हा आहे. ठाणे जिल्हयात 27 कोटी 53 लक्ष 90 हजार रुपयांचे नुकसान झालेले आहे. हे नुकसान झाल्याचेही शासनाने मान्य केलेले असून यासंर्भात ठाणे जिल्हयाने यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. ठाणे जिल्हयातील किती तरी आदिवासी गावातील लोकांच्या अंगावर वस्त्रे नाहीत, खाण्यासाठी अन्न नाही अशी परिस्थिती आहे. जव्हार, मोखाडा-वाडा, वसई-खारघर, तलासरी अशा अनेक खेडयातील वस्तुस्थिती आपल्या सर्वांना माहिती आहे. त्यामुळे माझी शासनाला एवढीच विनंती आहे की, शासन महाराष्ट्राचा विचार करीत असतांना ठाणे जिल्हयाचाही विचार शासनाने करावा आणि येथील शेतकरी बांधवांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई द्यावी एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी शासनाचे एकाच गोष्टीकडे लक्ष वेधणार आहे. महाराष्ट्रामध्ये कधी फयान वादळामुळे कधी अतिवृष्टीमुळे तर कधी दुष्काळामुळे असेल नुकसान होत असते परंतु महाराष्ट्रातील 1000-2000 माणसे अशा परिस्थिती मातीत घालायचा कार्यक्रम चालू आहे. या आपत्तीला तोंड देण्यासाठी मी शासनाचे लक्ष एका महत्वाच्या गोष्टीकडे वेधणार आहे. पूर्वी 25 मे रोजी रोहिणी नक्षत्र निघत असे आणि 25 मे ते 25 जुलै या चार महिन्यात 9 पावसाची नक्षत्र असायची व त्यामध्ये चांगला पाऊस पडायचा. 27 नक्षत्रातून ही 9 नक्षत्रे वजा केली आणि त्यामध्ये पाऊस पडला नाही तर शून्य पाऊस असे त्यावेळेस गणित असायचे. परंतु आज मात्र नऊच्या नऊ नक्षत्रे मोकळी जात असल्यामुळे निसर्गात प्रचंड प्रमाणात इरेग्यूलॅरीटीज निर्माण झालेली असल्यामुळे त्याचा परिणाम पाऊसावर होत आहे. याला पर्यावरणाचा बिघाड म्हणा की, अजून काही म्हणा परंतु हा सर्व प्रकार आता सुरु झालेला आहे. अवकाळी पाऊस आणि फयान वादळाच्या संदर्भात आज जवळ जवळ तीन साडेतीन तास चर्चा सुरु आहे. या आपत्तीमुळे नुकसान किती झाले आहे, वित्त हाणी किती झाली आहे, जिवीत हाणी किती झालेली आहे यासंदर्भात शासनाचे लक्ष वेधले गेले आहे. या चर्चेला शासन निश्चितपणे उत्तर देईल अशी मला अपेक्षा आहे. जी नैसर्गिक आपत्ती ओढवली जाते त्यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी शासन काही संशोधन करणार आहे की, नाही? आपत्ती ओढवण्याच्या अगोदर आपण काही उपाययोजना करणार आहोत की, नाही ? आपण काय घटना घडल्यानंतर उपचार करणार आहात काय ? आपण काही प्रतिबंधात्मक उपचार करणार आहात की, नाही? आपण काय दर वेळेस नुकसान भरपाई देतच राहणार, प्रचंड प्रमाणात पॅकेजेस देतच राहणार आहात काय? शासन खुषीत राहणार की, आम्ही नुकसानग्रस्तांसाठी काही तरी केले आहे. त्या त्या वेळेची गरज म्हणून आपल्याला ते करावेच लागेल, आपण त्यासाठी प्रयत्न करतोच आहेत, त्यामध्ये कमी जास्त होणारच आहे परंतु अशा त-हेची आपत्तीच येणार नाही यासंर्भातील योजना,संशोधन शासनाने करणे महत्वाचे आहे. केंद्रसरकार हवामान खात्याच्या निमित्ताने काही तरी काम करीत आहे परंतु राज्य शासनाचे हवामान खात्यावर जेवढे लक्ष केंद्रित करावयास पाहिजे तेवढे लक्ष दिले जात नाही त्यामुळे राज्य शासनाने हवामान खात्याकडे लक्ष दिले तरच यावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे .....

चांगल्या प्रकारचे उपाय होऊ शकतील. अन्यथा दर वेळेस या संकटातून त्या संकटामध्ये आणि त्यावर उपाययोजना करण्यामध्येच आपण फिरत राहू त्यामुळे घातकी चक्रातून सुटका करुन घेण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये या ठिकाणी चर्चा सुरु आहे. फयान वादळामुळे कोकणच्या किनारपट्टीवर तसेच ठाणे जिल्हयात जबरदस्त नुकसान झालेले आहे. फयान वादळामुळे कोकण किनारपट्टी तसेच ठाणे जिल्हयालाच तडाखा बसला असे नाही तर, खानदेश,पश्चिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्रामध्ये जबरदस्त अवकाळी पाऊस झाला. या अवकाळी पाऊसामुळे द्राक्ष पिकाचे तसेच डाळींब,कांदा तसेच टोमॅटो पिकाचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. या नुकसानीच्या संदर्भात ब-याच ठिकाणी पंचनामे झाले आहेत परंतु यासंदर्भात शासनाकडून जी काही त्वरित उपाययोजना होणे गरजेचे आहे ती मात्र काही झाली नाही. सध्याच्या काळात ऋतू चक्र बदलले आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे या गोष्टी होतच राहणार आहेत. नाशिकमध्ये दोन वर्षापूर्वी अवकाळी पाऊस झाल्यामुळे मोठया प्रमाणात पूर आला होता. पूर आल्यामुळे या ठिकाणी एक पूर रेषा तयार झालेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ वसंत पवार ...

अनेक गावामध्ये पूर आल्यामुळे नवीन पूर रेषा तयार करुन नदीच्या काठावर राहणा-या लोकांना तेथून उठविण्याचा आणि तेथील घरे हस्तांतरण न करण्यासंबंधीचा जी. आर. काढण्यात आला आहे. त्यामुळे त्या भागात राहणा-या गोर गरीब जनतेवर अन्याय होत आहे.त्याकडेसुध्दा शासनाने लक्ष घालावे अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, अवेळी पडलेल्या पावसामुळे द्राक्ष बागाचे नुकसान झालेले असल्यामुळे 25 हजार रुपये एकर या प्रमाणे मदत दिली जाणे आवश्यक आहे. एकदा द्राक्षाची बाग पडली व बागेचे नुकसान झाले की ती बाग पुन्हा उभी राहू शकत नाही त्यामुळे त्या शेतक-यांना जास्तीची मदत देणें आवश्यक आहे. त्याचबरोबर नाशिक जिल्हयातील बागलाण, कळवण,मालेगाव या तालुक्यातील डाळींबाच्या पिकाचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे.त्या भागातील डाळींबाचे पीक जवळ जवळ नामशेष झालेले आहे. त्याही शेतक-यांना नुकसान भरपाई दिली गेली पाहिजे. त्याच प्रमाणे शेतक-यांना व नदी काठी राहणा-या लोकांना वादळाची , मुसळधर पावसाची पूर्व सूचना देणारी यंत्रणा अधिक सक्षम करण्याची आचवश्कता आहे असे मी या निमित्ताने सांगतो आणि माझे भाषण संपवितो.

उपसभापती : माझ्याकडे ज्या सन्माननीय सदस्यांनी नावे दिली होती त्यातील सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर आणि फक्त एकाच सन्माननीय सदस्यांचे नाव शिल्लक आहे. आपल्याकडे वेळ मर्यादित आहे..

एक सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, मला देखील बोलावयाचे आहे.

उपसभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मला असे सांगावयाचे आहे की, सभागृहामध्ये आपण काही तरी शिस्त पाळली पाहिजे.एकदा गट नेत्यांकडून बोलणा-या सन्माननीय सदस्यांची नावे मागितल्या नंतर त्या सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळावी याकरिता आपण प्रयत्न करीत असतो. सन्माननीय सदस्यांनी सभागृहात कधी यावे हा त्यांचा प्रश्न आहे परंतु काही सन्माननीय सदस्य उशिराने येथे येऊन बोलण्यासाठी परवानगी मागतात हे बरोबर नाही. या बाबतीत त्यांनी आपल्या गट नेत्यांना अगोदर कळविले पाहिजे.आयत्या वेळी बोलण्यासाठी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ...

कोणी परवानगी मागत असेल तर ते बरोबर नाही. यानंतर मी सन्मननीय सदस्य श्री विनोद तावडे आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनाच बोलण्यासाठी परवानगी देणार आहे. प्रथम श्री. विनोद तावडे यांनी भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधान सभेने निवडलेले): सभापती महोदय, फयान चक्रीवादळ आणि अवकाळी पडलेल्या पावसाच्या संदर्भात या ठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेत भग घेण्याकरिता मी उभा आहे. सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडलेले आहेत त्यामुळे मी जास्त वेळ बोलणार नाही.

सभापती महोदय, फयान चक्री वादळामुळे व अवेळी पडलेल्या पावसामुळे राज्य सरकारने केन्द्र सरकाराकडे काही वित्तीय मदत मागितलेली आहे त्याचा जर अभ्यास केला तर याबाबतीत शासनाला काय म्हणावयाचे आहे हे सर्व त्यात सांगण्यात आलेले आहे त्यामुळे मी त्याच्या खोलात जात नाही. मला फक्त एक दोन मुद्दे मांडावयाचे आहेत.

सभापती महोदय, माझा पहिला मुद्दा असा आहे की कोणत्याही वादळाची पूर्व सूचना 72 तास अगोदर देणे हे इंडियन मेटयरॉलॉजी डिपार्टमेन्टवर बंधनकारक आहे. तेव्हा महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापनाकडे अशी माहिती मेटयरॉलॉजी डिपार्टमेन्टने दिली होती काय दिली असेल तर ती टी.व्ही. मार्फत नव्हे तर रेडिओवरुन दिली होती काय ?. दिली असेल तर कधी दिली ? मच्छिमारांकडे रेडिओ असतात त्यामुळे ही माहिती रेडिओवरुन दिली होती किंवा नाही याची माहिती सभागृहाला कळणे आवश्यक आहे . त्याचबरोबर केन्द्र सरकार आणि राज्य सरकार यांच्याकडून संयुक्तपणे नॅशनल डिझॉस्टर रिडक्शन फोर्स चालविला जातो आणि पुण्या जवळील तळेगाव येथे दोनशे एकर जमिनीवर दोनशें जवान कायम स्वरुपी तैनात केलेले आहेत तेव्हा त्याचा वापर फयान चक्री वादळाच्या वेळी कसा केला गेला ? जर केला गेला नसेल तर का केला गेला नाही याची माहिती सभगृहाला समजली पाहिजे.2005 साली नॅशनल सायक्लॉन रिस्क मॅनेजमेन्ट प्रोजेक्टच्या अंतर्गत वादळाची पूर्व सूचना मिळावी म्हणून डॉप्लर रडार सिस्टीम मुंबई आणि किनारपट्टीवर लावण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने दिला होता. तसेच प्रस्ताव गुजराथ ,राजस्थान आणि तामिळनाडू सरकारने दिले होते परंतु महाराष्ट्र सरकारचे संबंधित खाते हे प्रपोजल जस्टीफाय करण्यामध्ये अपयशी झाल्यामुळे 250 कोटी रुपयांचा प्रोजेक्ट तामिळनाडू आणि गुजराथ राज्यामध्ये गेला. तेव्हा आपल्याला केन्द्राकडून पैसे मिळणार नसतील तर राज्य सरकाराने 250 कोटी रुपये खर्च करुन ही यंत्रणा बसवली तर पाच दिवस अगोदर ही माहिती डॉपलर रडार सिस्टिमच्या माध्यमातून मिळू शकेल.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

तर तसे काही करण्याची रचना वा विचार सरकारने केला आहे काय ? याची माहिती मिळावी. तसेच युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंटचे राज्यात आपत्ती निवारण व्यवस्थापन जिल्हास्तरीय अधिकारी नेमला गेला होता. हा प्रकल्प चार वर्षासाठीचा होता. पण राज्य सरकारने आर्थिक तरतूद नसल्याने सदरची व्यवस्था जून 2009 पासून बंद केली आहे. हे वास्तव आहे का ? असल्यास, जेव्हा केवहा असे प्रसंग येतात, आपत्ती येतात, 26 नोव्हेंबरची आपत्ती आली की, वादळ आले की आपण चर्चा करतो. पण पुन्हा गुजराथ, तामिळनाडू आणि बाकीच्या राज्यांमध्ये आपत्ती निवारण व्यवस्थापनाचे स्वतंत्र मंत्रालय आहे, कॅबिनेट दर्जाचा मंत्री ते काम पाहतो. तेव्हा हे राज्य तसेच मुंबई शहर गेल्या वर्ष दोन वर्षात ज्या आपत्तींना तोंड देत आहे, ग्लोबल वॉर्मिंगमधून निर्माण होणारी जी चॅलेंजेस आहेत, त्यातून महाराष्ट्र राज्यासाठी आपत्ती निवारण व्यवस्थापन मंत्रालय स्वतंत्रपणे स्थापन करणे आवश्यक वाटते. आजही आपणाकडे येणारे अनेक आपत्ती निवारण व्यवस्थापनातील फंडस् केंद्राकडे परत जातात, काही लॅप्स होतात, आणि केव्हा तरी आपत्ती निवारण व्यवस्थापनाबाबत नीट पणे चर्चा केली तर त्यातून राज्यामध्ये आपत्ती निवारण व्यवस्थापनाची काय दुर्दशा झालेली आहे तेही समोर येईल. तेव्हा या निमित्ताने, फयानच्या निमित्ताने वा अवकाळी पावसाच्या निमित्ताने आपत्ती निवारण व्यवस्थापनासाठी स्वतंत्र मंत्रालयाच्या स्थापन करण्याचा राज्य सरकार विचार करणार आहे काय ? एवढेच मुद्दे मी या निमित्ताने मांडतो आणि त्यावर मंत्री महोदय विस्ताराने उत्तर देतील अशी अपेक्षा करतो.

***

..... इइइ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, फयान वादळामुळे आणि अवकाळी पडलेल्या पावसामुळे आलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये राज्यातील जनतेचे मोठ्या प्रमाणात जे नुकसान झालेले आहे त्याबाबत या ठिकाणी जी चर्चा सुरू आहे त्यात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते व्यक्त केलेली आहेत. या राज्यामध्ये वादळ आहे वा काही नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर त्यातून जी अनेक संकटे निर्माण त्यावर मात करण्यासाठी सरकार मार्फत वेगवेगळ्या उपाय योजना आखल्या जाऊन आपद्ग्रस्तांना मदत देण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र ती मदत पुरेशी ठरत नसल्याने तसेच दिलेल्या मदतीचा व्यवस्थित उपयोग न झाल्यामुळे आलेल्या संकटातून बाहेर पडणे मुष्कील होते. खोल समुद्रात गेलेले मच्छिमार लोक, त्यांना येणाऱ्या वादळाची वेळेवर माहिती वा सूचना न मिळाल्यामुळे वादळाच्या आपत्तीत सापडले आणि त्यातून अनेकांना जीव गमवावा लागला, अनेकांचे मोठ्ठे नुकसान झाले. अशाच प्रकारे आपल्या गावापासून, घरापासून कित्येकदा कुटुंबासह चरितार्थासाठी दूर गेल्यानंतर त्यांच्यावर जेव्हा अशी एखादी नैसर्गिक आपत्ती कोसळते तेव्हा त्या लोकांना देखील मदत दिली पाहिजे. दिलेल्या मदतीची माहिती त्यांना वेळेवर पोहोचविली पाहिजे. राज्यात जे कायम दुष्काळी भाग आहे, जेथे अजिबात पाऊस पडत नाही वा पुरेसाउ पाऊस पडत नाही अशा ठिकाणी काही शेतकरी डाळींब, कलिंगड, द्राक्ष यासारखी बागायती पिके घेण्याचा प्रयत्न करतात परंतु अवकाळी पावसामुळे त्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते व प्रसंगी त्यांचे सारे जीवनच उद्ध्वस्त होते त्यावर मात करण्यासाठी त्यांना तात्कालिक मदतीची गरज असते आणि सरकार देखील त्यांना मदत देऊ करते पण ती फारच तुटपुंजी असते. म्हणून कायम दुष्काळी भागामध्ये अशा अवकाळी पडणाऱ्या पावसामुळे आपत्ती आली तर त्या आपद्ग्रस्तांना मदत देण्यासाठी राज्य सरकारने उपाय योजना केली आहे. ज्याप्रमाणे मच्छिमार मच्छिमारी करण्यासाठी आपल्या घरापासून दूर खोल समुद्रात जातात तसेच आपले मेंढपाळ बांधव देखील आपल्या मेंढ्या घेऊन आपल्या घरापासून, गावापासून दूर जात असतात. अशा वेळी तेथे अवकाळी पाऊस येऊन रोगराई होते आणि त्यात त्यांच्या मेंढ्या मरतात. एकट्या नाशिक जिल्ह्यामध्ये अशा अवकाळी पावसामुळे मेंढपाळ बांधवांच्या 50 ते 60 हजार मेंढ्या मरण पावल्या आहेत. पण त्यांना त्याबद्दल कोठलीही मदत दिली गेलेली नाही. त्यांचा विमा नसल्याने त्याचे मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे त्यांची कुटुंबे उद्ध्वस्त झालेली आहेत. अशा

..... 3इ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ....

मेंढपाळांना शासनाकडून थोडीफार, अगदी तुटपुंजी अशी मदत दिली जाते. पण एका मेंढीची जेथे साडेतीन हजार रूपये किंमत आहे अशा हजारो मेंढ्या अशा नैसर्गिक आपत्तीत मरण पावल्या तर त्यातून येणारे नुकसानदेखील तितकेच मोठे असते हे सरकारने लक्षात घ्यावे. तेव्हा ज्या प्रकारे डाळिंब, द्राक्ष या सारख्या बागायती पिकांचे नैसर्गिक आपत्तीत नुकसान होते, तसेच नुकसान वादळासारख्या आपत्तीमुळे मच्छिमार बांधवाचे आणि मेंढपाळ बांधवांचे देखील होत असते. तेव्हा त्यांना देखील त्यावेळी भरपूर प्रमाणात मदत सरकारने करावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो. ...

(यानंतर श्री. सरफरे .... 3एफ 1 ...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

सभापती महोदय, माण तालुक्यातील म्हसवड गावामध्ये यात्रा भरते. त्या यात्रेला खूप गर्दी होते. त्याठिकाणी यात्रा सुरु असतांना कायम पाणी नसलेल्या नदीचे पात्र एकाएकी पाण्याने भरले. नदीला अचानक पूर आल्यामुळे जे लोक पाळण्यामध्ये बसलेले होते ते वाचले. आणि खालच्या भागामध्ये जी दुकाने थाटण्यात आली होती ती वाहून गेली, यात्रेमधील लोक वाहून गेले. आणि म्हणून अशा नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत वेगळया प्रकारचे नियोजन करावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या वतीने फयान चक्री वादळाच्या संदर्भात प्रस्ताव मांडण्यात आला आहे. आम्ही विरोधी पक्षाच्या वतीने नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. त्याबाबत आमची अपेक्षा होती की, एवढे मोठे संकट आले आहे त्यामध्ये लाखो शेतकरी सापडले आहेत. अशा संकटाच्या विषयावर सर्वप्रथम विरोधी पक्षाच्या वतीने चर्चा झाली पाहिजे अशी आमची मागणी होती. परंतु आज मंगळवारचा दिवस असल्यामुळे कामकाजाच्या पध्दतीप्रमाणे सत्ताधारी पक्षाच्या वतीने सभागहामध्ये प्रस्ताव देण्यात येत असतो. त्यानुसार सत्ताधारी पक्षाने या घटनेचे महत्व लक्षात घेऊन हा प्रस्ताव मांडला. याबाबतीत आमचे एवढेच म्हणणे होते की, सभागृहामध्ये कोणतेही कामकाज न होता या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिनंदनाच्या प्रस्तावाला प्राधान्य देऊन आपण तो प्रस्ताव मांडला. आणि त्यानंतर या चर्चेला सुरुवात झाली. मी मधल्या कालावधीत मोर्चामध्ये भाग घेण्याकरिता गेलो असल्यामुळे सभागृहात आल्यानंतर सुरुवातीपासून झालेल्या कामकाजाची माहिती घेतली. या चर्चेमध्ये दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांनी भाग घेतला. फयान वादळाच्या निमित्ताने ही संपूर्ण चर्चा कोकणाभोवती फिरली. ही गोष्ट खरी आहे की, या वादळामुळे कोकणचे फार मोठे नुकसान झाले आहे. कोकणातील मच्छिमार, छोटे शेतकरी, आंबा-नारळ-सुपारी किंवा चिकू इत्यादी फळबागा पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त झाले. अजूनही जवळपास 40 च्यावर मच्छिमार बेपत्ता आहेत. अशी भयानक परिस्थिती कोकणामध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे त्या भागामध्ये हा प्रश्न पूर्णपणे फिरला. ज्यावेळी कोकणामध्ये चक्री वादळ झाले, नैसर्गिक आपत्ती निर्माण झाली. त्या वादळाने संपूर्ण कोकणाला घेरले. त्या चक्री वादळाबरोबर राज्याच्या इतर भागामध्ये अवकाळी पाऊस आला. या अवकाळी पावसाने उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि जास्तीत जास्त विदर्भामध्ये मोठया प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले. माननीय मंत्री श्री. नारायण राणे साहेबांना सांगतो की, विदर्भाच्या पूर्व भागामध्ये भात पिकविला जातो.त्याठिकाणी सुरुवातीला पाऊस न आल्यामुळे दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे दुष्काळ जाहीर करावा अशी शेतकऱ्यांची मागणी होती, तो दुष्काळ जाहीर झाला नाही. परंतु 40 टक्के शेतकऱ्यांनी इकडून-तिकडून पाईपलाईनव्दारे पाणी आणले, विहिरीमधून, तलावामधून पाणी आणले व भाताची रोवणी केली. 60 टक्के शेतकरी दुष्काळामध्ये सापडला होता, आणि 40 टक्के शेतकऱ्याचा भात उभा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर...

राहिला होता. त्याने आपल्या शेतामध्ये मशागत केली, खत टाकले, जिल्हा सहकारी बँकेचे कर्ज घेतले आणि कसे तरी भात जगविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्या शेतकऱ्याला अस्मानी संकट येईल हे माहीत नव्हते. अशाप्रकारे दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यावर अचानकपणे 11 नोव्हेंबर रोजी चक्रीवादळाचे संकट आले. या वादळामुळे मुंबईमध्ये दोन-तीन दिवस पाऊस झाला असेल, परंतु पूर्व विदर्भामध्ये 11 ते 19 नोव्हेंबरपर्यंत आठ दिवस सतत पाऊस पडत होता

(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.वसंत पवार)

मी या भागामध्ये चार दिवसांचा दौरा केला. त्यावेळी येथील लोकांनी गेल्या सहा दिवसापासून आम्ही सूर्य पाहिलेला नाही असे मला सांगितले. इतका प्रचंड पाऊस झाल्यामुळे भात शेतीचे नुकसान झाले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

दुर्दैव असे आहे की, त्यावेळी भाताची कापणी करावयाची होती. तशी ती करुन जवळपास 50 ते 60 टक्के भात शेतामध्ये ठेवला होता आणि केवळ त्याची पेंढी बांधावयाची होती, त्याच वेळी धबाधबा पाऊस सुरु झाला. त्यामुळे भात गोळा करता आला नाही, पेंढया बांधता आल्या नाहीत. शेतामध्ये पाणी राहिले आणि संपूर्ण भाताचे पीक सडले. जो भात उभा होता, तो खराब झाला, डिस्-कलर्ड झाला आणि तोही पावसाच्या दणक्यामुळे खाली कोसळला आणि मातीमध्ये गेल्यामुळे त्याच्या ओंब्याला कोंब फुटले. मी काही शेतामध्ये गेलो तेव्हा भाताच्या पिकाला अतिशय घाणेरडा वास येत होता. त्यावेळी तेथील शेतकऱ्यांनी सांगितले की, साहेब, हे पीक नष्टच झाले आहे. पण आता आम्हाला नव्याने रोवणी करावयाची असेल तर बियाणे देखील उपलब्ध नाही. आज चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली अशा चार जिल्ह्यांमधील भात उत्पादक शेतकऱ्यांची अशी वाईट अवस्था झालेली आहे.मागच्या वेळी कर्ज काढले होते. नंतर बँकांनी कर्ज माफीच्या धोरणामुळे या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज दिले. आम्ही त्यांना विचारले की, तुम्हाला एकराला किती रुपये कर्ज मिळते ? त्यावर त्यांनी असे सांगितले की, एकराला 7 हजार रुपये मिळतात. मी माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणेसाहेबांना सांगू इच्छितो की, आपण हेक्टरला पाच हजार रुपयांची मदत जाहीर केली. आपण याचा हिशोब केला तर हेक्टरला दोन हजार रुपये मिळणार आहेत. पाच हजार रुपयांचे कर्ज घेतले आणि पीक वाहून गेले. अशा स्थितीत पुढे संसार कसा करावयाचा या चिंतेमध्ये शेतकरी आहे. शेतकऱ्याच्या उरावर कर्जाचा बोजा आहे. त्याच्याकडे नव्याने रोवणी करण्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. अशा स्थितीत तुम्ही त्याला एकराला दोन हजार रुपये देणार आहात. सध्या शेतकऱ्याकडे बियाणे उपलब्ध नाही. त्यामुळे त्याला नवीन बियाणे घ्यावे लागणार आहे. माननीय श्री.नारायण राणेसाहेब आपण महसूल मंत्री आहात. खरे म्हणजे आपल्याकडून फार मोठया अपेक्षा आहेत. आपण राज्याचा कारभार चालविलेला आहे. त्यामुळे आपल्याला जनतेची नाडी माहिती आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, यासंबंधातील निकष बदलावेत. आपण या शेतकऱ्याला उभे करणार आहोत की नाही ? आज शेतकरी संपूर्णपणे उद्ध्वस्त झालेला असून पुढे कसे जगावयाचे अशी त्याला चिंता लागलेली आहे. आज त्याची अशी स्थिती आहे की, त्याला बँक कर्ज देणार नाही, बाहेरुनही कर्ज मिळणार नाही. त्यामुळे त्याला शेती करता येणार नाही. अशा अवस्थेमध्ये त्याने कसे जगावयाचे असा प्रश्न आहे.कारण त्या भागामध्ये रोजगार हमी

. . . .3 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

योजनेअंतर्गत कामे देखील सुरु नाहीत. त्या भागामध्ये छोटे-छोटे शेतकरी आहेत, म्हणजे ज्यांच्या कडे एक एकर, दीड एकर, दोन एकर, तीन एकर जमीन आहे. मोठे शेतकरी फार कमी आहेत. खरे म्हणजे ते शेतकरी वजा मजूरच आहेत. आज अशी स्थिती आहे की, त्यांची शेती तर नष्टच झाली आहे, पण त्यांच्याकडे कोणतेही काम नाही. आज चारही जिल्ह्यांमध्ये रोजगार हमी योजनेची कामे सुरु आहेत काय, याबाबतीत माहिती घेतली असता असे समजले की, या भागातील रोजगार हमी योजनेची कामे बंद आहेत, म्हणजेच एका बाजूला त्याची शेती नष्ट झाली आणि दुसऱ्या बाजूला त्याच्याकडे काम नाही. मजुरांवर स्थलांतरीत होण्याची वेळ आली आहे अशी या जिल्ह्यांमध्ये स्थिती निर्माण झालेली आहे. अशा वेळी जर शासनाने निकष बदलले नाहीत तर मग या शेतकऱ्याची अवस्था भयंकर वाईट होणार आहे. म्हणून आम्ही काही मागण्या केल्या. पूर्व विदर्भातील भात उत्पादक शेतकऱ्यांचे पूर्णपणे नुकसान झाले आहे आणि पश्चिम विदर्भातील परिस्थिती यापेक्षा वेगळी आहे. काही ठिकाणी पावसामुळे कापसाचे पीक उभे राहिले, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथीसाहेब हे खानदेशातील आहेत. पण यावेळी तेथे कापसाच्या उत्पादनाचे ॲव्हरेज घटल आहे. एकराला पाच ते सहा क्वि.कापूस मिळत होता, पण आता कमी पावसामुळे तो एकरी एक ते दीड क्वि.तरी येईल की नाही अशी स्थिती निर्माण झालेली आहे.माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणेसाहेब, दुष्काळात तेरावा महिना म्हणतात, त्याप्रमाणे या शेतकऱ्यावर अस्मानी संकट आले. त्यावेळी धबाधबा पाऊस पडला आणि कापूसाची जी बोंडे फुटलेली होती, ती पूर्णपणे गळून मातीमध्ये गेली. मग लगेच त्याच्यावर रोगराई आली आणि आमच्या विदर्भामध्ये हा रोग लाल्या नावाने प्रसिध्द आहे. कापसाच्या पिकावर लाल्या नावाचा रोग आला आणि त्या पिकाची पूर्णपणे पांजळ झाली.त्या झाडांची बोंड गळली, फुले गळून पडली आणि आता शेतामध्ये फक्त काडी उभी आहे अशा प्रकारची कापूस उत्पादक शेतकऱ्याची अवस्था झालेली आहे. या शेतकऱ्याचा कोणी वाली नाही. त्याचे जे नुकसान झाले आहे, त्याबाबतीत पंचनामे करण्यासाठी कोणीही त्याच्या शेतामध्ये जात नाही. एका बाजूला कापसाचे नुकसान झाले आहे आणि दुसऱ्या बाजूला विदर्भ, खानदेश आणि आमच्या परिसरामध्ये सोयाबीनचे पीक येत आहे. आमच्या भागामध्ये सोयाबीनची प्रचंड प्रमाणावर लागवड झालेली आहे.पण कोणकोणत्या पध्दतीचे रोग येतात हे मला समजत नाही. सोयाबीनच्या पिकावर अळी पडली आणि त्या अळीचे नाव लष्कर अळी असे आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखी नोंद

श्री. पांडुरंग फुंडकर...

खरच ती अळी लष्करासारखीच दिसते. ही लष्करी अळी पडली तर सोयाबीनचे झाड संपूर्ण नष्ट होते फक्त त्या झाडाचा बुंधाच शिल्लक राहतो. अशा या लष्करी अळीचे आक्रमण सोयाबीनवर झाले त्यामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीनचे पीक गेले. कापसाचे पीक गेले. पाऊस इतका पडला की ज्वारी काळी झाली त्यामुळे ती घेण्यास कोणी तयार नाही, अशा अवस्थेत पश्चिम विदर्भातील शेतकरी आहेत. पूर्व विदर्भातील भात पिकविणाऱ्या शेतकऱ्याचे नुकसान झाले. इकडे कापूस उत्पादक शेतकऱ्याचे नुकसान झाले. आज कापूस उत्पादक शेतकऱ्याची शासनाने काय अवस्था केलेली आहे? शासनाने दिवाळीपर्यंत कापूस खरेदी केंद्रच सुरु केले नाहीत. त्यामुळे त्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आपला कापूस 2200 ते 2400 रुपयात व्यापाऱ्याला विकावा लागला.. शेतकऱ्याच्या शेतातील जो कापूस गोळा झाला तो सर्व कापूस व्यापाऱ्यांनी विकत घेतला. दिवाळीनंतर शासनाने कापूस खरेदी केंद्र सुरु केले आणि त्या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांना 2800 रुपये भाव दिला. खरे म्हणजे तो कापूस नाफेडने खरेदी करण्याचे ठरविले होते. कापूस पणन महासंघाला एजंट म्हणून नेमले होते. दुसरीकडे सीसीआय आले पण सीसीआयनेसुध्दा या भावाच्या पलीकडे न जाण्याचा निर्णय घेतल्यामुळे सीसीआयला आणि कापूस पणन महासंघाला एक बोडही कापूस मिळाला नाही. या राज्यामध्ये जेवढे कापूस खरेदी केंद्र सुरु झाले त्या कापूस खरेदी केंद्राच्या उद्घाटनाच्या दिवशी जेवढा कापूस आला तेवढाच कापूस आला.त्यानंतर कापूसा आला नाही. त्या सर्व कापसाची बेरीज केली तर संपूर्ण महाराष्ट्रात फक्त चार हजार क्वीन्टल कापूस त्या एकाच दिवशी आला. कापसाचे 14 झोन्स आहेत. परतू संपूर्ण महाराष्ट्रात फक्त चार हजार क्वीन्टल कापसाची खरेदी शासनाच्या खरेदी केंद्रावर झाली. वाहरे सरकार आणि आम्ही शेतकऱ्याचे कैवारी आहोत. सर्व कापूस व्यापाऱ्यांच्या घरात गेला. आता सीसीआयने परवा जाहीर केले की, आम्ही 3100 रुपये भाव देऊ. शेतकऱ्याच्या 70 टक्के, ते 80 टक्के कापसाची विक्री झाल्यानंतर शासनाने 3100 रुपये भाव देण्याचे जाहीर केलेले आहे. खऱ्या अर्थाने कापूस उत्पादक शेतकऱ्याला न्याय द्यावयाचा असेल तर व्यापाऱ्याबरोबर शासनाने स्पर्धेत उतरावे अशी आम्ही मागणी केली होती. एका बाजूला पणन महासंघाला स्पर्धेमध्ये उतरवावे दुसऱ्या बाजूला सीसीआयलाही उतरावे आणि तिसऱ्या बाजूला व्यापाऱ्यांनाही उतरु द्यावे मग या स्पर्धेमध्ये शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करावा. पण तसे घडले नाही. कापूस खरेदी केंद्र ओस पडलेली आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

व्यापारी कापसाची खरेदी करीत आहेत. या वर्षी शेतकऱ्यांच्या शेतात अतीशय कमी प्रमाणात कापसाचे उत्पादन झाले पण त्या कापसाला भाव मिळत नाही,अशी अवस्था आज या विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचीझालेली आहे. म्हणून माझी मागणी आहे की, कापूस उत्पादक शेतकऱ्याकडे जेवढा कापूस शिल्लक आहे तो कापूस घ्यावयाचा असेल तर पणन महासंघाला, नाफेडला आणि सीसीआयला स्पर्धेमध्ये उतरवले पाहिजे तरच या शेतकऱ्याला न्याय मिळू शकतो.

महोदय, मी कोकणातील मागण्यासंबंधी पुनरावृत्ती करणार नाही. विदर्भातील स्थिती मी सभागृहासमोर ठेवलेली आहे. भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर या ठिकाणी पिकांच्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण झालेले नाहीत. मी ज्या ज्या ठिकाणी भेटी दिल्या त्या त्या ठिकाणच्या तहसीलदाराला पंचनामे पूर्ण झाले आहेत काय? असे मी विचारले त्यावेळी पंचनामे चालू आहेत असे त्यांनी संगितले. तिन्ही ठिकाणच्या कलेक्टरला मी फोन केला तेव्हा त्यांनी पंचनाम्यांचे रिपोर्ट यावयाचे आहेत असे सांगितले. मला शासनाला सांगावयाचे आहे की, हे पंचनामे किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहेत? पंचनामे पूर्ण झाल्यानंतर निकष बदलण्याच्या दृष्टीकोनातून सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. राणे साहेबांनी एक बैठक घ्यावी, अशी माझी सूचना आहे. महागाईच्या काळात शेतकऱ्यांना देण्यात येणारी मदत पुरेशी आहे काय? डीएपी खताची एक पिशवी घेतली तर 550 रुपये द्यावे लागातात. आज एंड्रीनचा प्रती लिटर भाव 2000 रुपये आहे. इतका खर्च शेतीचा असताना एकरी दोन हजार रुपये या शेतकऱ्याला मदत देण्यात येत आहे. म्हणून आताचे निकष बदलण्याची आवश्यकता आहे. हे निकष बदलून नवीन निकषानुसार या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. जर ही मदत केली नाही तर आत्महत्या वाढणार आहेतच. अशा परिस्थितीत हा शेतकरी आता जगू शकणार नाही. या शासनाने पी.एम. पॅकेज, सी.एम पॅकेज आणले. निवडणुका झाल्यानंतर पुन्हा मुख्यमंत्र्यांचे नवीन पॅकेज आणले. नवीन पॅकेज आल्यानंतर विदर्भातील जवळ जवळ 55 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. याचे कारण काय? शासन याच्या मुळाशी जाणार आहे काय? शेतकऱ्यावर आलेल्या परिस्थितीचे शासनाने नीट विश्लेषण केले नाही, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी नीटपणे धावून गेलो नाही तर पुढच्या कालखंडात आजच्या या अधिवेशनापासून मार्चपर्यंत हा आकडा किती तरी पटीने वाढलेला दिसणार आहे इतकी भयानक परिस्थिती या विदर्भाची आणि या पूर्ण उत्तर महाराष्ट्राची, पश्चिम महाराष्ट्राची या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

अवकाळी पावसामुळे झालेली आहे. म्हणून मी या ठिकाणी काही मागण्या करणार आहे. या अवकाळी पावसामध्ये आणि या फयानमध्ये सापडलेल्या किमान विदर्भातील आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे किती दिवसात शासन करणार आहे?

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

लवकरात लवकर पंचनामे करुन आपण त्यांना मदत देणार की नाही ? शासनाने हेक्टरी 5 हजार रुपये मदत जाहीर केलेली आहे पण आपण दोनच हेक्टरचा निकष लावलेला आहे. हे निकष आपण कोठून आणता ? परमेश्वर दोन हेक्टरवाल्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये अतिवृष्टी करतो आणि 10 एकरवाल्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये अतिवृष्टी करीत नाही काय ? हे काही मोठे शेतकरी नाहीत. त्यामुळे आपण 2 हेक्टरचा निकष बदलला पाहिजे. खऱ्या अर्थाने हे शेतकऱ्यांचे राज्य असेल तर ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल मग तो 2 एकरवाला शेतकरी असो किंवा 10 एकरवाला शेतकरी असो त्यांना सरसकट मदत केली पाहिजे. या मदतीचे निकष बदलले पाहिजे. माननीय मंत्रिमहोदय श्री. राणे साहेब, आपल्याला माहीत आहे. कधी कधी हसावे की रडावे हे कळत नाही. आपले पुनर्वसन खात्याचे सचिव पाहणी दौऱ्यावर गेले. माझ्याकडे वर्तमानपत्राचे कात्रण आहे. त्या सचिवांनी भात पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना विचारले की, आपण पावसाच्या आधी भात का कापला नाही आणि कापून तो घरात का ठेवला नाही. शेतकऱ्यांना जर एवढे ज्ञान असते तर शेतकऱ्यांनी आपल्याला कोणतीही मदत मागितली नसती. त्या सचिवांची आपण दखल घ्यावी. त्यांना आपण प्रत्यक्षात जमिनीवर आणले पाहिजे. त्यांनी फियानच्या संदर्भात हवाईदौरा केला. त्यांना शेतकऱ्यांचे दु:ख समजणार नाही. शासनाने 5 हजार रुपयांचा निकष बदलला पाहिजे. 5 हजार रुपयांच्या मदतीने शेतकरी जिवंत राहणार नाही. आपण योग्य मदत केली नाही तर विदर्भातील आत्महत्या वाढल्याशिवाय राहणार नाही. शेतकऱ्यांना हेक्टरी किमान 20 हजार रुपयांची मदत केली पाहिजे. त्याला नव्याने उभे करावयाचे असेल तर हेक्टरला 20 हजार रुपयांची मदत केली पाहिजे. या वर्षी त्यांनी जे कर्ज काढले त्याबाबत त्यांनी काय गुन्हा केला ? त्यांनी कर्ज काढले पण परमेश्वर कोपला. परमेश्वर कोपला पण आपण कोपू नका. या रयतेला जगविण्याची शासनाची जबाबदारी आहे. परमेश्वर कोपला तसे तुम्ही कोपू नका. या वर्षी शेतकऱ्यांनी जे कर्ज काढले ते निसर्गाने संपविले म्हणून त्यांचे या वर्षीचे कर्ज माफ करावे. त्यांना नवीन कर्ज द्यावे. आपल्या जाहीरनाम्यामध्येशेतकऱ्यांना 3 टक्के दराने नवीन कर्ज देऊ, त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

शेतकऱ्यांच्या हाताला काम नाही. त्यांच्या हाताला काम देण्यासाठी ताबडतोबीने आदेश काढावेत. त्या ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांना सांगावे की, रोजगार हमीची कामे सुरु झाली पाहिजेत आणि त्या कामावर जाणाऱ्या मजुरांना 35 किलो धान्य ताबडतोबीने दिले पाहिजे. याबाबत तातडीने आदेश काढावेत. या सर्व गोष्टींची तातडीने अंमलबजावणी झाली पाहिजे. फियान 11 तारखेला आले. मंत्रिमंडळाचा शपथविधी 7 तारखेला झाला. त्यानंतर खातेवाटप झाले. 22 तारखेपासून 7 तारखेपर्यंत हा महाराष्ट्र विनासरकारचा होता. 22 तारखेला निकाल लागले आणि 8 तारखेला मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. अजूनही जिल्ह्यांना पालकमंत्री नाहीत. कोण कोणत्या जिल्ह्यात जाणार, कोण कोणत्या जिल्ह्यांना आदेश देणार, वाटपाची, पंचनाम्याची जबाबदारी कोण घेणार याचा पत्ता नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, इतक्या कोटी रुपयांची मदत करु. केंद्राकडे हा रिपोर्ट पाठविलेला आहे. केंद्रीय कृषी मंत्र्यांनी घोषणा केली की, फयानमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी 671 कोटी रुपये पाठवू. केंद्र शासनाचे पैसे आले का ? असेच जर चालू राहिले तर अंमलबजावणी होणार नाही. थातुरमातुर अंमलबजावणी करुन चालणार नाही. या अस्मानी संकटामध्ये सापडलेले या राज्यातील जे शेतकरी आहेत त्यांना तातडीने मदत देण्याची गरज आहे. मला माननीय मंत्रिमहोदयांकडून अपेक्षा आहेत. आपण मुख्यमंत्री असताना ज्या पध्दतीने राज्य चालविले त्या पध्दतीने या खात्याचा कारभार चालवावा आणि या संकटामध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना ताबडतोबीने मदत करावी. एवढे सांगून मी माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी विधान परिषद नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहामध्ये मांडलेला आहे त्या प्रस्तावावर या सभागृहातील जवळपास 17 मान्यवर सदस्यांनी आपले विचार ठेवलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी या प्रस्तावावर आपल्या भावना व्यक्त केल्या, फयान चक्री वादळाबद्दल आपले विचार व्यक्त केलेले आहेत. या प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी फयान चक्री वादळ, अतिवृष्टी आणि अवेळी पडलेला पाऊस, त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी कसा अडचणीमध्ये सापडला आहे या विषयांचा संदर्भ देऊन शेवटी भाषण केले आहे. या चर्चेला उत्तर देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, चक्रीवादळ ही नैसर्गिक आपत्ती आहे. नैसर्गिक आपत्ती हा राजकीय विषय असू शकत नाही, या विषयामध्ये राजकारण करणे उचित होणार नाही असे माझे मत आहे. ज्यांनी ते केले त्याबद्दल माझी तक्रार नाही. परंतु अशा विषयात राजकारण असू नये असे मला वाटते. चक्रीवादळाला कोणी आमंत्रण दिले नव्हते. या देशाने, राज्याने अनेक वेळा नैसर्गिक आपत्ती अनुभवली आहे. या देशावर नैसर्गिक आपत्तीच्या रुपाने संकट येते तेव्हा देशातील विविध राजकीय पक्षांनी जात, धर्म बाजूला ठेवून एकजुटीने त्या संकटावर मात करण्याच्या संदर्भात, संकटात सापडलेल्यांना आधार देण्यासाठी एकत्र येणे गरजेचे असते असेच मला वाटते. सरकार त्याचा एक भाग असतो. सरकार आणि विरोधी पक्ष हया एका नाण्याच्या दोन बाजू असतात. त्यामुळे दोघांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या एकच असतात. या राज्यातील जनतेला आधार देऊन या संकटातून बाहेर काढणे हे लोकशाहीने दिलेले कर्तव्य व अधिकार आहे असे आमच्या विरोधी पक्षातील मान्यवरांकडून सरकारला अभिप्रेत होते. सकाळी सभागृहाची बैठक सुरु झाली त्यावेळी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन फयानवर लगेच चर्चा करावी असा आग्रह धरण्यात आला होता. परंतु त्यावेळचा जोश आणि आता चर्चा झाली त्यावेळी तो जोश सभागृहातील उपस्थितीवरुन कोठे दिसला नाही, उपस्थितीला अवकळा आलेली दिसली. ही अवकळा कशामुळे आली ते समजले नाही, कदाचित विधानसभेच्या निवडणुकीनंतर जो निकाल लागला त्याच्यावरुन असे झाले असावे असे मला वाटते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.नारायण राणे....

सभापती महोदय, फयान चक्रीवादळामुळे वित्तीय हानी झाली आहे, काही लोक मृत्यूमुखी पडलेले आहेत त्यांना सरकारने वा-यावर सोडले आहे असे दाखविण्याचा प्रयत्न आपणा सर्वांकडून करण्यात आला तो योग्य की अयोग्य याचा विचार होणे आवश्यक आहे. हा प्रयत्न चुकीचा आहे असे मी म्हणणार नाही. भाषण करीत असताना वस्तुस्थिती मांडणे आवश्यक आहे, केवळ वृत्तपत्राच्या कात्रणाच्या आधारावर बोलले जाते, त्यातील वस्तुस्थिती किती खरी आहे, त्याचा एखादा पुरावा आपण देऊ शकतो का ही खरी बातमी आहे. जणू काही सरकारने या आपद्ग्रस्तांना मदत दिली नाही, नुकसानीचे पंचनामे केले नाही असे दाखविण्याचा प्रयत्न झाला तेथे राजकारणाचा वास येतो असे मला वाटते, परंतु तसे असू नये. वास्तविक विरोधी पक्षाकडून सरकारला मार्गदर्शक सूचना पाहिजे. त्यावर विचार करुनच सरकार महाराष्ट्रातील जनतेला या संकटातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करणार आहे. शासनाने या लोकांना दिलेली मदत पुरेशी आहे असा शासनाने दावा केलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे. शासनाने बोटीच्या नुकसानीसाठी जाहीर केलेली, जाळ्यांसाठी जाहीर केलेली, झाडांसाठी जाहीर केलेली, पिकांच्या नुकसानीसाठी जाहीर केलेली, द्राक्ष, धान, कापूस, सोयाबीन यासाठी दिलेली मदत पुरेशी आहे असे माझे म्हणणे नाही.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी

(श्री. नारायण राणे...

जगाच्या पाठीवर अनेक ठिकाणी नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर जेवढे नुकसान होते तेवढी नुकसान भरपाई कोणत्या शासनाने दिलेली असेल तर त्याचे नाव मला एका तरी सन्माननीय सदस्यांनी उभे राहून सांगावे. हजार कोटीचे नुकसान झाले असेल तर हजार कोटी रुपयाची नुकसान भरपाई दिल्याचे उदाहरण कोठे आहे काय ? मोठे मोठे पुढारलेले, विकसित झालेले देश देखील अशा नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी कर्ज देतात, मदत देत नाहीत. व्हिएतनाममध्ये अनेक नैसर्गिक आपत्तीच्या घटना घडल्या. व्हिएतनाम उद्ध्वस्त झाले. त्याठिकाणी आपदग्रस्तांना बिनव्याजी, अल्पमुदतीने कर्ज दिले, परंतु मदत दिली नाही. आपण फयानग्रस्तांना मदत देत आहोत. मला मान्यवर सदस्यांना हे सांगायचे आहे की, ही मदत महाराष्ट्र सरकारची आहे, म्हणजे ही तुमची मदत नाही काय ? ही मदत मंत्री आपल्या खिशातून देतात काय ? महाराष्ट्राच्या तिजोरीतून ही मदत केली जाते. महाराष्ट्राच्या तिजोरीमध्ये विविध कराच्या रुपाने निधी जमा होतो, तसेच केन्द्र शासन देखील करातील काही भाग राज्याला देत असते आणि तो निधी राज्याच्या तिजोरीमध्ये जमा होत असतो. या निधीमधून आपण आपद्ग्रस्तांना मदत देत असतो. मला एका तरी सन्माननीय सदस्यांनी अशी माहिती द्यावी की, आपल्या रिसोर्सेचे जेवढे उत्पन्न आहे तेवढे ते आपण नैसर्गिक आपत्तीसाठी मदत म्हणून दिले तर आपला कारभार, आपली विकासाची कामे, नॉनप्लॅनची कामे, सरकारी कर्मचा-यांचे पगार ह्या गोष्टी कोठून करणार ? विरोधी पक्षातील सदस्य देखील सत्तेमध्ये होते, त्यांनीही सत्तेची चव अनुभवलेली आहे. पैशाचा विनियोग कसा केला जातो हे देखील त्यांना चांगले माहीत आहे. घर चालवणे आणि सरकार चालवणे ही एकच गोष्ट आहे. उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ धालावा लागतो. कोणी सांगतो 25 हजार रु. मदत द्या, तर कोणी सांगतो साडेपाच लाख द्या, कोणी सांगतो हेक्टरी 1 लाख द्या. सभापती महोदय, सूचना व्यवहार्य असल्या तर त्या स्वीकारार्ह असतात. पण मी एवढेच सांगू इच्छितो की, या फयान चक्रीवादळाबाबत कोणी राजकारण करु नये. तुम्ही, आम्ही मिळून या चक्रीवादळात सापडलेला महाराष्ट्रातील शेतकरी असो, मच्छिमार असो, फळबागायतदार असो त्याला त्यातून बाहेर काढून तो पूर्ववत आपले जीवन जगू शकेल अशी परिस्थिती आपण निर्माण करु या. आपण केलेले मार्गदर्शन आम्ही नक्कीच स्वीकारु. जेवढे शक्य आहे तेवढे देण्याचा प्रयत्न करु. मच्छिमार, शेतकरी, फळबागायतदार हे आमच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. हे आमच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नारायण राणे...

राज्याचे नागरिक आहेत, त्यांच्यासाठी हे सरकार आहे, त्यांच्यासाठी हे राज्य आहे असे मानणा-यांपैकी आम्ही आहोत. फयानची माहिती आमच्या अधिका-यांनी खालपर्यन्त पोहोचविली नाही अशा प्रकारची तक्रार अनेक माननीय सदस्यांनी केली. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. भारत सरकारच्या हवामान खात्याने सोमवार दिनांक 9 नोव्हेंबर 2009 रोजी अरबी समुद्रात तीव्र कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याचा इशारा दिला. ही माहिती मिळताच कोकण किनारपट्टीत येणा-या सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिका-यांना आम्ही याबाबतची माहिती दिली. एवढेच नाही तर महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण हे कोकणातील अनेक जिल्हाधिका-यांशी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे आमच्या समक्ष बोलले. या चक्रीवादळाच्या संबंधाने कोणती तयारी केलेली आहे, कोणती काळजी घेतलेली आहे, याची माहिती ते घेत होते. हे चक्रीवादळ ज्या पट्टयातून जाणार होते त्याठिकाणी चांगली व्यवस्था ठेवण्याचा आम्ही प्रयत्न केला आणि त्यासाठी शासनाची महसूल, पोलीस आणि अन्य सर्व यंत्रणा कार्यान्वित होती. काही सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, आपण जर काळजी घेतली असती तर हे संकट ओढवले नसते. चक्रीवादळाचा वेग ताशी 45 कि.मी.पेक्षा अधिक होता. हे चक्रीवादळ 70 ते 75 कि.मी. वेगाने जाईल याची कल्पना आम्ही लोकांना दिली होती. घरावर पत्रे असतील तर ते सांभाळा असे लोकांना सांगितले होते. आता पत्रे धरुन कसे ठेवता येतील ? काही पत्रे उडाले. कमीत कमी नुकसान व्हायचे तेवढे झाले. हे फयान चक्रीवादळ ज्या ठाण्याच्या दिशेने जाणार होते त्या ठाण्याची आपण किती काळजी घेतली ! या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आपत्कालीन पथकाचा उल्लेख केला. ठाणे किनारपट्टी आणि परिसराची काळजी घेण्यासाठी आम्ही 50 टक्के पथक तातडीने ठाण्याला हलवले.

....नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत/शुद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.....

सभापती महोदय, कुठेही प्रशासनाने कमी केले असे मला म्हणावयाचे नाही, 100 टक्के आम्ही यशस्वी झालो असा आम्ही दावा करु इच्छित नाही. परंतु जेवढे प्रयत्न करावयाचे ते आम्ही केले. दुसऱ्या दिवशी 10 नोव्हेंबर रोजी जॉईंट टायफून वॉर्निंग सेंटरने कमी दाबाच्या पट्ट्यामध्ये रुपांतर होत असल्याचा इशारा दिला आणि चक्रीवादळाचे फयानमध्ये रुपांतर केले. कोणीतरी विचारले की, फयान हे नामांतर कोणी केले? 'फयान' हा ब्रम्हदेशातील शब्द आहे. चेरीच्या झाडावरुन जेव्हा फळे खाली पडतात त्याला फयान म्हणतात. आशियातील समुद्र किनाऱ्यावरील देशांनी 2000 साली असे ठरविले की, प्रत्येक देशाने त्या देशात चक्रीवादळ येण्यापूर्वी एखादे नाव निश्चित करावे. त्याप्रमाणे वादळ येत असल्यास नाव ठेवले जाते. ब्रम्हदेशाने हे नाव ठेवले म्हणून चक्रीवादळ येण्याचे निश्चित झाले तेव्हा 'फयान चक्रीवादळ' असा उल्लेख करण्यात आला. फयान चक्रीवादळ 12 नोव्हेंबर रोजी सकाळी डहाणू आणि महुआच्या किनारी भागावर जाईल असा सुरुवातीला अंदाज होता. नंतर सुधारणा करण्यात आली आणि फयान चक्रीवादळ 11 नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता अलिबाग ते पालघर या किनारपट्टीवरुन जाणार असा इशारा देण्यात आला. ही सूचना आम्ही प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना आणि संबंधित अधिकाऱ्यांना दिली. फयानच्या इशाऱ्यामुळे ताशी 45 ते 70 कि.मी.वा त्यापेक्षा अधिक वेगाने वारे वाहतील, दोन मीटरपेक्षा अधिक ऊंचीच्या लाटा समुद्रामध्ये निर्माण होतील, याचा परिणाम बैठ्या कौलारु घरांवर होईल. सखल भागात पाणी शिरेल असा इशारा समुद्र किनाऱ्याच्या व आजूबाजूच्या भागांना तद्वत मुंबईच्या परिसरात देण्यात आला होता. फयान चक्रीवादळाच्या विषयी 11 नोव्हेंबर रोजी थोडासा बदल करण्यात आला. ही सूचना प्राप्त झाल्यानंतर सिंधुदुर्ग आणि ठाणे जिल्हयामध्ये किनारपट्टीवर फयान वादळाने तडाखा दिला आणि अशी माहिती देण्यात आली की, फयान चक्रीवादळाचा जोर मंदावला आणि गुजराथमध्ये जाऊन चक्रीवादळ संपुष्टात आले. ही माहिती त्यावेळेला आम्ही त्या भागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिली होती. काही चॅनल्स, मिडिया हे सर्व टी.व्ही.वर दाखवित होते. परंतु सरकारने ही माहिती ज्या ज्या माध्यमातून शक्य आहे त्या माध्यमातून दिलेली आहे. मी स्वत: माझ्या विभागाच्या सचिवांना सोबत घेऊन ही माहिती या या ठिकाणी द्यावी म्हणून सांगितले आणि मी स्वत: मॉनिटरिंग करीत होतो. मंत्रालयामध्ये ज्याठिकाणी शासनाने डिझास्टर मॅनेजमेंट प्लॅनचे कार्यालय आहे त्याठिकाणाहून कंट्रोलिंग करुन आम्ही सर्व माहिती देण्याचे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.....

काम करीत होतो. ही माहिती देऊनही अनेक शंका याठिकाणी मांडण्यात आल्या. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्सची दोन पथके राखून ठेवण्यात आली. डिझास्टर रिडक्शन मॅनेजमेंट प्रोग्रॅम हा आता डिसास्टर रिडक्शन प्रोग्रॅम या नावाने डिसेंबर 2010 पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय युएनडीपीने घेतला आहे ही माहिती मी सभागृहाला देऊ इच्छितो. या प्रस्तावावर बोलत असताना सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी वृत्तपत्रातील बातम्यांच्या आधारे काही मुद्दे याठिकाणी मांडले. ते स्वत: सिंधुदुर्ग जिल्हयातील आहेत. मच्छिमारांच्या प्रश्नाबद्दल त्यांना चांगली माहिती आहे. परंतु मच्छिमारांना फयान चक्रीवादळामुळे नुकसान होऊनही काहीच मदत मिळाली नाही असे त्यांनी सांगितले. ज्यांनी ज्यांनी कोकणातील मच्छिमारांचे प्रश्न उपस्थित केले त्या सर्व सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी स्वत: 13 नोव्हेंबर रोजी चक्रीवादळ चालू असताना वेंगुर्ल्यापासून संपूर्ण समुद्र किनारपट्टीच्या भागाला भेट दिली. मी हेलिकॉप्टरद्वारे पाहणी केली नाही. पायी फिरुन पाहणी केली. अंगात ताप असतानाही मी तेथे फिरलो. त्या भागातील माझ्या मच्छिमार बांधवांची काय अवस्था झाली आहे, त्यांची जाळी वाहून गेली, बोटी तुटल्या ती सर्व परिस्थिती मी डोळ्यांनी पाहिली आहे.

(नंतर श्री.खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे .....

मी ताबडतोब मिडियाला गोळा करुन आम्ही चिखलात फिरलो अशा प्रकारे दाखविण्याचे काम केले नाही, फक्त फिरलो आणि माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांना बोललो की अमुक इतके नुकसान कोकणात झालेले आहे. झालेल्या नुकसानीचे पंचनामे करायला सुरुवात केली. त्याचप्रमाणे मी सांगू इच्छितो की, राज्यातील फळबागा व अन्य पिकांचेही पंचनामे पूर्ण झालेले आहेत. फक्त भंडारा जिल्ह्यातील काही भागातील पंचनामे बाकी आहेत आणि बीडमधील लोकांनी पुन्हा पंचनामे करण्याची मागणी केली. त्यासाठी अजून परवानगी दिलेली नाही परंतु हे दोन जिल्ह्यातील काही भाग वगळता उर्वरित राज्यातील पंचनामे पूर्ण झालेले आहेत आणि जर राहिले असतील तर आपण नजरेस आणून द्यावेत. केवळ कायद्यावरच बोट न ठेवता शासन ते सुध्दा पूर्ण करील. मच्छिमारांचे पंचनामे करीत असताना कोणी सांगत होते की माझे जाळे 5 हजाराचे होते कोणी 10 हजाराचे तर कोणी 1.50 लाखाचे तर कोणी 10 लाखाचे जाळे असल्याचे सांगत होते. सभागृहात ज्यांना मच्छिमारी फक्त मासे खाण्यापुरतीच माहिती आहे असे लोक मात्र अशा आविर्भावात सांगत होते की, ते दररोज मच्छिमारीसाठी जातात व त्याचेच मला आश्चर्य वाटले. मच्छिमारी ही वेगवेगळ्या प्रकारे केली जाते काही प्रकारामध्ये 25-50 लोक जाळी खेचतात त्या जाळ्याची किमत 2 लाखापर्यंत असते, त्यानंतर यामाहावरुन मच्छिमारी होते फायबर बोटीचा वापर करुन तर काही छोट्या बोटी, ट्रॉलर्सचा वापर करुन मच्छिमारी करतात. त्या पात्याची किंमत 1.20 लाख रुपये इतकी असते. अशा पात्यांचे नुकसान झालेल्यांना आपण 50 हजारापर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यात शासनाकडून 50 टक्के रक्कम 50 टक्के रक्कम जिल्हा बँकेकडून 5-6 टक्के दराने कर्ज देण्याच्या सूचना दिल्या आहेत. छोट्या बोटीवाल्यांना 10 हजाराची मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. अर्थात त्यात काही लोक वापरत असलेले जाळे 5-6 हजाराचेच असतात त्यांनाही आपण 10 हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करुन किमान 10 हजार रुपये मदत आपल्याला दिलीच पाहिजे असे सांगितले. त्यानुसार किमान 10 हजारापासून 50 हजारापर्यंतची मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. काही ट्रालर्स गाळात रुतून बसलेले आहेत व त्यांना बाहेर काढण्यासाठीच एक-दोन लाख खर्च येतो. या ट्रॉलर्सची किंमत मात्र 18 ते 20 लाखापर्यंत

.2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे .....

असते आणि त्यांच्या दुरुस्तीसाठी 2-2 लाख एवढा खर्च येतो, त्याप्रमाणे शासनाने 2-2 लाख रुपये मंजूर केले. विरोधी पक्षाकडून सांगण्यात आले की, ही रक्कम त्यांच्यापर्यंत पोहचली नाही. त्यांना व्हॅटच्या पावत्या मागण्यात आल्या. शेवटी हा सरकारी पैसा आहे त्याचे वाटप करताना थोडे काही तरी पहावे लागणारच. जे मच्छिमारी करतात त्यांच्याकडे व्हॅटच्या पावत्या मागितल्या नाहीत परंतु ते मच्छिमारी करीत असल्याचा पुरावा म्हणून एखाद्या संघाने जरी लिहून दिले की, हा मच्छिमारी करीत होता तरी देखील शासनाने मदत मंजूर केलेली आहे. कारण मच्छिमारीसंबंधी किंवा मदतीसंबंधीचा जी.आर. वाचून मी स्वत: या सूचना दिलेल्या आहेत. आपण देखील सरकारामध्ये होता त्यावेळेस मी महसूल मंत्रीच होतो. त्यावेळेस तर आपण 1 हजारापेक्षा जास्त मदत दिलेली नाही. आता आम्ही भात शेतीला 5 हजार रुपये मदत देतो. मी दावा करीत नाही की ही रक्कम पुरेशी नाही पण चांगल्याला चांगले म्हणणे हा माणुसकीचा धर्म आहे. आपण सांगितले की, आमच्या सरकारच्या काळात यापेक्षा जास्त मदत दिलेली आहे हे दाखवून दिले तर अजूनही मदत देऊ. अशा प्रकारे 100 कोटीपैकी 65 कोटी रुपये मच्छिमारांसाठी कोकणात पाठविले...

यानंतर श्री जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ....

आता आपदग्रस्तांना नुकसानभरपाई देण्याच्या कामाला सुरुवात केली जाईल. बोटीचे नुकसान झाले असेल किंवा बोट वाहून गेली असेल तर त्वरित नुकसानभरपाई दिली पाहिजे हे कसे काय शक्य आहे ? शेवटी हे सर्व पैसे शासकीय आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले की, ज्या बोटी समुद्रात गेल्या होत्या त्यांना फयान वादळ येणार आहे यासंदर्भात महसूल विभागाने काहीही कळविले नाही. सभापती महोदय, शासनाला फयान वादळाच्या संदर्भात माहिती मिळाल्यानंतर काही बोटी 9 तारखेला समुद्रात गेल्या होत्या. मी काल एका गस्ती नौकेचे उद्घाटन केले ,त्या बोटीची गती 35 नॉटीकल माईल आहे. ट्रॉलरची क्षमता 12 नॉटीकल माईल पर्यंतची असते परंतु हे ट्रॉलर मच्छिमारीसाठी 30-30 नॉटीकल माईल पर्यंत समुद्रात जातात. ठरावीक अंतरावर गेल्यावर मोबाईला रेंज मिळत नाही, त्यांच्याशी कसलाही संपर्क होऊ शकत नाही. ज्या बोटी समुद्रात गेल्या होत्या त्यांचे आम्ही फोन नंबर कलेक्ट करुन त्यांच्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. चक्रीवादळामुळे ज्या लाटा तयार झाल्या त्यामुळे हे ट्रॉलरवाले कोठल्या कोठे फेकले गेले. रत्नागिरी येथे त्या ठिकाणच्या मच्छिमारांना काही बोटी दिसून आल्या. हे लोक डीप फिशींगसाठी गेले नव्हते परंतु या बोटी अशा ठिकाणी थांबल्या की, त्या बोटी कोणाच्याच दृष्टीस पडू शकत नव्हत्या. विमानाने तसेच नेव्हीच्या माध्यमातून या बोटींचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु त्यामध्ये आम्हाला यश आले नाही. परंतु नेमकी मच्छिमारी करणा-या बोटीला त्यातील एक बोट दिसली. या बोटीमधील डीझेल संपल्यामुळे ही बोट बंद पडली होती. त्यामुळे डीझेल घेऊन गेल्यावर या बोटीला परत आणण्यात आले. परंतु सरकारी अधिका-यांनी काहीच काम केले नाही असे म्हणणे योग्य होणार नाही. या ठिकाणी सांगण्यात आले की, 34 मच्छिमार बेपत्ता आहे त्यासंदर्भात शासनाने काहीच केले नाही, सात सात वर्षे या लोकांनी वर्षे थांबायचे का ? परंतु आम्ही सात सात वर्षे थांबायला सांगितले आहे काय ? परंतु यासंदर्भात किमान आपल्याला एक महिना तरी थांबावेच लागेल. वाटले तर यासंदर्भातील कालावधी कमी करण्याच्या संदर्भात मंत्रिमंडळाच्या समिती समोर चर्चा करुन मुदत कमी करण्याचा प्रयत्न करु. ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे.....

शासन निश्चितपणे मदत करेल परंतु ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांनी काही तरी पुरावे दिलेच पाहिजेत. सात वर्षाच्या कालावधीच्या संदर्भातील नियम हा केंद्र सरकारचा आहे त्यामधील कालावधी आपण कमी करण्याचा प्रयत्न करु. महिन्याभरात या लोकांना आपण पैसे उपलब्ध करुन देऊ. परंतु पैसे देण्याच्या अगोदर तपास तरी पूर्ण झाला पाहिजे की, नाही ? तपास न करता आपण पैसे कसे काय उपलब्ध करुन देऊ शकू ? आपण थोडया दिवसातच ज्या मच्छिमारांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई देऊ. दंगलीत मृत झालेल्यांना 1 लाख दिले, दोन लाख दिले असे आपण म्हणता परंतु आम्ही मोठया ट्रॉलरचे नुकसान झालेले आहे त्यांना शासनाने दोन लाख रुपये दिले आहे. ही मदत काही अंतिम नाही. नुकसान ग्रस्तांना मदत वाढवून देण्याच्या यासंदर्भात शासन निश्चितपणे विचार करेल. शासनाने अजून मदत देण्याचे नाकारलेले नाही. अजून किती मदत वाढूवन दिली पाहिजे यासंदर्भात देखील शासन विचार करेल. माणुसकीच्या धर्मातून हे सरकार शेतक-यांकडे आणि मच्छिमारांकडे पाहील, यामध्ये सरकार कोणत्याही प्रकारचे राजकारण करणार नाही. कोणत्या पक्षाचा मच्छिमार आहे, कोणत्या पक्षाचा शेतकरी आहे, झाड कोणत्या पक्षाच्या माणसाचे पडलेले आहे हे आम्ही कधीही पाहिलेले नाही. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या ठिकाणच्या मच्छिमारांचे जीवन पूर्ववत करण्यासाठी, त्यांचा व्यवसाय पुर्ववत होण्यासाठी सरकार सर्वतोपरीने मदत करेल. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी तरी विरोधी पक्षाने केवळ टीका करण्याचे काम तरी करु नये. या नैसर्गिक संकटाला एकत्र येऊन तोंड दिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी साहेबांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला समाधान वाटेल अशी मदत शासनातर्फे दिली जाईल व मच्छिमारांचे जीवन पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला जाईल यावर सभागृहाने विश्वास ठेवावा. मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना 15 दिवसापर्यंत मदत देण्याचा आमचा निश्चितपणे प्रयत्न राहणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी उल्लेख केला की, सरकार नुकसानग्रस्तांना तुटपुंजी मदत करीत आहे. परंतु मी आता जो काही उल्लेख केलेला आहे त्यामुळे त्यांचे समाधान झाले असेल असे मी समजतो. या ठिकाणी 35 मि.मी. तसेच 65 मि.मी.पाऊस झाल्याचे उदारहण त्यांनी दिले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे.....

तसेच आपण पूर्व विदर्भातील धानाच्या पिकाच्या संदर्भात देखील मुद्दा उपस्थित केलेला आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा सुरु आहे. धानाच्या पिकामध्ये अट ठेवावी की, काढावी याबद्दल चर्चा सुरु असून यामध्ये शासनावर एकूण किती बोजा पडेल याबद्दलही चर्चा सुरु आहे. उद्यापर्यंत यासंदर्भातील निर्णय घेऊ. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, धानाचे एकूण क्षेत्र किती आहे याची आकडेवारी मी आपल्याला देऊ इच्छितो. 65 मि.मी. पेक्षा जास्त पाऊस असलेले क्षेत्र 3,73,658 हेक्टर असून,

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

65 मि.मि.पेक्षा कमी पाऊस पडलेले आणि नुकसान झालेले क्षेत्र 4 लाख 50 हजार 439 हेक्टर्स एवढें आहे. अशा प्रकारे एकूण 8 लाख 24 हजार 88 हेक्टर्स एवढया क्षेत्रातील शेतक-यांच्या शेतीचे नुकसान झालेले आहे. या शेतक-यांना मदत मिळावी यासाठी आपण मागणी करीत आहात असे मी म्हणत नाही कारण हे सर्व शेतकरी अडचणीमध्ये आहेत हे शासनाला ज्ञात आहे, चांगले माहीत आहे.या शेतक-यांना मदत करीत असतांना काही प्रथा ,परंपरा विचारात घेतल्या पाहिजेत त्याचबरोबर भविष्यात सरकार चालवावयाचे आहे याचा देखील विचार केला पाहिजे .आपले सरकार सत्तेवर असतांना आपण शेतक-यांना किती मदत दिली होती आणि आता या शेतक-यांना किती मदत दिली आहे आणि उद्या किती मदत करावाची आहे यासबंधी आपण विचार करु या . आता शेतक-यांना जी मदत करण्यात आली आहे ती पहिली आणि शेवटची आहे असे मी म्हणत नाही.आता जी मदत केली जाणार आहे त्याबाबतीत शासनाने जाहीर केले आहे आणि त्याचे पैसेसुध्दा रिलीज केलेले आहेत. तसेच 4 लाख 50 हजार हेक्टर्स क्षेत्रातील मदतीसंबंधीचा आम्ही निर्णय उद्या घेऊ आणि हा निर्णय शेतक-याच्या बाजूचा असेल एवढेच मी आता आपल्याला सांगतो. हे सरकार जनतेचे आहे. जनतेला दिलासा देणारे हे सरकार आहे.जनतेला संकटात ठेवून आम्ही राज्य करु शकत नाही कारण हे सरकार जनतेसाठी आणि शेतक-यासाठी आहे तसेच शेतकरी हाच आमचा विकासाचा केन्द्रबिंदू आहे. तेव्हा त्यांचा विचार सुध्दा हे शासन करीत आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी तो मुद्दा मांडलेला आहे त्याचे उत्तर मी दिलेले आहे.जे लोक बेपत्ता झालेले आहेत त्यांच्या कुंटुबियांना पाच लाख रुपयांची मदत करण्यात यावी अशी जी मागणी करण्यात आलेली आहे त्या बाबतीत मी उत्तर दिलेले आहे. काही ठिकाणच्या जे.टी. तुटलेल्या आहेत तेव्हा नैसर्गिक आपत्तीखाली त्याची दुरुस्ती करण्याचे काम ताबडतोबीने हाती घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले की, नुकसानग्रस्त व्यक्तींना दिली जाणारी मदत तुटपुंजी आहे. त्यांनी ही मदत तुटपुंजी आहे असे सांगितलेले असल्यामुळे त्यांचे पूर्णपणे समाधान होईपर्यत सबंधितांना मदत करण्याचा आम्ही प्रयत्न करु. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी सी.ए. असल्यामुळे ते आम्हाला फायनान्सच्या बाबातीत योग्य ते मार्गदर्शन करतील अशी मी त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करतो. तसेच सन्माननीय सदस्यांची मागणी पूर्ण करावयाची असेल तर त्या दृष्टीने त्यांनी आम्हाला

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मार्गदर्शन करावे त्यासाठी राज्याचे बॅलन्स शिट त्यांच्या समोर ठेवण्यात येईल. या निमित्ताने त्यांनी दोन चांगल्या सूचना केल्या आहेत. राज्याचा नॅशनल कॅलेमिटीज फंड असला पाहिजे अशी त्यांची एक सूचना आहे त्यांची ही सूचना चांगली असल्यामुळे त्या बाबातीत शासन विचार करील. त्यानंतर त्यांनी पीक विमा योजनेच्या बाबतीत आग्रह धरावा अशी त्यांनी दुसरी सूचना केलेली आहे. त्यांनी केलेल्या दोन्ही सूचना चांगल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी भात खरेदीच्या बाबतीत मागणी केलेली आहे. त्यांना मी सांगू इच्छितो की, भात पिकविणा-या शेतक-यांना हेक्टरी मदत अगोदर देतो त्यानंतर भिजलेला भात खरेदी करण्याच्या बाबतीत आपण केलेल्या मागणीचे काय करावयाचे याचा विचार करण्यात येईल. जी कमिटमेन्ट अगोदर करण्यात आलेली आहे ती अगोदर पूर्ण करु या.असे मी आपल्याला सांगू इच्छितो. अधिकची कमिटमेनट स्वीकारण्या अगोदर पूर्वी दिलेली कमिटमेन्ट प्रथम पूर्ण करु. कोकणातील तीन जिल्हयातील शेतक-यांचे पीक कर्ज माफ करण्यात यावे अशीही मागणी त्यांच्याकडून करण्यात आलेली आहे. त्याबाबतीत मी आपल्याला सांगतो की, अगोदरच्या कमिटमेन्ट पूर्ण केल्याशिवाय दुस-या मागणीचा विचार सध्या करता येणार नाही. चक्री वादळासबंधीची माहिती मच्छिमारांना अगोदर मिळालेली नाही असे काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. ही माहिती देणारे एक यंत्र मच्छिमारांना बोटीवर लावण्यासाठी दिले जाते आणि .त्यावर किना-याहून नियंत्रण ठेवले जाते. अचानक वादळ येणार असेल वा हवामानात अचानक बदल झाला तर त्या यंत्राव्दारे मच्छिमारांना माहिती देता येते .बोटीचा क्रमांकसुध्दा त्यावर असतो त्यावरुन ही बोट किती लांब आहे आणि हे समजू शकते. अशा प्रकारे किना-यापासून ती बोट किती अंतरावर गेलेली आहे हे आपल्याला कळणार आहे. त्या यंत्राची किंमत 7 हजार 500 रुपये आहे तरी सुध्दा मच्छिमार हे यंत्र बोटीवर लावत नाही तेव्हा मच्छिमारांना हे यंत्र लावणे यापुढे सक्तीचे केले जाईल.त्याचे पैसे कोणी द्यावयाचे याचासुध्दा विचार करु एवढेच मी आपल्याला सांगू इच्छितो.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे .....

सभापती महोदय, प्रशासकीय यंत्रणेला आपदग्रस्तांबद्दल आस्था नाही असे सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी सांगितले आहे. पण असे म्हणणे बरोबर होणार नाही. सन्माननीय सदस्या याठिकणी उपस्थित नाहीत त्यामुळे त्याबाबतीत अधिक खुलासा करण्याची काही आवश्यकता नाही. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी फळबागासंबंधी काही सूचना केल्या आहेत. सुपारी आणि आंब्याच्या झाडासबंधी सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण यांनी मुद्दा मांडलेला आहे. त्या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्र्यांशी बोललो आहे. कोकणातील फळबागासाठी हेक्टरी 15 हजार रुपये मदत देण्याचे आम्ही ठरविलेले आहे. एका हेक्टरमध्ये आंब्याची 40 झाडे असतात .....

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ...

15-20 वर्षाची झाडे असतात तेव्हा या संबंधीचा विचार आम्ही निश्चितपणे करू. हा आमच्यापुढे देखील विचार आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी बेपत्ता मच्छिमार तरूण असल्याची माहिती दिली आणि मी आपल्याला सांगितले आहेच की, अशा प्रकरणात 2 लाख रूपयांपर्यंत आपण मदत देतो आहोत. अर्थात ही मदत देताना वयाचा निकष लावणे बरोबर होणार नाही. केवळ त्या संदर्भात व्यक्तीचे वय वर्ष 18 च्या खाली आहे की वर आहे या पलिकडे अन्य काही पाहिले जात नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण यांनी या संबंधात ब्रिटीश कालीन निकष असल्याचे सांगितले. पण आपण त्यात सुधारणा केलेली आहे. तसेच यापुढेही यासंबंधात आपल्या काही सूचना असतील तर जरूर त्यांचाही विचार निश्चितपणे केला जाईल आणि त्याप्रमाणे नियमांमध्ये, निकषांमध्ये सुधारणादेखील केल्या जातील. विरोधी पक्षीय सदस्यांकडून करण्यात आलेल्या चांगल्या सूचनांचा देखील आम्ही निश्चितच विचार करतो, प्रसंगी त्या स्वीकारतो देखील आणि त्याप्रमाणे सुधारणा करण्याचाही आम्ही प्रयत्न करतो. शेवटी जनहितासाठी कायदा, नियम निकष हे सहजसाध्य असावेत आणि ते आधुनिकही असावेत असाच आमचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांना सहजरित्या कर्ज मिळावे अशीही मागणी आहे. या विषयावर बोलताना फयान चक्रीवादळ असेल, अतिवृष्टी असेल वा अवकाळी पाऊस असेल या तिन्ही बाबतीत मच्छिमार, शेतकरी आणि छोटे बागायतदार, शेतमजूर असतील त्यांना मदत देण्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये जे मौलिक विचार मांडले आणि मार्गदर्शन केले त्याबद्दल सरकार त्यांचे मनापासून आभारी आहे. या चर्चेमध्ये कोणी टीका केली त्याबद्दलही मला काही म्हणावयाचे नाही परंतु नैसर्गिक आपत्तीच्या वेळी तरी आपण अशा प्रकारचे राजकारण करू या नको. विषय मग तो 26 नोव्हेंबर 2009 चा असेल वा चक्रीवादळाचा, नैसर्गिक आपत्तीचा असेल अशा वेळी आपण सर्व एक होऊ या आणि महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला राजकारणी लोक आणि सरकार अशा प्रसंगी एकत्र येतात व या संकटावर मदत करतात असा संदेश आपण यातून देऊया. सभापती महोदय, या नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्यांना, मग ते मच्छिमार असोत वा शेतकरी असोत त्यांना मदत देण्यासाठी आपण सारे सहकार्य कराल अशी मी अपेक्षा करतो आणि आपण साऱ्यांनी या चर्चेच्या माध्यमातून सरकारला जे मार्गदर्शन केले आहे त्याबद्दल पुन्हा एकदा आभार मानतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

*** ..... 3P 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सभागृहामध्ये गेले चार पाच तास अत्यंत महत्त्वाच्या विषयावर चांगली चर्चा झाली. माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी नियम 289 अन्वये या ठिकाणी या विषयावर प्रस्ताव मांडण्याचा प्रयत्न केला आणि सत्तारूढ पक्षाच्या बाजूने नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडण्यात आला. या विषयावर अत्यंत गंभीरपणे विस्तृत अशी चर्चा येथे झालेली आहे. या संदर्भात शासनाची जी काही भूमिका आहे ती देखील सरकारला येथे मांडता आली. मी शासनाचे आणि विशेष करून माननीय महसूल मंत्र्यांचे, माननीय श्री.नारायण राणे यांचे या निमित्ताने आभार मानतो की, त्यांनी चांगल्या प्रकारे या चर्चेला उत्तर दिले आहे. नियम 260 अन्वये ही चर्चा करताना सत्तारूढ पक्ष म्हणून आमची अशी अपेक्षा होती की, या विषयाचे गांभीर्य सरकारपर्यंत पोहोचावे आणि सरकारला ज्या प्रमाणात या संबंधात उपाय योजना करावयाची असेल ती करावी. हाच त्यामागे आमचा उद्देश होता. तो उद्देश सफल झाला असे मी मानतो. यासाठी पुन्हा एकदा मी आभार मानतो आणि या प्रस्तावाला मान्यता दिली त्याबद्दल माननीय सभापतींचे देखील मी या निमित्ताने आभार मानतो.

उपसभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, उद्या बुधवार, दिनांक 9 डिसेंबर 2009 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7.00 वाजता, बुधवार, दिनांक 9 डिसेंबर 2009 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही